

अभिवादन

वर्षारंभ : १ जून १९६५

# माणूस

श्रेष्ठ साहित्याचा संग्रह
किफायतशीर गुंतवणूक

# राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

- मोठ्या रॉयल आकाराची एक हजार पृष्ठे (दोन भाग)
- उत्कृष्ट कागद, टिकाऊ बांधणी
- दलालांची आकर्षक रेखाचित्रे व बहुरंगी मुखपृष्ठे
- ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे, नकाशे

**किंमत ३६ रुपये**

**१०० रुपयांची ठेव**
**५ वर्षांसाठी**

- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे ठेवल्यास सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा लोकमान्य व राजमान्य ग्रंथ ताबडतोब विनामूल्य आपल्याला घरपोच मिळेल.
- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे आपली ठेव आजच पाठवा व आपली प्रत राखून ठेवा.
- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.
- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास ७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी.

राजहंस प्रकाशित
पुणे

४१९ नारायण, पुणे




वर्ष पाचवे : अंक पहिला : १ जून १९६५ : पंचवीस पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. दूरध्वनी : ५७३५९

---

अभिवादन : ●

□ श्री. ग. मा.

कथा : ●

□ सौ. वसुधा पाटील

चित्रकथा : ● राजमाता जिजाबाई

□ □ □

कविता : ●

□ ब. मो. पुरंदरे

लेख : ● कवि हा आहे असा जीवनी

□ रतनलाल भंडारी

पुस्तकपरिचय : ● नाझी भस्मासुराचा उदयास्त

□ रा. म. शास्त्री


शिवाय : ● जगाच्या पाठीवर, दिल्लीदरबार, रंगभूमी, चित्रपट, क्रीडा, विचार-वारे, भिंतीवरील तुंबड्या ही नेहमीची सदरे.

मुखपृष्ठ : ● अभिवादन

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.

# अभिवादन



• वर्ष पहिले

स. न. १२ जून ६१

आपणाकडून एस्. टी. ने आलेले माणूसचे अंक पोचले आहेत. आपण अंक चांगला काढला असून स्टॉलवर हातोहात खपला. अंक चांगला असलेबद्दल सर्वत्र बोलले जाते. असो. पुढील ऑर्डर व पैसे पाठवीत आहे.

**वैद्य, कोयनानगर.**

स. न. १५ जून ६१

आपण पाठविलेले पत्र मिळाले. आम्ही वाचून पाहिले. चालू अंकाचा सेल ६०० पर्यंत झाला आहे. आपण पुढील अंकाचे कव्हर जरा व्यवस्थित करणे. 'माणूस' हा शब्द जरा व्यवस्थित टाकणे. चालू अंकावरील शब्द गुजराथीप्रमाणे दिसतो. 'मराठी मासिकपत्र' न टाकता 'मराठी मासिक' असे लिहिणे.

अंकाची जहिरात करणे व अमुक तारखेला प्रसिद्ध होईल, असे लिहिणे. अंक आकर्षक काढणे.

**य. का. सुर्वे, मुंबई.**

स. न. २० जून ६१

आपण पाठविलेला नमुना अंक मिळाला. धन्यवाद. आपले मासिक सहजासहजी विकले जाणारे नाही. त्यासाठी शाळा, कॉलेज, वाचनालये वगैरेमध्ये जाऊन भेटून प्रचार करावा लागणार आहे. तेव्हा आपण on sale basis वर २५ प्रती पाठवू शकत असल्यास पाठविणे. दर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत न विकलेल्या प्रती वापस व विकलेल्या प्रतीचे पैसे पाठवू. हे मान्य असल्यास आपण जुलै अंकाच्या २५ प्रती पाठविणे. पत्रोत्तर यावे.

**जानकीतनय एजन्सी, नागपूर.**

श्री संपादकजी नमस्ते 11 जुलै ६१

आपका पार्सल मिल गया है। कृपया इसी तरह पार्सल भेज दिया करे। मैं आपको १५ तारीखतक आपके पैसे भेज रहा हूँ। पत्रका जबाब देनेमे देर हुअी इसलिये क्षमा चाहता हूँ। आप पत्रिकामे रोमँटिक कहाँनियाँ जादा दिया करे, इससे पत्रिका हातोहात खपते जायेगी। आशा है आप मेरी यह रायपर गौरसे विचार करेंगे।

**एस्. आर्. शर्मा, पाचोरा.**

स. न. १९ जानेवारी ६२

आता आपणास पत्र लिहिणे कारण की, आम्ही आपणास फक्त ऑक्टोबर ६१ मध्ये नोव्हेंबर माणूस दिवाळी अंक ५ प्रती पाठवून देणेस सांगितले होते. त्यापुढे डिसेंबर ६१ पासून अंक पाठवून देण्यास बंद करावयास टपालाने मागे खुलासा कळविला आहे. आपल्या लक्षात नसून विनाकारण चालू जानेवारी ६२ चे अंक बुकपोस्टाने पाठवून दिला आहे. आमचेकडे ६ प्रतीमधून एकही अंक खपला नाही. आपल्या मासिकाचा खप होत नाही, म्हणून आम्ही आपणास मागेच पुन्हा अंक पाठवून दिला तर घेतला जाणार नाही, सूचना अगोदर दिली होती. आपण आम्हास चालू जानेवारी ६२ चे माणूस ६ अंक पद्धतशीर पाठवून दिलेले अंक न गहाळ करता आम्ही इकडून पुन्हा आपले जानेवारी अंक ६ प्रती पॅकिंग करून परत पाठवीत अहोत. यापुढे सूचना आपणास देतो की, पहा, पुन्हा अंक जर पाठवून दिला तर घेणार नाही. आठवण ठेवा.

**अण्णासाहेब विरूपाक्ष इचलकरंजे, निपाणी.**

स. न. ९ मार्च ६२

आपणाकडून माहे मार्चच्या अंकाच्या प्रती मिळाल्या. त्याचे बिल मी पाठवीत आहे. आता माहे एप्रिलपासून आम्हास अंक पाठवू नये, कारण सदर अंकाला येथे खप नाही. तरी मी माझी एजन्सी एप्रिलपासून बंद करीत आहे. आम्हास आपल्या मासिकाबद्दल आदर आहे, पण वाचकाची अभिरुची आजकाल फाजील साहित्य व सिनेमा या कक्षेत फिरत आहे. तरी व्यवहार बंद केला म्हणून राग मानू नये.

**एस्. पी. भट, इगतपुरी.**

स. न. १२ मार्च ६२

मी दरमहा आपला अंक मागविला असता, परंतु तो वाचनालयाचे लायक नाही. तो अंक आता शेतकऱ्यांसाठीच आहे. असो. कृपया यापुढे अंक पाठवू नका.

**व्ही. जी. कुलकर्णी, धुळे.**

स. न. १९ मार्च ६२

आपल्या माणूस मासिकातील लिखाण समाजवादावर व राजकीय स्वरूपाचे असते. कथा, विनोदी लेख वगैरे असत नाहीत. त्यामुळे अंक खपत नाहीत. तरी एप्रिल ६२ पासून अंक पाठविण्याचे बंद करावे.

ए. वाय्. घामणेर, बळगाव.

## नकाराची कारणमीमांसा

'माणूस' ची पहिल्या वर्षातली ही सर्वसाधारण स्थिती. 'अंक हातोहात खपला,' असे म्हणणारा एकच हरीचा लाल निघाला. पुढे तोही जागेवर राहिला नाही, हा आणखी विनोद. बहुतेक ठिकाणी मुलगी नापसंत – फक्त नकाराची भाषा वेगळी. नागपूरला प्रचार हवा, तर मुंबईला मुखपृष्ठ व्यवस्थित (!) हवे. कोणी रोमँटिक कहाँनियांची मागणी करतो. चुकून एखाद्याला अंक अधिक पाठविला गेला, तर तो अंक परत पाठवून शिवाय वर दमदाटीही देतो. अंक केवळ शेतकऱ्यांसाठी आहे, असा निर्वाळा कोणी देतो, तर 'राजकीय स्वरूपाचे लिखाण अंकात असल्यामुळे अंक खपत नाही,' असा दुसऱ्या ठिकाणचा अभिप्राय पडतो. एकूण काय 'अंकाविषयी आदर आहे, पण खप नाही...' तेव्हा 'सुज्ञास अधिक सांगणे न लगे'... 'कळावे. लोभ असावा...'

'माणूस' ची सुरवातीची किंमत आठच आणे होती, पण किंमत कमी म्हणून अंक खपेल हा अंदाज चूक ठरला. तो इतर रुपाया–अंकाइतकाही खपत नसे. अंक कोणालाच आपला वाटत नव्हता, हे त्याचे कारण असावे. त्यात कथा येत होत्या, पण कथाप्रिय वाचकांसाठी तो नव्हता. त्यात लेख येत होते, पण ते फारच थोड्या वाचकांना वाचण्यालायक असत. करमणुकीचा, विनोदाचा तर त्यात पत्ताच नसे. काहीतरी वेगळेपण त्यात दिसून येई, पण ते नेमके लक्षात येण्यासारखे ठसठशीत नव्हते. अधूनमधून 'पुणे – ही शूर नगरी' (पानशेत प्रकरणावरील वृत्तांत), 'प्रभात फिल्म कंपनी' अशी एखादी भट्टी जमून जाई. बाकी अंक नियमितपणे निघत होता एवढीच त्याच्या जिवंतपणाची खूण.

## साहसी प्रयोग

असा नावापुरता जीव शिल्लक असतानाच दुसऱ्या वर्षारंभापासून 'माणूस' ने रुपाया-अंकाच्या गर्दीत प्रवेश केला. काही विशेष बदल घडून आला नाही. 'रणावीण स्वातंत्र्य जेव्हा मिळाले,' अशी एखादी लेखमाला, 'शनवारवाड्यातील शमादान' अशी एखादी कथा लोकांना आवडे, पत्रे येत, नेहमीची सामसूम मात्र कायम. खपाचे एकदा बसलेले घोडे काही उठायला तयार नव्हते.

अशी दोन वर्षे उलटली. एक धाडसी प्रयोग करून पाहावा असे वाटले. 'वाचकांची अभिरुची बिघडली' की 'साहित्याच्या मानाने गैरवाजवी किंमत आहे, म्हणून अंकाला खप नाही,' याचा एकदा सोक्षमोक्ष (आपल्यापुरता) लावून घ्यावा हा या प्रयोगामागचा विचार.

प्रयोग जमला. '१५ ऑगस्ट १९६४' ला २५ पैसे किमतीला नेहमीचा 'माणूस' चा अंक प्रसिद्ध झाला आणि प्रथमच 'हातोहात' खपण्याचे भाग्य नजरेस पडले. 'आपले अंक सहजासहजी विकले जाणार नाहीत,' असे ज्या नागपुरातील विक्रेत्याकडून सुरवातीस कठोरपणे बजावले गेले होते, तोच आता कौतुकाने लिहिता झाला –

"While thanking you for making a experiment in the history of Marathi literature, we are pleased to inform you that your experiment has proved a great success. In Nagpur about ××× copies are sold out. If the issue would have been ready by 1st Aug., the same would have reached at × × × copies."

सर्व ठिकाणचा कमीजास्त प्रमाणात हाच अनुभव.

## मासिक, मासिकपत्र आणि पाक्षिक

मुंबईच्या सुर्वे एजंटांनी पूर्वी लिहिले होते, "'मराठी मासिकपत्र' असे न टाकता 'मराठी मासिक' असे लिहिणे." पण पहिल्या अंकापासूनच 'पत्र' शब्द हेतुपूर्वक योजला होता. उच्च व विदग्ध साहित्याचे प्रकाशन करणे, 'ज्ञान व मौजे'चा भरपूर पुरवठा करणे किंवा बाष्कळ व उत्तान साहित्य छापून गल्ला जमवणे –यांपैकी कोणत्याच प्रचलीत वर्गात 'माणूस' बसू शकत नव्हता. त्यामागील 'समाज प्रबोधना'चा दृष्टिकोन स्पष्ट व्हावा, हाच 'पत्र' शब्द योजण्यामागील हेतू होता. तो अधिक स्पष्ट व्हावा म्हणून पंचवीस पैसे प्रयोगापाठोपाठच मासिकाचे पाक्षिकात रूपांतर झाले. आणखी काही महिने उलटले आणि आकारातही बदल करणे इष्ट वाटले. २६ जानेवारी १९६५ अंकापासून चालू नवीन आकारात 'माणूस' प्रकाशित होऊ लागला. आकृती आणि आशय यांचा मेळ बराचसा जमला आणि खपाचे बसलेले घोडे उठले आणि चालू लागले.

जेथे 'माणूस'चा एकही अंक पूर्वी जात नसे, अशा नगर जिल्ह्यातील जामखेडसारख्या लहानशा गावचे विक्रेते बी. जी. मारवाडी लिहितात–

"२६ जानेवारी या माणूस मासिकाचा पुस्तकाचा आकार अत्यंत सुंदर आपण काढलेला आहे. याच आकारामध्ये म्हणा किंवा साईजमध्ये, आपण जर माणूस

मासिक प्रत्येक महिन्याचे १ व १५ तारखेस काढणार असाल, तर प्रत्येक अंक १५ पाठवीत जाणे."

पणजीहून श्री. भाट कळवितात—

"आपले 'माणूस' पाक्षिक लोकांना फारच आवडले. कारण आपल्या पाक्षिक-मध्ये लेखन फारच चांगले व दर अगदीच माफक. ह्यामुळे लोकांची आवड फार."

इगतपुरीचे भट म्हणजे रोखठोक व सरळ मामला. आगापिछा नाही. त्यांनीच पूर्वी कळविले होते, 'वाचकाची अभिरुची आजकाल फाजील साहित्य व सिनेमा या कक्षेत फिरत आहे.' आता तेवढ्याच दिलखुलासपणे ते लिहितात, "१ मार्चचे अंक प्रती १००+१ पाठवले. अंक दिनांक ३।३।६५ रोजी संध्याकाळी रेल्वे पार्सलद्वारा मिळाले. आज दिनांक ४ रोजी सर्व अंक खपवून त्याची रक्कमही आपणास त्वरित पाठविली आहे... अंकाचे मुखपृष्ठ व स्वच्छ छपाई याकडे मन आकर्षून घेते. एवढेच काय पण अवघ्या ४ आण्यांत उत्तम कागद व वेचक साहित्य आपण जनतेस कसे देऊ शकता याबद्दल नवल वाटते..."

लातूरच्या 'प्रभाकर बुकसेलर्स'चा अनुभव काही वेगळा नाही... २६।३ च्या पत्रात ते एवढेच कळवितात... "एप्रिल १९६५ चे 'माणूस' १००+१ प्रती पाठविण्याची नोंद घ्यावी. अंक आपले येथे एका दिवसातच आले दिवशीच विक्री होतात. नंतर ग्राहकांची निराशा होते." पुढच्याच अंकाची त्यांची मागणी १०० वरून १५० गेली व त्यांनी लिहिले, "'माणूस' पाक्षिक येथे फारच लोकप्रिय झालेले आहे. वृत्तपत्र विकणारी मुले वीसचेवर अंक दुकानावर येऊन घेऊन जातात. दोन दिवसांत अंक संपवतात."

इचलकरंजी गाव तर केवढे! पण तेथील 'मातृभूमी न्यूज पेपर एजन्सी'कडून नुकतेच पत्र आले आहे... "आज रोजी ता. १९-४-६५ रोजी, १५ एप्रिलचे माणूस (५० अंक) पोहोचले. परंतु आपला माणूस ता. १५ लाच येणार म्हणून एकेक ग्राहकांच्या च्यार च्यार फेऱ्या झाल्या. तेव्हा अंक बरोबर तारखेलाच मिळावा... आपल्या माणूस अंकावर ग्राहकांची छाप अगदी सहजासहजी पडते... लवकरच शतक गाठतील असे वाटते..."

## माफक व वाजवी किंमतीचे धोरण


आकृती आणि आशय यांचा मेळ जमला, तसाच किंमतीचाही मेळ जमणे अव-श्यच आहे. हे उघडच आहे, की २५ पैसे ही किंमत न परवडणारी आहे. त्यातून

वृत्तपत्र कागदाच्या आयातीचे धोरण थोडे सैल झाले असते, तर या किमतीतही अंक देणे कदाचित शक्य झाले असते, पण आता तीही आशा दुरावली. जाहिरातीच्या उत्पन्नावरही आज नाही उद्या सरकारी बंधने येणार, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. तेव्हा किमतीत वाढ करण्यावाचून गत्यंतर उरले नाही. परंतु तरीही अंक, आतील साहित्याच्या मानाने वाचकांना अत्यंत माफक व नेहमी परवडणाऱ्या किमतीतच देण्याचा ' माणूस ' चा प्रयत्न राहील. पुढील अंकापासून फक्त ५ पैसे वाढ केली आहे.... वाचकांना ही मुळीच गैर वाटणार नाही, अशी आशा आहे.

१५ जून, १९६५ या अंकापासून ' माणूस 'च्या प्रत्येक अंकाची किंमत फक्त ३० पैसे ठेवण्यात आली आहे. वार्षिक वर्गणी आठ रुपये कायम आहे.

' माणूस'चा हा पाचव्या वर्षाचा पहिला अंक. चार वर्षांच्या वाटचालीचे हे निवेदन म्हणूनच सर्वांसमोर या अंकात ठेवले. चार वर्षे जसे सर्वांचे – वाचकांचे, विक्रेत्यांचे, जाहिरातदारांचे व अर्थातच लेखकांचे – सहकार्य ' माणूस'ला लाभले, तसेच ते यापुढेही मिळत राहील, असा विश्वास आहे.

संपादक
**श्री. ग. माजगावकर**




# अंगांतल्या व हवेंतल्या उष्णतेच्या तक्रारीं साठीं पर्ल काढा कुटुंबांत सर्वांच्या उपयोगी पडतो

असा गेल्या चाळीस वर्षांचा अनुभव आहे. सर्व अंग आंतल्या आंत रसरसणें, डोळयांची व हातापायांच्या तळव्यांची जळजळ, उन्हाळ्याचा त्रास, पचनेंद्रियें कमजोर होऊन वारंवार अपचन, पोट दुखणें-फुगणें-जड होणें, शौचाला केव्हांच साफ नसणें, नेहमीं अगदीं थकल्यासारखें वाटणें वगैरे उष्णतेच्या तक्रारी शीतल, शक्तिवर्धक, आरोग्यदायक पर्ल काढा जलद दूर करतो. काढा या नावामुळें घाबरण्याचें कारण नाहीं. पर्ल काढा चवदार लागतो. वर्षांतून एक दोन वेळां पर्ल काढ्याच्या ४।५ बाटल्या घेतल्यास प्रकृती उत्तम राहते. पर्ल काढा पुरुषांप्रमाणेंच नाजुक प्रकृतीच्या स्त्रियांना व मुलांना विशेष उपयोगी पडतो. स्त्रियांनीं गरोदरपणीं सुद्धां निर्धास्त घ्यावा. केव्हां दिवसपाळी केव्हां रात्रपाळीमुळें हटकून होणारें अपचन, पित्त, मलावरोध घालवून प्रकृती चांगली ठेवण्यासाठीं पर्ल काढा पुष्कळ मंडळी वापरतात. आपल्याकडच्या उष्ण हवेंत साहजिक उद्भवणाऱ्या उष्णतेच्या तक्रारींसाठीं पर्ल काढा घ्या.

## उष्णतेच्या तक्रारीं चा अनुभविक उपाय पर्ल काढा

**पर्ल कंपनी, मुंबई २७.**



दिल्ली दरबार

## □ सौ. ललितादेवींचा साधेपणा

पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री यांची रशिया वारी सफल झाली की नाही याची चर्चा दिल्ली दरबाराच्या आसमंतात सध्या ऐकू येत असते. पंतप्रधानांना साफल्य लाभलेले असो वा नसो, त्यांच्या पत्नी सौ. ललितादेवी मात्र रशियन महिलांवर 'इंप्रेशन' मारून परतल्या आहेत, असा बोलबाला येथे चालू झालेला आहे. त्या स्वत: तर या प्रवासामुळे रशियावर बेहद्द खूष झालेल्या दिसत आहेत. यामुळे दि. २० मे रोजी पहाटे येथे परतल्यानंतर दुपारी एका महिला पत्रकाराजवळ अनौपचारिकरीत्या गप्पागोष्टी करताना सौ. ललितादेवींनी सांगितले की 'हे जर रशियाच्या प्रवासाला पुन्हा निघतील, तर त्यांच्यासोबत मी निश्चितच जाईन.' सौ. ललितादेवी शास्त्री या स्वत: अत्यंत साध्या स्वभावाच्या आहेत. त्यामुळे रशियाच्या प्रवासात एका स्थळी थोडा आग्रह होताच त्यांनी मन:पूर्वक भजन गाऊन दाखविले. पंतप्रधानांच्या सन्मानार्थ ज स्वागत वा भोजनसमारंभ झाले, त्या त्या स्थळी सौ. ललितादेवींनी नटूनथटून भपकेबाज पोशाखांत उपस्थित राहून चमकावे म्हणून मॉस्कोस्थित भारतीय दूतावासांतील अधिकाऱ्यांच्या अर्धांगिनींनी सौ. ललितादेवींना गळ घातली, परंतु त्यांनी चक्क नकार दिला या गोष्टीला !

स्वत:चा साधेपणा त्यांनी सोडला नाहीच, परंतु गबाळग्रंथी कारभारही निर्माण होऊ दिला नाही असे कळले. नियोजित कार्यक्रमांचे वेळापत्रक चुकू नये, हा कटाक्ष बाळगताना स्वत:ला अधिक कष्ट झाले तरी चालतील, असा त्यांचा तेथे खाक्या होता. हे सर्व वेळापत्रक सांभाळून प्रतिदिन त्या नियमितपणे सुमारे एक तास पूजापाठ या व्यक्तिगत कार्यक्रमासाठी काढून ठेवू शकत होत्या. इतक्या साधेपणी रशियात वावरलेल्या या प्रौढ भारतीय महिलेवर रशियाने काय मोहिनी टाकली आहे, याची पूर्ण कल्पना येण्यास आणखी काही काळ लागेल. परत येताच जी क्षणचित्रे त्या सादर करीत आहेत, त्यांवरून असे स्पष्ट दिसत आहे, की रशियन महिलांची कष्ट करण्याची पात्रता पाहूनच त्या थक्क झालेल्या आहेत. प्रसन्न राहून कष्टाची कामे (मिलमधील वा अन्य स्थळीची नोकरी) करीत असतानाही स्वत:च्या झकपकीकडे अधिक लक्ष न देता बालकांचे खाणे, पिणे, खेळणे, त्यांचे स्वास्थ्य आदिकडे

विशेष लक्ष देण्याचा रशियन महिलांचा गुण सौ. ललितादेवींना प्रभावित करून गेला आहे. द्वितीय महायुद्धाच्या घुमश्चक्रीत ज्यांनी बलिदान केले आहे, त्यांना आजची रशियन महिला अद्याप विसरलेली नाही, हे पाहून सौ. ललितादेवींनाही काही प्रसंगी गहिवर अनावर होत असे, असे कळले. रशियन महिलांच्या या साधेपणात, कर्मठतेत, काबाडकष्टांत सौ. ललितादेवींना आणखी कशाकशाचे 'दर्शन' घडले असेल, हे सवडीने निश्चितच पुन्हा पाहण्याजोगे ठरेल.

## □ शास्त्रीजींची परीक्षा

स्वत: पंतप्रधानांनीही तेथे कशाकशाचे 'दर्शन' घेतले आहे, हेसुद्धा पाहण्याजोगे ठरणार आहे. येथे आल्यापासून गेल्या तीन दिवसांत (२३ मे दुपारपर्यंत) त्यांच्यामागे विविध कामांचा एवढा लकडा लागलेला आहे, की त्यांना उसंतच मिळेनाशी झालेली दिसत आहे. गेल्या तीन दिवसांत रशियातील घरे, तेथील गलिच्छ वस्त्यांचे उच्चाटन आणि नव्या सरकारी कचेऱ्यांचे बांधकामापेक्षा नागरिकांच्या निवासस्थानांच्या निर्मितीकडे दिले जाणारे विशेष लक्ष यांमुळे पंतप्रधान कसे प्रभावित झालेले आहेत, याचे काही ओझरते उल्लेख मात्र ऐकावयास लाभलेले आहे. रशियातील प्रवासाला उद्देशून त्यांनी 'शोधार्थ केलेला प्रवास' (Voyage of Discovery) असे जे म्हटले आहे, ते यापूर्वी प्रसिद्ध झालेले आहेच.

शास्त्रीसरकारचे 'शंभर दिवस' पूर्ण झाले होते, तेव्हापासूनच काही देशीविदेशी राजकीय निरीक्षकांनी या सरकारची शंभरी भरल्यागत अनुमाने वा भाकिते वर्तविण्यास प्रारंभ केला होता. लौकरच (९ जूनला) या शास्त्रीसरकारचे आयुष्य ३६५ दिवसांचे होईल. यामुळे ज्यांनी पूर्वी भाकिते वर्तविली होती, ते सर्वचजण पुनर्विचार करू लागलेले आहेत. गतवर्षी अन्नधान्य संकटाला सामोरे जाऊन शास्त्रीसरकार जरा उसासे टाकणार, तोच त्याला दक्षिण भारतातील 'सरकारी नोकऱ्याप्रेमी' व 'इंग्रजीचे पक्षपाती' व्यक्तींविरुद्ध कडक उपाययोजना करावी लागली होती. (भाषिक दंगल वा हिंदीविरोधी आंदोलन अशा चुकीच्या नावांनीही या व्यक्तींच्या कारवायांचा काही स्थळी उल्लेख केला जात असतो.) वाममार्गी कम्युनिस्टांच्या राष्ट्रद्रोही कारवायांना पायबंद घालण्यासाठी हालचाल करावी लागली होती. केरळमध्ये सार्वत्रिक निवडणूक झालेली असूनही राष्ट्रपतींची राजवट पुन्हा एकवार प्रस्थापित करण्याचा निर्णय घ्यावा लागला होता. पंजाबचे माजी मुख्यमंत्री सरदार प्रतापसिंग कैरों यांच्या झालेल्या अमानुष खुनानंतर पंजाबातील नाजूक परिस्थिती सांभाळावी लागली होती. ओरिसा भ्रष्टाचारप्रकरणी सावधपणे पावले टाकीत तेथील काँग्रेस पक्षाची अब्रू वाचवावी लागली होती. केंद्रीय मंत्रिमंडळातील समर्थ (कार्यक्षम) सहकारी श्री. सी. सुब्रह्मण्यम् यांचे त्यागपत्र प्राप्त झाल्यानंतरही त्यांना सांभाळून घ्यावे लागले होते. सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे

शास्त्रीसरकारला डोळे चक्क उघडे ठेवून, वास्तववादी बनून, एकाच वेळी पाकिस्तान व चीन या दोन शत्रूंशी सामना करण्याच्या सिद्धतेत द्रुत गतीने वाढ करावी लागत आहे. या व अन्य सर्व घटना पाहून, आढावा घेताना, केंद्रीय मंत्रिमंडळाचे एक प्रमुख सदस्य मला म्हणाले, की ' बरे झाले; शास्त्री सरकारचे एक वर्ष पूर्ण होत असतानाच या सर्व कारणांमुळे त्यांची (शास्त्रीजींची) परीक्षा होऊन जात आहे !'

## □ पुरुषार्थाचा आनंद

हे एक वर्ष पूर्ण होत असतानाच एक अती उत्साहदायी व शुभ घटना घडून आलेली आहे, की जिचा डंका त्रिलोकात पिटला जात आहे. हिमालयाच्या सर्वोच्च शिखराचे (एव्हरेस्टचे) आव्हान स्वीकारून जो पराक्रम कॅ. चीमा व श्री. नवांग गोंबू यांनी दि. २० मे रोजी आणि तोच पराक्रम श्री. सोनम ग्यात्सो व श्री. सोनम वांग्या यांनी दि. २२ मे रोजी प्रकट केला आहे, त्यामुळे सर्वच भारतीयांच्या माना उंचावल्या आहेत. पर्वतारोहण हा नुसता पोरखेळ नसून राष्ट्राचा मानबिंदू उंचावणारा पुरुषार्थ आहे, असा अनुभव आता अनेकजण नव्याने घेऊ लागले आहेत. सीमेवरील शत्रूंचा विमोड करण्यात शास्त्रीसरकारला सफलता लाभून द्वितीय वर्षात पंतप्रधानही कीर्तीच्या सर्वोच्च शिखरावर आरूढ होवोत, असा शुभसंकेत तर या पराक्रमी पर्वतारोहींनी दिलेला नाही ना ?

## □ शंतनुराव आणि पत्रकार

राष्ट्रपतिभवनाच्या दरबार हॉलमध्ये नुकताच समारंभ साजरा होऊन पुण्याचे उद्योगपती श्री. शं. ल. किर्लोस्कर ' पद्मभूषण ' झाले. सुमारे सात सप्ताहापूर्वीच ते भारतातील उद्योगपतींची जी सर्वोच्च संस्था (फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री), तिचे अध्यक्षपदी विराजमान झालेले आहेत. यावेळी दिल्लीच्या मुक्कामात त्यांनी फेडरेशनचे अध्यक्ष या नात्याने पत्रकारांची भेट (प्रेस कॉन्फरन्स) घेतली. राजधानीतील त्यांची ही पहिलीच ' प्रेस कॉन्फरन्स ' असूनही त्यांनी बहुतेक सर्व पत्रकारांना प्रभावित करून टाकले. प्रश्नोत्तरे चालू असताना पत्रकारांना ते काही वेचक प्रतिप्रश्न विचारीत होते, ते ऐकून अनेकांना आश्चर्य वाटले. राजधानीतील संन्याल खूनप्रकरणामुळे जे उघडकीस आले आहे, की कै. श्री. संन्याल यांच्या राहत्या घरी कपाटात रु. ७० हजारांच्या नोटा निघाल्या; त्याचा उल्लेख करून श्री. किर्लोस्करांनी विचारले की व्यापाऱ्याच्या घरात नोटा सापडल्या की तो ' काळा पैसा ' व सरकारी अधिकाऱ्याच्या घरात सापडल्या, तर तो काय ' पांढरा शुभ्र पैसा ' असा न्याय आहे का ? श्री. किर्लोस्करांनी दिल्लीतील सुमारे

एक वर्षापूर्वीच्या घटनेचे सर्वांना स्मरण करून देऊन चकित केले.

गतवर्षी दिल्लीमधील धान्यव्यापाऱ्यांच्या गुदामांवर अचानक धाड घालून सरकारी अधिकाऱ्यांनी मोठा गाजावाजा केला होता, की सुमारे ७० हजार पोती बेकायदा धान्याचा साठा सापडला ! श्री. किर्लोस्करांनी विचारले, की ही पोती सापडल्याचा जो गाजावाजा केला गेला, त्यानंतर 'सत्य' स्थितीचाही गाजावाजा सरकारने मनःपूर्वक का केला नाही ? सत्य स्थिती अशी होती, की दिल्लीतील व्यापाऱ्यांनी हे धान्य साठविण्यापूर्वी सरकारकडून रीतसर परवाना (लायसेन्स) घेतलेला होता ! हा खुलासा सरकारतर्फेच दुसऱ्या दिवशी करण्यात आलेला होता. श्री. किर्लोस्करांनी हे दोन मार्मिक प्रसंग स्मरणात ठेवून जे प्रतिप्रश्न पत्रकारांना सहजपणे विचारले, त्यामुळे श्री. किर्लोस्करांच्या व्यावहारिक बुद्धिचापल्याबद्दल सर्वत्र स्तुतीच ऐकावयास मिळत आहे.

**दरबारी**

• • •

सावरकर जन्मदिन ... एक स्मरण


# आजपासून पंचवीस वर्षेच काय ?..

**नवी दिल्ली दि. २३ :** 'भारताच्या सरहद्दींना जो धोका निर्माण झाला आहे तो लक्षात घेऊन येती २५ ते ३० वर्षे संरक्षणविषयक गरजांना अग्रक्रम देण्याची जरूर आहे' असे प्रतिपादन संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी आज येथे बोलताना केले.

ते म्हणाले, की आर्थिक विकास महत्त्वाचा असला तरी स्वतंत्र राष्ट्र म्हणून राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे आणि अखंडतेचे संरक्षण करणे हेच आपले पहिले आणि प्रधान कर्तव्य आहे. [ महाराष्ट्र टाईम्स ]

खरोखरच आजच्या राज्यकर्त्यांना देशाचे संरक्षण हे 'पहिले आणि प्रधान कर्तव्य' वाटत असेल तर तो सावरकरांच्या विचारसरणीचा एक विजयच म्हटला पाहिजे. भारत स्वतंत्र होताच, स्वतंत्र पत्रक काढून त्यांनी स्वच्छ शब्दात सांगितले होते–

" जर खरेखुरे स्वतंत्र राष्ट्र म्हणून अजेयपणे जगायचे असेळ तर, मोंगळ्या नि दुबळ्या शांतिपाठाच्या मृगजळाच्या मागे धावत सुटण्याची तुमची हाडीमासी



**. . . . पण या जगाच्या दुर्दैवाने पंचवीसशे वर्षांनंतरही . . . . .**

खिळलेली खोड सोडून देऊन आपल्या ह्या स्वतंत्र राष्ट्राचे रोखठोक शस्त्रबळ, इतर आजच्या कोणत्याही राष्ट्राच्या शस्त्रबळाइतके तरी समर्थ बनविण्याचे कार्य तत्काळ हाती घ्या...ह्या पाच वर्षांच्याआत आजच्या जगातील कोणत्याही राष्ट्रापेक्षा शस्त्रबळात ह्या आपल्या हिंदुस्थानचे हे महाराज्य समबलच केवळ नव्हे तर बलवत्तर झालेच पाहिजे."

आमच्या संरक्षणमंत्र्यांना यापुढे २५ ते ३० वर्षे केवळ संरक्षणविषयक गरजांना अग्रक्रम देण्याची जरुरी भासत आहे. इथेही सावरकर त्यांना हटकतील आणि बजावून सांगतील—

" आजपासून पंचवीस वर्षेच काय, **पण या जगाच्या दुर्दैवाने** पंचवीसशे वर्षांनंतरही जगात शस्त्रयुगाचेच प्राबल्य दिसून'येईल ! ज्या राष्ट्रांच्या माथी प्रजाक्षय मारला जातो आणि जेथे शस्त्रसंन्यासाचा घातक उपदेश केला जातो, त्या दीनदुबळ्या राष्ट्राचा वाली साक्षात् परमेश्वरही होणार नाही ! मग मानवाचा विचारच कशाला !"

# विचार धारे

## ● दिसणारे शिक्षण

" परिप्रश्नेन सेवया " हा विद्यार्जनाचा मार्ग काळानुरूप बदलला आहे. शिक्षण देण्याच्या आधुनिक तंत्रात एक तंत्र सध्या भारतात अगदी बाल्यावस्थेत आहे, ते म्हणजे टेलिव्हिजन, पण गेले काही दिवस टेलिव्हिजनच्या विकासयोजनेबद्दल वर्तमानपत्रांत बरेच येत आहे. या विकासाची दिशा दाखवू शकणारे जे परदेशी तज्ज्ञ सध्या भारतात येत आहेत, त्यांत एक प्रमुख व्यक्ती म्हणजे न्यूयॉर्क विद्यालयातील ' बहुजनसंपर्क साधना 'चे तज्ज्ञ डॉ. पॉल न्यूरथ हे होत. भारत सरकारच्या आमंत्रणावरून आकाशवाणीच्या शैक्षणिक टी. व्ही. कार्यक्रमाचे मूल्यमापन करताना न्यूरथ यांनी असा विश्वास प्रकट केला आहे, की भारतात शैक्षणिक क्षेत्रात टेलिव्हिजनचे स्थान फार मोठे व वाढत्या महत्त्वाचे आहे. दिल्लीत सध्या टेलिव्हिजनर जो शैक्षणिक कार्यक्रम चालविला जातो, त्याचा " सखोल परिणाम " झाला आहे. हा प्रयोग म्हणजे हिंदुस्थानात वापरल्या जाणाऱ्या शिक्षण-विषयक तंत्रांत एक फार मोठी भर आहे. " या तंत्रामुळे शिक्षकांच्या दृष्टिकोनात तर अनेक प्रकारचा बदल झाला आहेच, पण विद्यार्थ्यांनाही एक अभिनव अनुभव मिळाला आहे. " विशेषत: फिजिक्स व केमिस्ट्री शिकविण्यासाठी टी. व्ही.चा फारच उपयोग झाला आहे; कारण दिल्लीतल्या बहुतेक शाळांतून या विषयांच्या प्रयोगासाठी लागणारी साधनसामग्री फारच तुटपुंजी आहे. (आणि राजधानीत ही अवस्था, तर इतर ठिकाणचे काय ? )

सध्या दिल्लीत चालू असलेल्या दृश्य शिक्षणक्रमाचा ' आडवा ' आणि ' उभा ' असा दोन्ही प्रकारचा विस्तार करता येईल, म्हणजे एकीकडे अधिक विषयांचा समावेश करता येईल, तर दुसरीकडे अधिक शाळांचा. प्राथमिक शाळांतूनही अशा शिक्षणाची सोय व्हायला हवी. अमेरिकेत तर प्राथमिक शाळेपासून विश्वविद्यालयापर्यंत टी. व्ही. वर शिक्षण देण्याची व्यवस्था आहे.

न्यूरथ म्हणतात, दिल्लीच्या टेलिव्हिजनवर जो समाजशिक्षणाचा कार्यक्रम आठवड्यातून दोनवेळा असतो तोही खूपच वाढवायला हवा. हा कार्यक्रम लोकप्रिय करण्यासाठी ' टेलिक्लब ' काढता येतील. असे क्लब येथे फारच चांगले चालू शकतील. हिंदुस्थानातल्या सामान्य नागरिकाला टेलिव्हिजनसेट परवडण्याचे दिवस अजून दूर आहेत; त्यामुळे सामूहिक ' पाहण्या 'ला खूपच वाव आहे.

## ● शास्त्रीय प्रगतीची पथ्ये

भारतातल्या शास्त्रीय संशोधनाचा वेग कसा वाढविता येईल ? त्याची काही पथ्ये असतात, ती पाळली म्हणजे हा वेग वाढतो. सोव्हिएट रशियाचे एक अग्रगण्य वैज्ञानिक प्रा. सोकोलोव्हस्की यांनी काही दिवसांपूर्वी या पथ्यांची यादी सांगितली.

पहिले पथ्य म्हणजे संशोधकाने कांतात कार्य करू नये. त्याने आपल्या विषयाहून अगदी निराळ्या अशा विषयात संशोधन करणाऱ्या वैज्ञानिकांशीही प्रत्यक्ष व सतत संबंध ठेवणे अगत्याचे आहे. कारण अशा परस्पर-संबंधानेच भारतीय व्यवसायाला उपयुक्त अशी 'अंतिम वस्तू' ("एंड-प्रॉडक्ट") त्या संशोधनातून निर्माण होऊ शकेल. 'ॲप्लाइड' विज्ञानाच्या क्षेत्रात सांघिक संशोधन हे निश्चितच अधिक उपयुक्त आहे. शास्त्रीय संशोधनाची उपयुक्तता वाढविण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे विश्वविद्यालये व निरनिराळे व्यवसाय यांची सांगड घालणे. रशियात हे सोपे असते, कारण एक विश्वविद्यालय बहुधा एकाच विषयाला वाहिलेले असते. भारतात एक विश्वविद्यालय अनेक विषय शिकविते, त्यामुळे येथे ते तितकेसे सोपे नाही, पण त्यामुळेच भारताची या बाबतींतली गरज अधिक निकडीची आहे. आणखी एका साधनाचा अवलंब करण्यात यावा, अशी सोकोलोव्हस्कींनी सूचना केली, ते म्हणजे शास्त्रीय विषयांना वाहिलेली मासिके व नियतकालिके प्रकाशित करणे व विज्ञानावर आंतरराष्ट्रीय परिसंवाद (सेमिनार) घडवून आणणे.

## • धर्म आणि नृत्य

परिपक्व प्रज्ञेचे परदेशी प्रकांड-पंडित वरचेवर हिंदुस्थानात येऊन आपापल्या विषयावर सखोल विचार प्रकट करून जातात. सध्या दिल्लीत कथक नृत्याचे शिक्षण घेत असलेली अर्जेंटाइन तरुणी मिर्टा वार्व्हो या सदरात मोडत नाही, पण तिच्या विचारात एक निराळीच उत्कटता आहे. व्यवसायाने बॅले-नर्तिक असलेली पण भारतनाटयम् शिकलेली वार्व्हो म्हणते, "भारतनाटयम् व बॅले नृत्य यांच्यात लक्षात येण्याजोगे साम्य आहे, पण एकदा शास्त्रीय बॅले शिकले म्हणजे कुठलाही नृत्यप्रकार शिकणे सोपे जाते." "संस्कृत ही जगातली सर्वांत सुंदर भाषा आहे." नृत्यातल्या विविध पदन्यासांचा व मुद्रांचा नीट अर्थ कळण्यासाठी या तरुणीने नृत्याबरोबर गायिल्या जाणाऱ्या संस्कृत पद्यांतला शब्दन् शब्द समजावून घेतला. भारतीय धर्माकडे विशेष कल असला तर त्याचाही फायदा होतो. "सगळे धर्म चांगले आहेत, पण भारतीय धर्म मला अधिक जवळचा वाटतो." "माझे भारतावर प्रेम आहे." युरोप, अमेरिका, जपान, इजिप्त- बरेच देश पाहिले, पण भारतासारखा देश नाही. "आता प्रश्न हाच आहे, की मला भारत सोडावासाच वाटत नाही." जे जे भारतीय त्याचे या मुलीला अत्यंत प्रेम आहे. मग तो भारतीय पोषाख असो, ("साडी किती सुंदर दिसते!") की भारतीय तत्त्वज्ञान. मिर्टांची आई प्राच्य-विद्या-पारंगत ('ओरिएंटॅलिस्ट') असून तीही सध्या भारतातच आहे व भारतीय साधु-संतांचा स्पॅनिश भाषेत कोष करीत आहे. अशा या आईपासून मुलीला मिळालेला भारतप्रेमाचा हा वारसा.

**—समीर**

# पुण्यात डेल कार्नेजी

• मधुकर परांजपे

डेल कार्नेजी म्हणजे फार मोठा माणूस. तो मुंबईला येणार आहे; हे कळल्यावर अर्थातच मला फार आनंद वाटला. त्याची भेट घेण्याचं मी मनात पक्कं केलं. डेल कार्नेजी मुंबईला येणार, ही काही तशी लहानसहान गोष्ट नव्हती. त्याला पुण्याला आणावं, असं माझ्या मनानं घेतलं. पुण्याला येण्याचं तो मान्य करील, असंहि मला वाटू लागलं.

अर्थात त्याच्या येण्यानं पुण्याचं महत्त्व वाढलं, की पुण्याला आल्यामुळं त्याचं महत्त्व वाढलं, हा वाद तो येऊन गेल्यावर होणार, हे मला ठाऊक होतं. पुढे तो वाद झाला आणि पुणं आहे, तोवर पुढेही होत राहणारच ! पण त्या वादग्रस्त प्रश्नात मी शिरणार नाही. डेल कार्नेजीनंच त्याच्या एका पुस्तकात एका ठिकाणी म्हटलंय्, की तुम्हांला वादविवाद करून कधीच फड जिंकता येणार नाही. वादविवादात जय मिळविण्याचा एकच हमखास मार्ग– तो म्हणजे वाद टाळणे होय. The best way to win an argument is to avoid it. तेव्हा त्या मोठ्या माणसाच्या शिकवणीनुसार मी पुण्याचं महत्त्व वाढलं, की पुण्याला आल्यामुळं कार्नेजींचं महत्त्व वाढलं, या विषयात शिरू इच्छीत नाही.

जाताजाता बंडोपंत मोकाशांनी कार्नेजीला भेटल्यानंतर, त्याची पाठ वळल्याबरोबर कार्नेजीबद्दलचे काढलेले उद्गार सांगतो म्हणजे झालं. बंडोपंत म्हणाले– " कार्नेजी हुशार आहे, हे खरं असलं, तरी तो पुण्यात दीर्घकाळ राहिला असता, तर अधिक हुशार झाला असता, हेही तेवढंच खरं ! "

डेल कार्नेजी मुंबईला येताच मी त्याला भेटणार होतो. पुण्याला आणणार होतो. डेल कार्नेजीचं नाव कुणी ऐकलं नाही ? कोटयवधी लोकांनी त्याचं 'हाऊ टु वीन



वाचकहो !

माझे 'मित्र कसे जोडावे व लोकांवर छाप कशी टाकावी' हे पुस्तक आपण वाचले असेल! दुर्दैवाने हे पुस्तक लिहिण्यापूर्वी मी पुणे पाहिले नव्हते. पुण्यासाठी मी वेगळे पुस्तक लिहिणार आहे.

—डेल कार्नेजी

फ्रेन्डस् अँड इन्फ्लुअन्स पीपल,' हे पुस्तक वाचलं आहे. त्याच्या पुस्तकातले चोरून भाषांतर केलेले उतारे तर अनेकांनी वाचले असतील. मित्र जोडण्याची कला साधली आहे, असं म्हणायचं झालं, तर लोक असं म्हणतात– त्यानं कार्नेजी आत्मसात केला आहे.

मित्र कसे जोडावे ? लोकांवर छाप कशी पाडावी ? खरं म्हणजे हे प्रश्न फार अवघड आहेत; पण कार्नेजीसाहेबांनी हे प्रश्न अगदी सोपे करून टाकले आहेत. आधी आम्हांला मित्र कोण आणि शत्रू कोण, हेच ओळखता येत नाही, तिथे मित्र शोधणार कसा आणि जोडणार कसा ? तीच गोष्ट लोकांवर छाप पाडण्याबद्दलची! या पुण्यात सालं छाप पाडणं किती अवघड आहे, काय सांगू ? आइन्स्टाईननं पुण्यात येऊन अगदी नवीन थिअरी सांगितली तरी, त्याच्या थिअरीत नवे काहीच नाही, असं अनेक लोक, तो गेल्यावर तुम्हांला सांगतील. वाटेल तेवढा भारी वक्ता पुण्यात

भाषण करायला आणा. त्याची छाप पडायची राहिली बाजूला, पण आमचे दोन-चार उपवक्ते त्याला दोनचार मिनिटांत साफ करतील. पाहिजे तर वसंत व्याख्यान-मालेत दोन आणे टाकून केव्हाही या उपवक्त्यांचा पराक्रम पाहा! आता सांगा, अशा वातावरणात कोण साला छाप पाडणार? छे, अवघडच आहे...अवघड कसलं? अशक्य आहे.

एवढं असलं, तरी छाप पाडणं हीदेखील एक कला आहे, हे डेल कार्नेजीच्या पुस्तकातून मला प्रथम कळलं. असं म्हणतात, की अमेरिकेतील बहुतेक क्षेत्रांतील यशस्वी लोकांनी कार्नेजी पचविला आहे. एवढा मोठा मनुष्य महाराष्ट्रात येणार म्हणजे काय? कुणाला काही का वाटलं असेना, मला मात्र फार हर्ष झाला. त्याला पुण्याला आणण्याच्या उद्योगाला मी लागलो.

कार्नेजीसाहेबाला मी पत्र पाठविलं, म्हटलं, मुंबईपर्यंत येणार आहात, तर पुण्या-लाही या. त्या भल्या माणसानं तावडतोब उत्तर पाठविलं. वेळ नाही. अर्थात त्यानं वेळ नाही, हे फार गोड भाषेत कळवलं होतं. मीही त्याला पुन्हा पत्र पाठवलं. इंग्लंड-अमेरिकेत तुम्ही पुष्कळ शहरं पाहिली असतील, पण आमच्या पुण्यासारखं शहर तुम्हांला कुठं पाहायला मिळणार नाही. तुमचे इयंही फार चाहते आहेत. तुमच्या-सारख्या विद्वानांनी पुणं एकदा पाहिलंच पाहिजे. पत्राच्या शेवटी मी एक मार्मिक (बंडोपंत मोकाशांनी हे विशेषण मान्य केलं आहे.) वाक्य लिहिलं– 'तुम्हांला सबंध जगात मिळालेलं मोठेपण खरं आहे, की बनावट आहे, हे जर तुम्हांला खरो-खरच जाणून घ्यायचं असेल, तर तुम्ही पुण्याला आलंच पाहिजे ...' या शेवटच्या वाक्याचा काही परिणाम झाला, की काय ते मला माहीत नाही, परंतु कार्नेजी-साहेबांनी लगोलग उत्तर पाठवून पुण्याला यायचं मान्य केलं.

डेल कार्नेजी पुण्याला येणार, हे तर ठरलं. मी त्याचं 'हाऊ टू वीन फ्रेंडस् अँड इन्फ्लुअन्स पीपल' व इतर सर्व पुस्तके विकत आणली व एकदा वाचून काढली. ही अमेरिकन पद्धत आहे. एखाद्या लेखकाला भेटण्यापूर्वी त्याची सर्व पुस्तके वाचून काढायची. आपल्या बाबुराव अर्नाळकरांना भेटायचं झालं, तर आधी दोनशे रहस्यकथा वाचल्या पाहिजेत. असो.

कार्नेजीसाहेबानं 'हाऊ टू वीन फ्रेंडस् अँड इन्फ्लुअन्स पीपल' या जगप्रसिद्ध पुस्तकात जगात कसे वागावे, याबद्दल फार महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्यांतल्या काही फार महत्त्वाच्या आहेत. उदाहरणार्थ– नेहमी हसतमुख असा. तुम्ही कुठंही हसतमुख गेलात, तर तुमचं स्वागत होईल. तुमच्या स्मित हास्यानं वातावरणात प्रसन्नता पसरते. लोकांचं म्हणणं ऐकून घ्या. लोकाना स्वतःबद्दल सांगण्यास उत्तेजन द्या. लोकांची ऐकायची इच्छा नसते, ऐकवायची असते, ती पुरी करा. वादविवाद जिंकायचा एकच मार्ग म्हणजे वाद टाळणे, हा होय. दुसऱ्याची प्रामाणिकपणे स्तुती करा, त्याच्या कामाबद्दल चांगलं बोला...वगैरे वगैरे. हे पुस्तक इतकं खपलं म्हणे, की

त्याच्या पंचवीस वर्षांत पाऊणशे आवृत्त्या निघाल्या. एवढा मोठा माणूस पुण्याला येणार, ही काही लहानसहान गोष्ट नव्हती.

पाहता पाहता तो दिवस उजाडला आणि एका संध्याकाळी डेक्कन क्वीननं कार्नेजीसाहेब पुण्याला आला. रात्री जेवता जेवता मी त्याला पुढील दोन दिवसांच्या कार्यक्रमांची कल्पना दिली. माझ्या पत्रामुळं त्याला पुण्याबद्दल पुष्कळशी कल्पना आली होतीच, तरीही अधिक माहिती करून घेण्याची त्यानं वेळोवेळी उत्सुकता दर्शविली. पुणे स्टेशनवर उतरतानाच हमालानं त्याला पुणेरी हिसका दाखविला होताच. तरीपण कार्नेजीचं प्रसन्न व्यक्तिमत्त्व त्या प्रसंगातून अधिकच उजळून निघालं. त्यानं हमालाला जादा पैसे तर दिलेच, पण उलट त्या हमालाचं स्पष्टवक्तेपणाबद्दल अभिनंदन केलं. त्यानं मीही आनंदलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी एक अनौपचारिक कार्यक्रम म्हणून मी त्यांना टिळकरोडवरच्या एका लायब्ररीत नेलं. आमच्या वाचनालयाच्या मालकाशी कार्नेजीसाहेबांची ओळख करून दिली. मी म्हणालो,

" कार्नेजीसाहेब, तुमची पुस्तके यांनी मला प्रथम वाचायला दिली. हे म्हात्रे तुमचे फार चाहते आहेत. "

म्हात्रे म्हणजे सदोदितच हसतमुख. तो उगाचच हसला व कार्नेजीसाहेबांना म्हणाला –

" नेहमी हसतमुख असावे, हसावे ही तुमच्या पुस्तकातली शिकवण मला फार आवडली. त्यामुळंच माझा धंदा वाढतो आहे. तुम्ही लिहिलेली सर्व पुस्तके माझ्याकडे आहेत. "

कार्नेजीसाहेबांना आनंद वाटला. मी त्यांना म्हणालो–

" अमेरिकेत असताना तुम्हाला ही कल्पनाही नसेल, की शेकडो मैल दूर असलेल्या पुण्याच्या एका गल्लीत तुमचा असा कुणी भक्त असेल. "

कार्नेजीसाहेब खुषीत हसले. आम्ही लायब्ररीत दहापंधरा मिनिटे बसलो. एका कळकट कपात त्या जगतमित्रानं चहा घेतला. म्हात्रेंच्या वाचनालयात मेंबरलोक येत होते, जात होते. कुठलं पुस्तक देऊ ? हे वाचलं का ? पु. लं. चे ते हे वाचा, नाटक नवीन कुठलंच नाही, त्या मासिकात अमक्याची गोष्ट छान आहे, वगैरे वगैरे गोष्टी म्हात्रे त्यांच्याशी बोलत होता. तेवढ्यात एक बाई आली. या बाईनं दोनतीन महिन्यांत वर्गणी दिली नव्हती. म्हात्रे त्या बाईला हसतहसतच म्हणाला,

" तुम्ही आज पुस्तक नेऊ नका ... च्यायला ... वर्गणी तरी किती वेळा मागायची ? वर्गणी भरा आणि मग हात लावा ... तिकिटं काढल्याशिवाय सिनेमानाटकं बघायला मिळतात का ? ... हा ... हा ... हा ... "

हे बोलत असतानाही म्हात्रे हसतमुखच होता व चक्क हसत होता. त्या बाईला ओशाळल्यागत वाटलं. तिनं वर्गणीचे पैसे दिले. म्हात्रे पावती तयार करीत होते,

तोच एक सतरा–अठरा वर्षांचा मुलगा सायकलवरून आला व घाबऱ्या घाबऱ्या म्हात्रेना म्हणाला —

" म्हात्रे लौकर चला ...: आपल्या वाड्यातला गोखले मोटारीखाली सापडला... लौकर चला. "

म्हात्रेचा चेहरा अद्याप हसतमुखच ... तो हसतहसत त्या मुलाला म्हणाला,

" गोखले ना ?... हा ... हा ... हा ... च्यायला, त्याला मी नेहमी म्हणायचो, अरे बाबा, जपून जा ... पण असाच मरायचा होता तो...अजून त्याला पोर व्हायचं होतं. असेच लोक मरतात ... हा ... हा ... हा ... तुम्ही पुढे चला ... मी ओंकारेश्वरावर परस्पर येतो ... "

मला तिथं थांबवलं नाही. कार्नेजीसाहेबांचा शिष्य म्हात्रे अजून हसतहसत मेलेल्या गोखलेविषयी बोलतच होता, तोच आम्ही दोघं लायब्ररीबाहेर पडलो. कार्नेजीसाहेबांच्या चेहऱ्यावर इतका वेळ खेळणारं स्मितहास्य कुठंतरी दूर पळालं.

तेथून आम्ही साहित्यमंडळाच्या हॉलकडे गेलो. कार्नेजीसाहेबांना लेखकमंडळींना भेटायचं होतं, म्हणून मी दहाबारा लेखकांना बोलावलं होतं. आम्ही गेलो तेव्हा सर्व मंडळी आधीच उपस्थित होती. (चहाचिवडा आहे, असं आधी जाहीर केल्याचा हा परिणाम, असं बंडोपंत मोकाशी म्हणाले.) कार्नेजीसाहेबांनी सुरुवातीस एक छोटंसं भाषण केलं व आपण सारे अनौपचारिकरीत्या भेटत आहोत, तेव्हा सर्व मंडळींनी मोकळपणानं बोलावं अशी प्रेमळ सूचना केली. त्यांनी हे म्हणताक्षणीच दोनचार जणांनी खुर्चीखाली सोडलेले पाय चक्क खुर्चीवर घेतले व मांड्या घालून बसले. एकदोघांनी सिगारेटी शिलगावल्या. कुणी दात तर कोणी कान कोरू लागलं. प्रश्नोत्तरे सुरू झाली.

एकानं पहिलाच प्रश्न फेकला–

" तुम्ही कधी नवकथा लिहिली आहे ? "

" नाही. "

" बरं, मग निदान ' नवकथा ' मासिक तरी वाचलं आहे ? "

कार्नेजीला खरं म्हणजे यावेळी खमंग उत्तर देता आलं असतं; पण त्याचं सौजन्य आडवं आलं. ते म्हणाले –

" आम्ही कॅलिफोर्निआत राहतो, तेथे जगातील अनेक मासिके येतात, पण माझ्या दुर्दैवानं हे तुमचं ' नवकथा ' मासिक वाचलं नाही. तथापि हे मासिक फार चांगलं असावं असं तुमच्या प्रश्नावरून मला जाणवत आहे. "

" तुम्ही नवकथा मासिक वाचलं नाही म्हणजे काहीच वाचलं नाही, " असं म्हणून एका बुटक्या लेखकानं त्यांच्याकडं पाठ फिरवली ती शेवटपर्यंत !

खरं म्हणजे यावेळी तरी कार्नेजीसाहेबांनी एखादं सणसणीत उत्तर द्यावं, असं

मला वाटत होतं. परंतु जग प्रेमानं जिंकण्याच्या सफरीवर निघालेला तो महात्मा यावर म्हणाला,

" तुम्ही म्हणता ते खरंही असेल. "

एवढ्यात चहाचिवडा आला आणि त्यामुळं बोलणं जवळजवळ तासभर थांबलं.

त्यानंतर एक लेखक म्हणाला –

" माझी ' पिच्छा ' गोष्ट तुम्ही वाचलीय् ? तिला आंतरराष्ट्रीय स्पर्धेत बक्षीस मिळालं. "

" सो सॉरी. मी काही ती कथा वाचली नाही, पण मी कथेचं नाव लक्षात ठेवीन व मला ती मिळताच वाचीन. "

तोच दुसरा एक लेखक म्हणाला,

" एवढी काही ती कथा चांगली नाही. मला नाही ती कथा आवडली. "

" बक्षिसं साली कुठल्याही कथेला अलीकडे मिळतात. "

" आपल्या सरकारी बक्षिसाचं पत्रक म्हणजे अलीकडे एक विनोदी लेखच असतो. "

आणि यानंतर जवळजवळ तासभर ' पिच्छा ' कशी ठिकठिकाणी पातळ झाली आहे, त्यात कुणी म्हणे उंची नव्हती, कुणी म्हणे खोली नव्हती, कुणी म्हणे 'नवकथा' मासिकात ती छापलीच नसती, कुणी म्हणे ' नवकथा ' अगदीच भुक्कड मासिक आहे, अशी चर्चा झाली. कार्नेजीसाहेबांना ही चर्चा फारशी कळली नसावी, हे त्यांच्या चेहऱ्यावरूनच स्पष्ट होत होतं. उंची, खोली,... पातळ, छे...छे...' पिच्छा ' गोष्टीवरून चाललेली चर्चा असंख्य कथांना व लेखकांना बगल देत देत संपुष्टात आली.

आम्ही येथून बाहेर पडल्यावर कार्नेजीसाहेब म्हणाले,

" अमेरिकेत या गोष्टीचं कुणी आजवर नावदेखील कधी घेतलं नाही...पण चर्चा मात्र चांगली रंगली. आमच्या टीकाकारांना इथल्या लेखकांकडून बरीच विशेषणे शिकण्यासारखी आहेत. "

त्याच दिवशी दुपारी आम्हांला प्रोफेसर ठोसर यांचं चहाचं आमंत्रण होतं. वास्तविक पाहता ठोसर म्हणजे केमिस्ट्रीचे प्रोफेसर. त्यांच्याशी कार्नेजीसाहेबांनी बोलायचं तरी कुठल्या विषयावर ? पण या ठोसरांना ही अशीच खोड होती. विलायतेहून कोणीही मनुष्य आला, की त्याला आपल्या घरी चहाला बोलवायचं. ती हकीकत मग ते रंगवून रंगवून दुसरा पाहुणा आपल्या घरी येईपर्यंत सर्वांना सांगत.

ठोसरसाहेबांच्या घरी जाईपर्यंत मीही चिंताग्रस्त होतो; पण मी मनाशी म्हटलं, ' जगभर मित्र जोडणारा हा अमेरिकन माणूस काहीतरी वाट काढील. '

ठोसरसाहेबांच्या घरी स्वागत तर फार चांगले झालं. बंगल्यांत प्रवेश करता करताच कार्नेजीसाहेब एका मोगऱ्याच्या रोपट्याजवळ थांबले, " किती सुरेख फुलं आहेत ही ? "

तसं त्यांनी म्हणताच ठोसरांनी, " आम्ही तीन वर्षांपूर्वी हा बंगला घेतला,' तेव्हा जागा कशी उजाड होती, " इथपासून सुरवात करून पंधरा मिनिटं आम्हांला सर्वांना उन्हात उभं करून मोगऱ्याची हकीकत सांगितली. शेवटी मी सुचवलं तेव्हा कुठं आम्ही घरात गेलो.

कार्नेजीसाहेबांचा नेहमीचा एक आवडता सिद्धांत असा, की नेहमी दुसऱ्याला बोलतं करायचं. दुसऱ्याचं बोलणं शांतपणं ऐकून घ्यावं, समजून घ्यावं. तसं केल्यानं तो मित्र जोडला जातो व आपलं काही काम असेल, तर तेही साधतं. त्यांच्या या सिद्धांताला अनुसरूनच त्यांनी ठोसरांना एक प्रश्न केला.

" कम्युनिस्ट राष्ट्रांतही शास्त्रीय ज्ञानाची प्रगती पाश्चिमात्य राष्ट्रांइतकी झाली असेल काय ? "

यानंतर तब्बल पावणेदोन तास मी व कार्नेजीसाहेब.हाताची घडी करून गप्प बसलो होतो. कम्युनिस्ट राष्ट्रांत शास्त्रीय ज्ञान कसे प्रगत आहे, कम्युनिस्ट राष्ट्रांत शास्त्रज्ञाला काय भाव आहे, कम्युनिष्ट लोक तरीही राजकारणात कसे पाजी आहेत, अमेरिकेने काय केले पाहिजे, हिंदुस्थानात लोकशाहीची जोपासना का होत नाही, आमचं पुणं कॉर्पोरेशन काय फालतू आहे, अशी अनेक स्टेशने घेत घेत ठोसरसाहेबांची गाडी, पुण्यात साली देवीची साथ का पसरली आहे, कोण जाणे ? या स्टेशनावर येऊन क्षणभर विसावली, तोच मी कार्नेजीसाहेबांना खुर्चीवरून सरळ उठवून घराबाहेर काढलं.

पहिल्या दिवसाचे कार्यक्रम हे असे संपले. या कार्यक्रमाबाबत कार्नेजीसाहेबांची काय प्रतिक्रिया झाली, हे समजून घेण्याचा मी काही प्रयत्न केला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही चहा घेत होतो, तोच फोन आला. फोन करणाऱ्या इसमास कार्नेजीसाहेबांशी बोलायचं होतं. कार्नेजीसाहेबांच्या पुस्तकाचं असंख्य वेळा पारायण केलेल्या महामुनी नावाच्या एका इसमाचा हा फोन होता. ' तुम्हाला भेटण्याची फार जुनी इच्छा आहे. कसंही करून याच, " आम्ही कबूल केलं आणि त्याप्रमाणे गेलो.

महामुनींच्या दारात पाऊल टाकताच महामुनींनी कार्नेजींच्या पुस्तकातला महत्त्वाचा सिद्धांत--Smile--हसा, हसतमुख असा, हा धडा गिरवला. हसतमुखानं आमचं स्वागत झालं. थोड्या वेळात चहा आला.

Let the other man do the talking. नेहमी दुसऱ्या माणसाला बोलू द्या, हा नियम याचवेळी दोघांनीही अमलात आणला, असे दिसले. कार्नेजीसाहेबही काही बोलले नाहीत आणि महामुनीही काही बोले ना ! पंधरावीस मिनिटे तशीच शांत गेली. दोघंही हसतमुख बसले होते. मी मध्येच काहीतरी बोलून पाहिलं, पण त्यावर कोणीच काही बोललं नाही. मोठी चमत्कारिक अवस्था निर्माण झाली. दोघंही अर्धा तास Let the other man do the talking म्हणून गप्प बसून

राहिले. मला शेवटी राहवलं नाही, तेव्हा मी कार्नेजीसाहेबांना तेथून उठवलं आणि आम्ही बाहेर पडलो.

दुपारी चारला कार्नेजीसाहेबांचा एका ठिकाणी सत्कार-समारंभ होता व तेथे बरीच मंडळी उपस्थित झाली होती. पुण्यातला कार्नेजीसाहेबांचा हा शेवटचाच कार्यक्रम होता. तो चांगला पार पडला, म्हणजे मी मोकळा होणार होतो. कार्नेजींचं भाषण ऐकण्यापेक्षाही हा 'गोडबोल्या' साहेब (बंडोपंत मोकाशींनी हे विशेषण वापरलं) दिसतो कसा, याबाबतही पुष्कळांना उत्सुकता होती. कॉलेजच्या पोरा-पोरींनी तर ही गर्दी उडवली होती. समारंभाच्या ठिकाणी पोहोचताच भलामोठा जनसमुदाय पाहून कार्नेजीसाहेब आनंदून गेले व त्यांनी माझ्याजवळ तसं बोलूनही दाखवलं. मी त्यांना म्हणालो--

" Public Speaking बद्दल तुम्ही उत्कृष्ट पुस्तक लिहिले आहे, तेव्हा अशा सभा जिंकण्याचं तुमच्याजवळ निश्चित सामर्थ्य आहे. "

थोड्याच वेळात सभेला सुरवात झाली. प्रास्ताविक बोलणाऱ्यानं कार्नेजीसाहेबांची ओळख करून देण्याचा अर्धा तास खटाटोप केला व 'हा जादुगार आहे', 'हा माणसांना भुरळ पाडतो', 'पक्का गोडबोल्या आहे', 'दोस्तीची किल्ली सदैव याच्या जानव्याला बांधलेली आहे', वगैरे वगैरे भरमसाट भाषणातच बराचसा वेळ गेला. नंतर कार्नेजीसाहेबांनी मात्र खरोखरच चांगलं भाषणं केलं. त्यांच्या भाषणा-वर श्रोतृसमुदाय चांगलाच खूष दिसला, पण भाषणाच्या शेवटी त्यांनी अमेरिकन माणसासारखा भारतीय मनुष्य मोकळेपणानं बोलत नाही, वागत नाही अशी प्रेमाची तक्रार आहे, असे विधान केले. वस्तुतः त्यांनी हे विधान केले त्यात काही फारसे खोटे नव्हते व भारतीयांना खवळून जाण्यासारखेही काही नव्हते; पण त्यांच्या भाषणानंतर घोतर झटकीत एक जण व्यासपीठावर चढला व मला बोलायचं म्हणू लागला. वस्तुतः हा प्रकार पुणेकरांना नवीन नव्हता, पण कार्नेजीसाहेब या प्रका-रानं चकितच झाले. उगाच कटकट नको, म्हणून सभाचालकांनी त्याला बोलायची संधी दिली. त्या उपवक्त्यानं अमेरिकन लोकांची चांगलीच हजेरी घेतली. त्याच्या नंतर आणखी दोनतीन उपवक्ते पाठोपाठ व्यासपीठावर आले आणि हा हा म्हणता त्यांनी अमेरिकन मनुष्य कसा ढोंगी, मतलबी, फसवा वगैरे वगैरे असतो, ते मोकळ्या मनानं सांगितलं.

सभेच्या एरवीच्या शिरस्त्याप्रमाणे कार्नेजीसाहेबांना अध्यक्षांनी विनंती केली, की उपवक्त्यांना त्यांनी थोडक्यात उत्तरे द्यावी. कार्नेजीसाहेब संतापल्यासारखे स्पष्ट दिसत होते. प्रथम तर मिनिटभर ते उठलेच नाहीत, पण नंतर काहीतरी विचार करून उठले.

" आम्ही अमेरिकन लोकदेखील माणसेच आहोत. तेव्हा आमच्यात देखील काही दोष असणे स्वाभाविक आहेत. परंतु एवढ्या मोकळेपणानं मला कुणी कधी

ते ऐकवले नव्हते. आमच्यातले दोष ठळकपणे आम्हाला कळतील, अशा तऱ्हेने सांगितल्याबद्दल उपवक्त्यांचा मी फार आभारी आहे. "

सभेचं वातावरण फारच गढूळ झालं होतं. अध्यक्षांनीही थोडं चमत्कारिकच भाषण केलं. सभा एकदाची संपली.

तेथून आम्ही निघालो ते काहीही न बोलण्याच्या मन:स्थितीतच !

तासाभरानं आम्ही स्टेशनवर जायला निघालो. तोपावेतो कार्नेजीसाहेब काहीही बोलले नाहीत. साहेब पक्का चिडलाय्, असं बंडोपंत मोकाशी मला बाजूला घेऊन दोनदा म्हणाले

स्टेशनवर टॅक्सीतून प्लॅटफॉर्मपर्यंत सामान नेताना काहीतरी डाग हमालानं खाली पाडला, तेव्हा तर कार्नेजीसाहेब भरमसाट संतापला व चक्क भांडला व अस्तन्या वर सारून हमालाचे अंगावर चालून गेला; पण आम्ही मध्ये पडलो.

गाडी थोडी लेट होती. काहीतरी तर बोलायला हवं होतं. बंडोपंत मोकाशी साहेबांना म्हणाले—

" तुम्ही आता हमालाशी भांडलात ना, तेव्हा मला खरंच बरं वाटलं, आनंद वाटला. माणूस असा भांडला पाहिजे. सारखा गोड बोलतो म्हणजे काय ? मित्रच कशाला सारखे जोडायला पाहिजेत ? चार शत्रूही असायला हरकत नाही. आम्हा पुणेकरांना असं वागलेलं फार आवडतं..." असं म्हणून बंडोपंत मोकाशी दिलखुलास हसले.

पण साहेबाचा पारा आणखीनच वर गेला. गाल फुगवीत साहेब म्हणाला—

" नॉन्सेन्स...हा रानटीपणा आहे. "

तेवढ्यात गाडी सुटली.

आठदहा दिवसांनी कॅलिफोर्निआतून पत्र आलं—

" माझी पुण्याची भेट या जन्मी तरी विसरणार नाही...माझ्या पुस्तकात असंख्य ठिकाणी सुधारणा हव्या आहेत, हे पंचवीस आवृत्त्या निघाल्यानंतर पुणेभेटीनं मला कळलं. की पुण्यासाठी वेगळंच पुस्तक लिहू ? "

●



आम्ही भावंडं ज्यावेळी डोक्यात पिंगा घालीत असलेल्या काही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी, डोक्यात मूळ धरून बसलेल्या काही गोष्टी रुजवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत बसतो, आजूबाजूचं भान विसरून, लोकांच्या दृष्टीने एकलकोंडेपणा पत्करीत असतो, त्यावेळी सारीजण म्हणतात, "ही यांची सामंती डोकी बघा. एकदा एक खूळ यांच्या डोक्यात शिरलं, की चार लोकांसारखं साधं शिष्टाचाराचं वागणंही यांना जमत नाही." काही कुचेष्टेने तर काही कौतुकाने असं म्हणतात आणि खरंही आहे ते ......

# माझे आई-वडील

**सौ. वसुधा पाटील**

इथून सातआठ पायऱ्या चढून वर गेलं, की उजव्या हाताला ब्लॉक लागेल. तो पूर्वी आमचा होता. आता तिथं आमचे शेजारी राहतात. बाहेरच्या खोलीत त्यांनी सोफासेट ठेवला आहे. मोठी थोरली शोकेस मांडली आहे. जमिनीवर लिनोलियम पसरले आहे आणि भिंतींवर तीन काश्मिरी उडते पक्षी लावले आहेत. भिंतींना रंग फिक्का पोपटी आहे. खिडक्यादारांना लावलेले झुलते पडदे गडद हिरवे आहेत.

झुलत्या पडद्याआडून माजघराचा थोडासा भाग दिसतो. गोदरेजची दोन मोठी कपाटं, एक जुन्या काळचा नक्षीदार शिसवी पलंग आणि टेबल, खुर्चीचा थाट ओझरता दिसतो न दिसतो. तसंच दुसऱ्या पडद्याआडून बेडरूममधील नव्या स्टाईलचे दोन बैठे पलंग, ड्रेसिंग टेबल, एक आरामखुर्ची आणि एक सुरेख छोटे मेज, हाही संच दिसतो.

आणखी एक आत खोली आहे. शिवाय स्वयंपाकघर, छोटा पॅसेज आणि बाथरूम वगैरे मागील बाजूस आहेतच. घर ऐसपैस आहे. पूर्वीच्या थाटाचं आहे. दारंखिडक्याही प्रशस्त आहेत. शेजाऱ्यांनी सजवलंही छानच आहे. अगदी टापटीप आणि स्वच्छ ठेवलं आहे, पण मला मात्र ते परकं वाटतं, फार परकं वाटतं; इतकं की जसे काही या घरात आम्ही कधीकाळी राहिलोच नव्हतो असं वाटतं. उघड्या दारातून जा–ये धावपळ, कधी केलीच नव्हती. या लाल सिमेंटच्या लादीवर लोळूनलोळून दंगामस्ती केलीच नव्हती. सर्व सुखांनी भरलेला बालपणीचा काळ या घरात जणू घालवलाच नव्हता, असं वाटतं. तेच आमचं घर, आता या क्षणाला परक्या माणसासारखं, निर्विकार, मुखस्तंभ बसल्यासारखं वाटतं. पूर्वी हे घर बोलायचं. हसायचं. खिदळायचं. आमच्याबरोबरच झोपी जायचं नि आम्ही उठताच आपणही उठून वाकुल्या दाखवायचं. फार नाही, वीसबावीसच वर्षं झाली असतील की त्याला आम्ही हे घर सोडून गेल्याला-तेवढ्या अवधीत, एवढं नटूनसजूनसुद्धा हे असं घुमं होऊन बसलंय्! एखाद्या मुक्या नवरदेवासारखं ? हट्टी मांजरासारखं ! कौलारावर एकटाच बसलेल्या पारव्यासारखं !

बरोबरच आहे. या एवढ्या मोठ्या प्रशस्त घराला खूप माणसांत राहायची सवय होती. गडबड गोंगाटाशिवाय त्याला चैन पडत नव्हतं आत राहतात माणसं इनमीन तीन– मुलगा, सून आणि सासरेबुवा– चौथं माणूस राहायला येईल तेव्हा येईल. छोट्या पावलांनी चालेल तेव्हा चालेल; पण तोवर हे असंच ढिम्म बसून राहणार. आणि आम्ही होतो तेव्हा ! बावीस वर्षांपूर्वी ! भाऊ आणि काकू होत्या तेव्हा ? तेव्हा कसं होतं हे घर ? कसं हसत होतं ? कसं खिदळत होतं ?

अंधुकसं आठवतंय्! हे असे पडदेबिडदे नव्हते त्यावेळेस. असं किमती, सुबक आकाराचं फर्निचरही नव्हतंच ! रंगही भिंतींचा मला वाटतं विटकाच होता. मूळचा पिवळा पण आमच्या वापरण्याने काळपट झालेला. सिमेंटचा कोबाही अगदी उघडा थंडगार आणि लालभडकच होता. त्यावेळी भरगच्च जर काय असेल घरात, तर ती राहणाऱ्यांची संख्या आणि पुस्तकांनी हारोहार भरलेली कपाटं. आम्ही भावंडं, दोन गडी नि आईवडील मिळून बाराजण तर कायमच राहणारी नि शिवाय रोजच कुणी नातेवाईक, कुणी पाहुणे म्हणून येणारी कमीत कमी दोन आणि जास्तीत जास्त हवी तेवढी अशी माणसं मिळून पंधराएक जणांचा तरी चमचमीत स्वयंपाक सकाळ, संध्याकाळ स्वयंपाकघरात रोज शिजायचा आणि दर महिन्याला प्रसिद्ध होणारी मासिकं, नवीन कादंबऱ्या, नवीन नाटकं, इंग्रजी आणि मराठी अशी दोन्ही भाषांतली पुस्तकं घरी यायची नि कपाटांचे खण खच्चून वरपर्यंत भरत जायचे. एक कपाट भरलं, की दुसरं भरायला सुरवात व्हायची.

भाऊंना–आमच्या वडिलांना–विलक्षण नाद तीन गोष्टींचे होते. एक वाचनाचा. त्याहीपेक्षा वरचढ असा दुसरा चमचमीत खाद्यपदार्थ आवडीने खात राहण्याचा

नि तिसरा, जे जे वेचक नि सुंदर असेल, ते तें पडेल ती किंमत देऊन विकत घेण्याचा, पाहण्याचा नि ऐकण्याचा. आणखी एक फार मोठी हौस त्यांनां होती; ती म्हणजे, माणसं भोवती गोळा करायची, खाण्यापिण्याची चंगळ उडवायची नि स्वत:च्या खर्चाने लांबलांबच्या सहली काढायच्या.

या नादांपायी त्यांनी अतोनात खर्च केला. आपल्यामागे काही शिल्लक राखली नाही नि काकूला, आमच्या आईला आपल्यामागे अव्यवहारी, बेहिशोबी कारभाराने फार अडचणीत टाकलं. भाऊ होते तोवर आम्ही फार चैनीत, अगदी सुखात वाढलो. आमचे विशिष्टरीतीनेच पण नानापरीनें लाड पुरविण्यात आले होते, पण भाऊ गेल्यानंतर आम्हांला अतिशय साध्या नि काटकसरीच्या राहणीतही राहावे लागले; त्याचेच काकूच्या मनाला फार क्लेश झाले; पण आम्हाला ते जाणवले नाहीत. कारण आमची घडणच काही निराळी झाली होती. त्या अत्यंत रुक्ष आणि तणा-तणीच्या दिवसांतही आम्हांला कधी फारसं दु:ख जाणवलं नाही. आम्हा लहानांना अजाण म्हणून नाही नि मोठ्यांना त्यांची विशिष्ट वृत्ती आणि दृष्टी म्हणून नाही. त्रास जो झाला, मनात शल्य जे रुतून बसलं, अपेक्षेबाहेर सोसणं अपरिहार्य जे झालं, ते काकूला. तिच्याच्याने फारसं ते सोसवलं नाही. आधीच ती मनाने फार खचली होती. त्यातच टॉयफॉइडच्या आजाराचं निमित्त होऊन भाऊंच्या पाठोपाठ चारच वर्षांनी ती गेली—आणि एवढ्या मोठ्या घरात आम्ही भावंडं एकटीच राहिलो.

काकूंची सवाष्ण मूर्ति अंधुकशी आठवतेय्, ती चैत्रगौरीच्या हळदी–कुंकवाच्या वेळची. रात्रभर खपून आम्ही चैत्रगौरीची उत्तम आरास मांडायची. दोन्ही कपाटां-तील सुंदरसुंदर खेळणी गौरीसमोर मांडताना काकूही सामील व्हायची. एरवी तिचा तो पिंड नव्हता. मुलांत बसून हसणं, खिदळणं, तिच्या तापट स्वभावाला मानवण्या-सारखं नव्हतंच; पण काही दिवस असे होते, त्या दिवशी ती आमच्यात मिसळून जायची. गालातल्या गालात हसत राहायची. चैत्रगौरीचा दिवस, गणपतीचा आणि दिवाळीचा ! हे दिवस त्यांतलेच असायचे—रात्रभर जागूनही पुन: दुसऱ्या. दिवशी नव्या उत्साहाने ती कामाचे ढीग उपसायला लागायची. कारण घरची कर्तीसवरती अशी तीच मुख्य स्त्री. शिवाय घर हळदीकुंकवाच्या निमित्ताने नातेवाइकांनी भरलेलं. कामामागून कामं निघायची नि दुपारी पळभराचीही विश्रांती न घेता, बायका हळूहळू यायला लागल्या, की नटूनसजून हळदीकुंकू वाटण्याची सुरवात करायला लागायची, पण काकू त्यावेळी हसतमुख असायची.

फारच अंधुकसं आठवतंय्. गंडेरी पदराचा जरीकाठी, भरजरी निळा जर्द रास्ता किंवा कुसुंबी रंगाची पैठणी, तशीच जरीची दंडांत रुतून बसलेली चोळी, गोठ, पाटल्या, वाकी, यांनी भारी सुंदर दिसणारे गोंडस हात आणि हिऱ्याच्या कुड्या नि हिऱ्याची नथ घातल्याने झळाळून उठणारा, घरघरीत नाकाचा, पाणीदार डोळ्यांचा,



**खानदानी सौंदर्याचा तो एक आगळाच नमुना होता.**

हसरा, सावळासा काकूचा चेहेरा, या साऱ्याच गोष्टी इतक्या उठून दिसायच्या, की आलेल्या बायका चकित होऊन पाहातच राहायच्या. मला आठवतंय्, कुठल्याही लग्नसमारंभात, उत्सवात, कार्यक्रमांत ती अशी नटूनसजून गेली, की प्रथमदर्श-नीच सर्वजण चकित होत. तिचं व्यक्तिमत्त्वच तस जबरदस्त होतं. रुबाबदार, खानदानी सौंदर्याचा तो एक आगळा नमुना होता; पण तिला त्या सौंदर्याचा गर्व अथवा अभिमानही नव्हता. करारी तापट स्वभाव सोडला, तर चार सामान्य स्त्रियांसारखीच तीही आतिथ्यशील, चार माणसांत स्वत:ला सामावून घेणारी आणि माणसं जोडून धरणारी होती. तिने माहेरच्या माणसांसाठीही केलं नि सासरची जी काही थोडीबहुत माणसं होती, त्यांनाही नीट सांभाळून घेतलं आणि तेही आपल्या तापट स्वभावाला मुरड न घालता, हे तिचं वैशिष्ट्यच.

भाऊंनी तिच्यासाठी काय केलं ! मला तर काहीच आठवत नाही. या घरात असताना ती खूप आनंदी होती, ऐश्वर्य भोगीत होती, या घराच्या प्रत्येक खोली-तून ताठ मानेने वावरत होती, नाना तऱ्हेचे मनसुबे रचीत होती, हे मात्र निश्चित.

पुढं मान जरी सवयीनुसार ताठच राहिली, तरी मनसुबे पार लयाला गेले; हेही तेवढंच खरं. भाऊंनी, मला वाटतं, तिला त्यावेळच्या बायकांच्या मानाने खूपच काही जास्त दिलं. तिला स्वातंत्र्य दिलं, सगळचाच अर्थांनी – आर्थिक व्यवहार तिच्याच हाती दिला. घरचं कर्तेपण आपण होऊन तिच्या स्वाधीन केलं. शिवाय ती स्त्री आहे, असा सर्वसामान्य कोता दृष्टिकोन न ठेवता तिला आपल्या बरोबरीनेच घरात मानाचं स्थान दिलं आणि बरोबरीच्या नात्याने वागवलंसुद्धा. लोकांसाठी नाही, स्वतःच्या विशिष्ट स्वभावानुसार.

बाह्यतः भाऊ आणि काकू हे जोडपं संपूर्णपणे विजोड होतं. काकू सुंदर, तर भाऊ कुरूप. काकू अबोल, तर भाऊ मुलखाचे बडबडे. शिवाय बोलण्यात पुष्कळदा वाह्यातपणा असायचा, खोचकपणा असायचा, तो निराळाच.काकू कामाच्या बाबतीत वागणुकीत अत्यंत काटेकोर आणि शिस्तीची आणि टापटिपीची, स्वच्छतेची भोक्ती होती. तर भाऊंचा सर्वस्वी गबाळग्रंथी कारभार. विरोधाच्या किती म्हणून गोष्टी सांगाव्यात ! जवळजवळ दोघांच्या आवडीनिवडी, सवयी, स्वभाव, या सर्वच गोष्टींत जमीनअस्मानाचा फरक-पण मला आठवतं नाही, की या घरात चारचौघांदेखत, आम्हा मुलांच्यादेखत कधी त्यांची बोलाचाली झालीय्, की कधी अबोला, धुसफूस सुरू झालीय् किंवा शब्दाशब्दी होऊन भांडणानं अगदी परिसीमा गाठलीय्-कधीच असं घडलं नव्हतं-माणसंच होती तीही. एकमेकांना टोचून बोलणं, रागावणं, भांडणं हे सारं व्हायचंच, पण अत्यंत मर्यादित स्वरूपात-विशिष्ट पद्धतीनेच आणि तेही आमच्यादेखत तर नाहीच नाही. उलट शेवटी त्या भांडणांचं पर्यवसान तर भाऊंच्या चेष्टामस्करीत आणि आमच्या हसण्याखिदळण्यातच व्हायचं. या बाबतीत मात्र भाऊंपुढे काकूला हार खावी लागे. एरवी भाऊंनी तिचे सारे हट्ट पुरवले, सर्व काही तिच्या मनासारखं केलं, पण काही बाबतीत ते आपलाच हेका धरीत नि खरा करून दाखवीत. काकूला तो मानून घ्यावा लागे.

पाहुण्यारावण्यांची दोघांनाही आवड. त्यांच्यासाठी पैसा खर्च करण्याची भाऊंना आणि कष्ट घेण्याची काकूला–दोघांनाही भलतीच हौस. त्यामुळे घर सदोदित भरलेलं असायचं, खाण्यापिण्याचे फराळाचे भरपूर पदार्थ डब्यांनी फळचांवर भरलेले असत, पण भाऊंना विकतचं घेऊन खाण्याचाही अनिवार सोस. क्रॉफर्ड मार्केटमध्ये जे नवीन फळ पहिल्या प्रथम येईल, ते पडेल ती किंमत देऊन करंडचांनी ते घरी घेऊन यायचे. त्याशिवाय चॉकलेटस्, तऱ्हेतऱ्हेच्या केक्स, बिस्किटं यांचेही पुडकेच्या पुडके घरी येत. शिवाय या ना त्या निमित्ताने मेवामिठाई, सुकामेवा, कमीजास्त भावाने, पाळीपाळीने, रुचिपालट म्हणून आणीतच आणि एवढं सर्व आणूनही फरसाणवाल्याकडच्या शेवगाठचा, अळूवडचा यांचा रतीब लावल्याशिवाय त्यांना चैनच पडायचं नाहीं. काकूला हेच आवडत नसे. त्याकाळी असं बाजारचं खाण्याची तशी पद्धतच नव्हती, पण भाऊ कुठे असे पद्धतीबिद्धतींना

जुमानणारे होते ? मधल्या हॉलमध्ये पुडकी सोडून ते बसायचे आणि याची चव घे, ते तोंडात टाक, असं करीत साऱ्यांची वाटणी काढायचे. गड्यांपासून ते शेजारी-पाजारी जे जमले असतील, त्यांच्यापर्यंत सर्वांची वाटणी आणि मग जेवायची वेळ झालेली असली, तरी गप्पागोष्टी करीत, हंसतखिदळत साऱ्या पदार्थांचा फन्ना उडवीत बसायचे. राखून ठेवणं, लपवून खाणं आणि खाऊ घालणं, हे त्यांना माहीतच नव्हतं. भरपूर आणायचं, समोर असतील त्यांना वाटायचं नि स्वत: खायचं; यातच त्यांना आनंद व्हायचा. विलायती चीजच्या डब्यांपासून अल्युखार, पीच, काबुली, द्राक्ष, सफरचंदापर्यंत अनेक महाग महाग, किंमती खाद्यपदार्थ त्यांनी आम्हांला खाऊ घातले आणि कितीतरी पैसे उधळले. काकूचा जीव तिळतिळ तुटायचा. निदान आणलेल्या दुर्मिळ वस्तू राखून, पुरवून पुरवून मुलांना खाऊ घालाव्या, यासाठी तिचा फार आग्रह असे पण भाऊंनी कधी तो आग्रह मानला नाही. हा भरमसाट खर्च करताना त्यांना कधीच काही वाटलं नाही, तसाच काकूलाही हवातसा खर्च करू देण्यात त्यानी काकू कधी केली नाही. हळदीकुंकवाच्या वेळी, चांदीचे मोठाले पेले भरून पन्हं वाटताना, दोन दोन पिंपं भरून तयार केलेलं पन्हं खलास होऊन जाई. नुसत्या फुलांच्या ऐवजी वायकांना वेण्या वाटल्या जात आणि तीनतीन, चारचार पसा भरून भिजलेल्या चण्यांनी ओटया भरताना दोनदोन हारे केव्हाच संपून जात. पण भाऊ एका शब्दाने बोलत नसत. कधीही, कुणासाठीही, कसाही खर्च करण्याची तिला पूर्ण मुभा होती, तर ती कुठल्या तोंडाने भाऊंना अडविणार ? तरीही कधी तरी ती म्हणेच, "घरात चांगलंसं फर्निचर नाही. मुलांना छानछान कपडे शिवायला हवेत. मुलांच्या शिक्षणासाठी राखून ठेवायला हवं. अशी उधळपट्टी करू नका", पण भाऊ ते म्हणणं उडवूनच लावीत. म्हणत, "जरूर काय फर्निचरची ? आवश्यक तेवढं आहे ना ? बस्स झालं. पोरांचं पुढे पोरं बघतील. आणि एक सांगतो, कपड्यांचा, नसत्या चष्कीचा सोस आपण त्यांना लावायचा नाही. चांगलं तेवढं देऊ या."

चांगलं म्हणजे त्यांनी काय दिलं ? मला नीटसं काही सांगताच येत नाही, पण त्यांनी फार उंची आणि अतिशय सुंदर अशी खेळणी दोन कपाटं भरून आमच्यासाठी आणली. त्यांची हौस म्हणून आणि आम्हांला करमणूक म्हणून. चावी देऊन यंत्राच्या कळीवर चालणारी ती रंगीबेरंगी खेळणी हलताना, डोलताना, आवाज करताना पाहण्यात आम्ही देहमान हरपून तासचेतास घालवीत असू नि आमच्याचबरोबर भाऊही. फार लहानपणापासून भाऊंनी आम्हांला रंगपेटचा, कागद आणि ब्रशेस हाताळायला दिले. मेकॅनो वापरायला दिला आणि मोठ्या बहिणी लहान असतानाच शिवण्याचं यंत्र आणून त्यांच्या ताब्यात दिलं. शिवणाचे त्यांनी सतरा प्रयोग करून पाहावेत, म्हणून विणकाम, भरतकामाचं सारं साहित्य हौसेने

आणून दिलं आणि प्रत्येकाने केलेल्या बारक्यासारक्या कामाचंही तोंड भरून कौतुक केलं. आल्या गेल्याजवळ ते बोलून दाखवलं. काकूला हे अजीबात जमत नसे नि आवडतही नसे, फक्त गालातल्या गालात हसून कौतुक करण्याची तिची पद्धत होती. म्हणून तिचं कौतुक आम्हांला कधीच समजत नसे आणि तिच्यापेक्षा भाऊ आम्हांला जास्त जवळचे वाटत. जवळ घेणं, पापे घेणं, कुरवाळणं, बोबडं बोलणं हे सारं काकूपेक्षा भाऊंनीच जास्त केलं, म्हणून वेळप्रसंगी त्यांच्या हातचा भरभक्कम मार खाऊनसुद्धा आम्हांला काकूपेक्षा भाऊंचं प्रेम फार वाटायचं.

वास्तविक दोघेही तसे स्वभावाने कडकच. मुलांनी लाडालाडात मलभलते चाळे केलेले, दुरुत्तरे केलेली अथवा बेशिस्त वागलेलं दोघांनाही अजीबात चालत नसे. खरपूस शिक्षा मिळायच्या, पण शिक्षा देण्याच्या दोघांच्याही पद्धतीत फरक असायचा. त्यामुळे काकूने दिलेल्या शिक्षेमुळे तिच्याविषयी दुरावा वाटायचा, परकेपणा वाटायचा, पण भाऊंच्या शिक्षेमुळे तात्पुरता संताप येऊनही, तोंडात फेरडॉलचा एक चमचा अथवा कॅडबरीचा एखादा तुकडा पडताच, सारा अपमान विसरून पुन: भाऊंच्या गळी पडावंसं वाटायचं.

भाऊ रसिक होते. लहर लागेल त्यावेळी आम्हांला सर्वांना व्हिक्टोरियातून समुद्रावर फिरवून आणीत आणि वाळूत बसल्याबसल्या कुलपी मलाई, आइस्फ्रूट, चणे, शेंगदाणे, ज्याला जे हवं असेल ते खाऊ घालीत. एखादी बसच्या बस भाड्याने ठरवीत आणि दोनदोन दिवसांच्या लांबलांबच्या सहली काढीत. माऊंट मेरीच्या जत्रेला दरवर्षी घेऊन जात आणि तिथे असलेल्या प्रत्येक गमतीजमतीत आम्हांला भाग घेऊ देत. गंधर्व कंपनीची, ललितकलादर्शची किंवा बलवंत कंपनीची, जी जी नाटकं प्रसिद्धीस येत, ती ती सारी नाटकं आधी आपण पाहून येत नि मागाहून मोठ्या भावंडांना नि काकूला अगत्याने नेऊन दाखवत. आम्हांला लहानांना नाटकांना बंदीच असायची. म्हणून त्याची उणीव सर्कस अथवा एखादा चांगला सिनेमा दाखवून भरून काढीत. भाऊंनी भिंतींवर मोजक्याच तसबिरी लावल्या. काही रविवर्म्याच्या नि काही पाश्चात्त्य देशांतील उत्तम निसर्गचित्रांच्या. ग्रामोफोन त्यांनी आवडीने आणला, पण तबकड्या निवडल्या रागदारी संगीताच्या आणि उत्तम नाटकांतील सुरेल पदांच्या आणि भक्तिगीतांच्या. कानाला लावून ऐकण्याचा रेडिओसेटही त्यांनी आणला, पण संगीताचा आणि नाटकांचाच कार्यक्रम रात्री ते स्वत: ऐकत बसत. फर्निचरऐवजी त्यांनी सुरेख अशा वस्तू विकत आणल्या. बिलोरी काचेचे वेचक सामान, एखादे हस्तिदंतातील शिल्प, एखादा संगमरवरी शिल्पाचा नाजूक नमुना, एखादे लाकडी कोरीव कामाचे सुरेख पुष्पपात्र किंवा लहानमोठ्या शिंपांच्या सुरेख वस्तू. या साऱ्या गोष्टींचा त्यांत समावेश असे. सेंट्सच्या नाजुक सुवासापेक्षा उंची अत्तरांचा मादक सुगंध त्यांना आवडे-अत्तरांचे ते तसे षोकीन नव्हते; पण घरात अत्तराच्या कुप्या आणून ठेवलेल्या असत.

त्या मानाने काकूची रसिकता थिटीच पडे. ती एक साधी, व्यवहारी, सरळसोट स्वभावाची आणि चार माणसांची आवड असणारी स्त्री होती. तिचं बोलणंही अगदी सरळ असायचं. आडवळणानं बोलणं, खवचट बोलणं तिला कधी जमायचंच नाही. रागावली तर सरळसरळ फटकारून बोलायची, पण मागाहून मनात काही ठेवायची नाही. त्यामुळे कधी कधी खवचट बोलण्यामुळे, जिव्हारी झोंबणाऱ्या चेष्टा-मस्करीमुळे भाऊंकडून दुखावली गेलेली माणसं आईकडून पुन: जोडली जात. कधी कधी भाऊंच्याच जवळच्या नातेवाइकांना, भाऊंचा खूप राग येई; संबंध तोडण्या-पर्यंत पाळी येई, पण काकूच्या तापट आणि सरळ स्वभावाच्या दडपणामुळे गढूळ झालेलं वातावरण आपोआप निवळून जाई. पुन: ती माणसं झालं गेलं विसरून आमच्या घरी येऊ जाऊ लागत. भाऊ हे सर्व जाणून होते. म्हणूनच काकूला त्यांनी कधीही कमी लेखलं नाही. अरसिक म्हणून हिणवलं नाही, किंवा फारशी शिक-लेली नाही, म्हणून वेळीअवेळी ताशेरे झाडले नाहीत.

भाऊ कट्टर शाकाहारी होते आणि काकू पक्की मांसाहारी, पण याबाबतीतही कधी विरोध निर्माण झाला नाही. काकूने नियमित मांसाहार कमी केला आणि भाऊंनी घरात मांसाहार शिजविण्यास कधीच मनाई केली नाही. त्यांचा आग्रह एवढाच असे, की ज्या दिवशी असे काही पदार्थ शिजवले जातील, त्या दिवशी त्यांचं पान सर्वांच्या आधी वाढलं जावं आणि एकच वाढलं जावं. दुसरं म्हणजे त्यांचं पानही नेहेमीसारखंच वेगवेगळ्या पदार्थांनी भरगच्च भरलेलं असावं. घरात दुसरे पदार्थ शिजताहेत, म्हणून भाऊंच्या पदार्थांत काटछाट नसावी. काकूने त्यांचा हा आग्रह शेवटपर्यंत मानला.

अशा दोघांच्या परस्पर विरोधी कित्येक गोष्टी, पण आमच्या या ऐसपैस घरातलं आनंदी, मोकळं, दृष्ट लागण्याजोगतं वातावरण कधी गढूळलं नाही. शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या कुचाळक्या, गावातील लोकांच्या नसत्या उचापती, भानगडी या कसल्याच गोष्टीत काकूला रस नसायचा, त्यामुळे भाऊंना त्यातल्या त्यात जरा रस असूनही तशा गप्पा कधी आम्हा मुलांसमोर झाल्या नाहीत. गप्पांचे विषय काही निराळेच असायचे. आम्ही सारीजण जेव्हा एकत्रित होऊन गप्पा मारीत असू, हसत खिदळत असू, तेव्हा सर्वांना मान्य असेच ते असायचे.

काकू ही भाऊंची दुसरेपणची बायको. आम्हांला एक सावत्र बहीणही होती. बाकीच्यांचं ठाऊक नाही, पण आम्हा लहान भावंडांना ती आमची सावत्रबहीण होती, हे बरीच वर्षं माहीतच नव्हतं. माझ्या वयाच्या आठव्या वर्षी तिला अप-घाती मरण आलं नि इतर लोकांकडून तिच्या मृत्यूनंतर मला कळलं, की गेली ती आमची बहीण सावत्र होती. काकूने तिला दुजाभावाने कधी वागवलंच नव्हतं. उलट घरची सारी जबाबदारी तिच्या मदतीनेच ती उचलीत असे. स्वत:च्या मोठ्या मुलीपेक्षा काही बाबतीत तिच्यावरच काकूचा विश्वास अधिक होता

आणि याचं सारं श्रेय जसं काकूला तसंच त्या बहिणीलाही होतं. ती होतीच तशी. अतिशयोक्तीची गोष्ट नव्हे, पण काकूपेक्षाही आम्हा सर्व भावंडांना ळळा तिचाच अधिक होता. तिच्याशिवाय आमचं कुणाचंच कधी पान हलत नसे. काकूकडून जे हट्ट पुरवून घ्यायची आमची छाती होत नसे, ते हट्ट आम्ही तिच्याकडून पुरवून घेत असू. काकूला त्याचं कधी दुःख नसायचं, वैषम्य नसायचं. तिच्या लग्नानंतर भाऊंनी तिला जमीन दिली आणि आत्येने छोटसं घर बांधून दिलं, पण मूलबाळ काहीही न होताच, भरल्या संसारातून जेव्हा ती अचानक आणि अशी अपघाताने उठून गेली, त्यावेळी स्वतःची मुलगी जावी, अशा तऱ्हेने काकू रडली. दुःखाने पोळली, कारण भाऊ आधीच निघून गेले होते. त्यात ही भर पडली. काकूला, उमाळे न आवरून ओक्साबोक्शी रडताना प्रथम मी त्या दिवशी पाहिलं. भाऊ वारले, त्यावेळी आम्ही तिच्याजवळ नव्हतो. भाऊ गेल्यानंतर दुसरे की तिसरे दिवशी तिला घरी आणलं होतं. त्यावेळी शुष्क आणि कोरड्या डोळ्यांनी ती आम्हांला जवळ घेऊन बसली होती. कुंकू नसलेला, इतका पांढरा फटफटीत, निस्तेज असा तिचा चेहेरा त्यापूर्वी मी कधीही पाहिला नव्हता, पण त्यावेळीही जाणवला तो तिचा अबोल, पण तरीही बोलका असा हळुवार स्पर्श आणि शुष्क कोरड्या डोळ्यांतील अजूनपर्यंत कधी न जाणवलेली विलक्षण स्निग्धता. फार वेगळं वाटलं होतं त्यावेळी मला, पण दुःखही फार वेळ करीत बसण्याचं ते वयच नव्हतं माझं. भाऊ आमच्यात नसल्याचं दुःखही फार काळ मनात राहू शकलं नाही त्याकाळी. कारण मी अवघी सात वर्षांची होते. त्यानंतर तीनचार वर्षांनी काकूही गेली. त्याचंही दुःख त्यावेळी फारसं जाणवलं नाही. कारण माझं वय होतं त्यावेळी सारं अकरा वर्षांचं. सारं दुःख काय जाणवतं ते आता मोठं झाल्यावर. आमच्याच वयाच्या मुली जेव्हा " माझे आईवडील असं म्हणतात, असं करतात, परवाच आमच्याकडे येऊन गेले, किंवा आम्ही त्यांच्याकडे जाऊन आलो, " असं मोठ्या प्रेमाने, कौतुकाने म्हणतात, त्यावेळी फार उत्कटतेने जाणवतं, की आमच्या मुलांचं, नातवंडं म्हणून कोडकौतुक करायला, मुलांनी दाखविलेली कर्तबगारी बघून आनंदाने मोहरून जायला भाऊ आणि काकू आज हयात नाहीत, आपल्यात नाहीत; पण ही बोचरी जाणीवही फार काळ टिकून राहू शकत नाही; कारण त्यांच्याशिवाय दीर्घ काळ राहण्याची, अनेक सुखदुःखे त्यांच्याशिवायच अनुभवण्याची आम्हांला सवयच होऊन गेली आहे केव्हापासूनची.

पुष्कळ लोक भाऊंविषयींच्या आठवणी सांगतात. कुणाच्या मते ते हाताने अतिशय उदार, पण मनाने संकुचित, कुत्सित वृत्तीचे होते. कुणाच्या मते, ते अतिशय तापट आणि चक्रम डोक्याचे होते, पण हाताने सढळ. कुणी असं म्हणतात, कुणी तसं म्हणतात; पण एक त्यांचा गुण सर्वजण मानतात, तो म्हणजे हाताचा सढळपणा. भाऊ होतेच तसे. कितीतरी विद्यार्थ्यांची फी भरून त्यांनी त्यांच्या शिक्षणाची सोय



केली. अनेक संस्थांना मदत केली. मैत्रीदाखल कुणाकुणाला जामीन राहिले नि नसते व्याप ओढवन घेऊन काळजीने त्रस्त झाले. त्यांच्याशी त्यांचे हे असे संबंध आले, ते त्यांची ही वृत्ती मोठ्या कौतुकाने वाखाणतात आणि कृतज्ञतेने-सुद्धा.

काकूच्या संबंधित लोकांच्या तिच्याविषयीच्या आठवणी फार गोड आहेत. त्या ऐकताना मला नेहमी आश्चर्य वाटतं, की या सर्व लोकांशी इतक्या प्रेमळपणे, इतक्या गोडपणे वागणारी ही बाई आमच्याशी इतक्या ताठरपणे का वागावी? मोठ्या भावंडाना ती आपली लहान मुलं न मानता आपल्या बरोबरीचीच मानत असे. त्यामुळ त्यांच्या आठवणी आमच्यापेक्षा निराळ्या आहेत, पण लहान मुलाचं नि आईचं जे एक वेगळंच नातं आपोआप तयार होतं, ते मात्र आमच्यात कधीच निर्माण झालं नव्हतं, हे मात्र निश्चित; पण तरीही आमचं हे घर फार निराळ्या वातावरणात वावरलेलं होतं आणि ते वातावरण निर्माण करण्यात भाऊ आणि काकू या दोघां-चीच भागीदारी होती, हे आम्हांला मान्य करायलाच हवं.

बाहेरच्या खोलीतल्या सोफावर बसलं, की खिडकीतून पूर्वीच्या व्यायामशाळेचे कंपौंड दिसतं. व्यायामशाळा निघाली तेव्हा तशी पद्धत नसतानाही भाऊंनी मोठ्या बहिणींना प्रथम व्यायामशाळेत पाठवलं होतं. मला वाटतं, मुलींना व्यायामशाळेत

पाठविणारे पालक त्यावेळी तरी निदान भाऊच पहिले होते. त्याच खिडकीच्या खाली, आता जिथं शेजाऱ्यांनी छोटी खुर्ची आणि टिपॉय ठेवलंय्; तिथं पूर्वी आमच्या अभ्यासाचे लोखंडी बाक होते. शेजारीच भाऊंची आरामखुर्ची होती. तिला लागून टेबल होतं आणि अलीकडच्या भिंतीला लागून भाऊंची कॉट होती. काही रात्री अंधुकशा आठवताहेत.

रात्रीचा टेबलावर लावलेल्या टेबललँपचा मंद प्रकाश पसरला आहे. आरामखुर्चीवर बसून भाऊ, चढत्या उतरत्या स्वरात, घिम्या लयीत, चेहऱ्यावर तशीच भावनांची सरमिसळ दाखवीत प्राईड अ‍ॅन्ड प्रेज्युडीस वाचून दाखवताहेत, हार्डीच्या टेसची पानांमागून पानं उलटून वाचताहेत किंवा टेनिसनच्या कविता म्हणून दाखवताहेत नि जमिनीवर बसून, गुढग्यावर हनुवटया टेकून, विस्फारित डोळयांनी, ओठ अर्धवट उघडे टाकून मोठ्या बहिणी उत्सुकतेने ऐकताहेत. कधी हातात शिवणकाम घेऊन काकू खाटेवर बसली आहे नि तिच्यासाठी भाऊ ' पण लक्षात कोण घेतो ' या कादंबरीतलं एखादं सुंदर प्रकरण वाचताहेत. कधी मोठे भाऊ बाकावर बसले आहेत नि त्यांच्यासाठी भाऊंचं ' वीर धवल ' या नुकत्याच विकत आणलेल्या कादंबरीचं वाचन चालू आहे. खरं म्हणजे गडयांच्या मच्छरदाण्या बांधून होईपर्यंतच्या मधल्या काळात मी तिथं झोपेनं पेंगळून कॉटवर पडलेली असायची. त्या वाचनातलं एक अक्षरही कधी मला कळायचं नाही. माझी पेंगुळलेली नजर स्थिर असायची. भाऊंच्या, तुळतुळीत हजामत केलेल्या नि म्हणून दिव्याच्या प्रकाशात चकाकत असलेल्या डोक्यावर—पण अशा कितीतरी रात्री आठवताहेत नि त्या रात्रींचा अर्थ आता डोळयांत प्रकाश आणतो आहे.

आम्ही भावंडं ज्यावेळी डोक्यात पिंगा घालीत असलेल्या काही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी, डोक्यात मूळ धरून बसलेल्या काही गोष्टी रुजविण्यासाठी, आटोकाट प्रयत्न करीत बसतो, आजूबाजूचं भान विसरून लोकांच्या दृष्टीने एकलकोंडेपणा पत्करीत असतो, त्यावेळी सारीजण म्हणतात, " ही यांची सामंती डोकी बघा. एकदा एक खूळ त्यांच्या डोक्यात शिरलं, की चार लोकांसारखं साधं शिष्टाचाराचं वागणंही यांना जमत नाही. " काही कुचेष्टेने, तर काही कौतुकाने असं म्हणतात आणि खरं आहे ते. पण या साऱ्याचं मूळ जर शोधीत गेलं, तर ते या आमच्या जुन्या घरातच ते रुजलेलं दिसेल. भाऊंनी आणि काकूनी; दोघांनीच ते रुजवलेलं होतं. जाणूनबुजून की अजाणता, ते मला सांगता यायचं नाही. त्याला खतपाणी घातलं होतं ते सहेतुक, की निहेतुक, तेही काही सांगता येणार नाही.

भाऊंना नोकरीची काही आवश्यकता नव्हती. वडिलोपार्जित इस्टेट भरपूर होती, पण त्यांनी नोकरी केली शिक्षकाची, एका माध्यमिक शाळेचे ते मुख्याध्यापक होते. आवड म्हणून, की दुसऱ्या कशासाठी म्हणून ते सांगता येत नाही, पण वयात आल्यावर आमच्यापैकी चारजणांनी हौस, आवड म्हणून, जरूर नसतानाही शिक्ष-

काचाच पेशा पत्करला. पहिल्याप्रथम. मागून काहींनी सोडून दिला, ती गोष्ट निराळी. त्याला कारणं निरनिराळी घडली.

समाजस्वास्थ्यापासून मनोरंजनापर्यंत सारी मासिकं, यामा कादंबरीपासून पांढरे ढगपर्यंत साऱ्या कादंबऱ्या, प्रसिद्ध झालेली जवळजवळ सर्व नाटकं आणि कवितासंग्रह, विवेकानंदांची पुस्तकं, आणि आगरकर, टिळक, परांजपे यांचे संग्रहित गंभीर लेख, एवढ्या साऱ्या पुस्तकांनी भाऊंनी कपाटे भरली आणि आम्हांला प्रत्येकाला तासन्‌तास एकटंच वाचीत बसण्याची संवय आपोआप लागली.

वेचक, निवडक त्याच गोष्टी आवडणं, पदराला खार लावून घेऊन संस्थांची काम करणं, एकलकोंड्या माणसासारखं आपल्याच धुंदीत राहणं, विविध कलांचा ध्यास घेणं, त्यासाठी प्रयत्न नि खर्च करीत राहणं आणि या साऱ्या गोष्टींसाठी लोकांची पर्वा न करणं, हे नसते गुण आमच्यापैकी प्रत्येकाच्या अंगात कणाकणाने का होईना, पण रक्तात मुरलेले आहेत. आम्हांला त्यांच्याबद्दल लोकांनी कितीही नावे ठेवली तरी ना खंत ना विषाद. असलाच तर रास्त अभिमानच आहे, पण गर्व नाही. कारण मूळात या जुन्या घराबद्दल मनात फार कृतज्ञता आहे.

आज काकू आणि भाऊ आमच्यात नाहीतही नि आहेतही असं वाटतं ते यामुळेच. एवढं मोठं प्रशस्त घर, शेजाऱ्यांनी इतकं समजावूनही रिकामं, परकं वाटतं ते याचमुळे आणि आयुष्यात कसलेही बरेवाईट प्रसंग येवोत, माणसं भेटोत, आमच्या विशिष्ट वृत्तीनुसारच आम्ही त्यांचे स्वागत करू, याचीही विलक्षण जाणीव सदोदित मनात घर करून असते, तीही यामुळेच.

• • •

# पुरंधराच्या बुलंद बुरुजी

एक 'ऐतिहासिक'—सुमारे वीस वर्षांपूर्वी लिहि-
लेली व जुन्या कागदपत्रात सापडलेली कविता

पुरंधराच्या बुलंद बुरुजी बुलंद नजरेची
उभी यौवना मराठमोळी सोळा वर्षांची
नव नवतीची नागवेल जणु रसरसली काया
चंद्रमुखी अस्मान—चांदणी मदनाची जाया

चंदेरी भरजरी नेसली शालू झोकात
निळसर चोळी तंग दाटली कवळच्या दंडात
कर्णभूषणी मोती डुलती मधेच हिरवा खडा
चमकन् चमके निनाद करुनी हाती हिरवा चुडा

गळ्यात पुतळ्या हातात तोडे वाकी दंडावरी
खुरती सुरती नथेत मोती पट्टा कमरेवरी
गोऱ्या भाळी कोर रेखिली नाजुक चंद्राची
गाल जणू घवघवीत जोडी कलमी आंब्यांची

सैरावैरा उडे फरारा पतंग पदराचा
सावरता बेजार जाहला जीव बिचारीचा
केतकिच्या कांतीत मिसळला सुवर्ण सोन्याचा
भुरभुरत्या वायूत मिसळला सुगंध चाफ्याचा



सून कुणा ही मातबराची इभ्रतदाराची
खानदान इतमाम मराठी सरदाराघरची
हळूच हसते किंचित लाजत आठवुनी ही कुणा ?
गुपीत कसले मनात लपले दिसती त्याच्या खुणा

कुणा न्याहाळी बुरुजावरुनी कऱ्हे पठारावरी
सासुरवाशिण ना तू पोरी ? शोभे का हे तरी ?
सासुरवाशिण नव्हे पाहुणी आली हक्काची
लेक लाडकी पुरंधराच्या किल्लेदाराची

केव्हाची ही उभी एकटी अवघडले पाय
रुसली फुगली कळी कोवळी हिरमुसली हाय
किंचित तिरप्या पायी रेलुनि चढवी भिवया वरी
ओठ मुडपुनी पुटपुटली ती हळूच काही तरी

" किती पाहावी वाट तरी मी अजुनी का येना !
जातच बाई कठोर सारी पुरुषांची ही ना !
कशास द्यावे वचन आम्हाला येइन मी आज
सुकून गेला साज राजसा दरवळली सांज

कशी कळेना खुळ्या दिलाची तळमळ हो अजुनी ?
खुळी भाबडी पोर गवसली घ्या–घ्या–घ्या छळुनी
बोलायची मुळीच नाही साता जन्मांतरी
राग जायचा मुळीच नाही काही केलं तरी

रुसेन अश्शी की मी–मी– " अन् धुरळा दिसला तिला
दौडत होता स्वार कुणी बेभान गडाच्या तळा
निरखुन पाही कोण–कोण हे ? 'स्वारी' का ? तेच !
नेत्र गुंगले शब्द राहिले गळचात अर्धेच

अवचित टाळी वाजून गेली बुलंद बुरुजावरी
रुसवा फुगवा कुठे पळाला कुणास ठाउक तरी
भरज्वानिच्या अश्वावरती दौडत होता स्वार
तळपत होती हासत होती डोळचांमधली धार

नुकतिच कोठे किनार काळी खुलली ओठांवरी
जरतारी शेमला कुसुंबी उडतो वाऱ्यावरी
समशेरीची पात लटकली डाव्या कमरेवरी
पाठीवरती ढाल, शोभतो शेला छातीवरी

ढळला पोरी पदर सावरी सावर सावर तोल
नजरेचा शर सुटला सुटला भिडला हृदयी खोल
प्रीतीची प्रत्यंचा ताणुनि मदन हासला तिच्यापुढे
मोहरली नव-कांचन-काया हसले डोंगर-कडे

लाजत लाजत कशास आता पळसी वाड्याकडे
थांब थांब स्वारीस येउ दे थांब जराशी गड
छे छे! कुठला धीर, धडाडे ऊर चालली पुढे
दौडत राया आला पडले अंगाभवती कडे

फुलासारखी अलगद काया उचलुनि हसला सखा
वेढा पडला बाहुंचा अन् स्वर्गहि पडला फिका

ब. मो. पुरंदरे



# राजमाता जिजाबाई

## • प्रयोगाचे चित्रदर्शन

'राजमाता जिजाबाई' हे चरित्रकथन सुरू होते, ते देवगिरीवरील दरबारी ललकाऱ्यांनी. त्यावेळच्या सुखी महाराष्ट्राचे चित्र आपल्या प्रसन्न अभिनयाने आणि शैलीदार निवेदनाने सौ. सुनीताबाई देशपांडे प्रेक्षकांसमोर उभ्या करतात. भास होतो; की यादवांच्या राज्यातीलच एक कुलवती सून अंगणात प्रातःकाळी सडा शिंपता शिंपता हातातील तांब्या तुळशीपुढे ठेवन आपल्या गावाशिवारातील सुखाचे कौतुक सांगतेय्.


अन् सांगता सांगता सुनीताबाईंच्या मुद्रेवरील भाव एकदम बदलले. भीती आणि असहायता मूर्तिमंत उमटली. आक्रमकांच्या अत्याचारांचे, मगरुरीचे आणि महाराष्ट्राच्या वेदनांचे चित्र आपल्या सहज पण अचूक हालचालींतून सुनीताबाईंनी साकार केले. पारतंत्र्यात पडलेल्या महाराष्ट्राची दुःखे करुण शब्दांतून प्रेक्षकांच्या काळजाचे पडदे फाडीत फाडीत गेली आणि तीनशे वर्षांच्या भयाण पारतंत्र्यानंतर संत एकनाथांनी उद्वेगून तुळजाभवानीला मारलेली हाक सुनीताबाईंनी जेव्हा आपल्या भेदक स्वरात उमटविली, तेव्हा प्रेक्षकांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. नेत्र विस्फारून आणि मुठी उंचावून त्यांनी एकनाथांची आरोळी दिली, 'हे महिषासुरमर्दिनी, चंडमुंडभंडासुरखंडिनी, महाराष्ट्रधर्मरक्षिके तुळजाभवानी, बया, दार उघड! 'बया दार उघड! दार उघड!'

पार्श्वसंगीताची साथ मिळाली. संबळ कडाडू लागली आणि प्रेक्षकांच्या कानी वार्ता पडली जिजाऊच्या जन्माची!

जिजाबाईचे लग्न झाले. ती भोसल्यांच्या कुलातील लक्ष्मी झाली. तिला महाराष्ट्राच्या वेदना समजू लागल्या, ऐकू येऊ लागल्या. तिला स्वप्नं पडू लागली स्वातंत्र्याची. तिला डोहाळे लागले स्वराज्याचे. एके दिवशी ती शहाजीराजांना म्हणालीसुद्धा,

"देश आपला, हे गडकोट आपले; ह्या फौजाहि आपल्याच मराठ्यांच्या! मग राजाच तेवढा परका का? सत्ता सुलतानांची का? आपणच का स्वतः बादशहा होत नाही?"

— आणि याच विचारांच्या ठिणग्या मस्तकात फुलत असतानाच जिजाऊच्या उदरात एक अमोल मोती विकास पावत होता. जिजाऊला डोहाळे लागले होते.



जेव्हा सुलतानांच्या सैतानी पंजात महाराष्ट्र गवसला तेव्हा......

कशाचे ? जांभळाडाळिंबांचे ? पंचपक्वान्नांचे ? वनभोजनाचे ? ज्योत्स्नाविहाराचे ? छे ! शस्त्रास्त्रांचे ! गडकोट जिकल्याचे ! युद्ध लढण्याचे अन् जिंकण्याचे ! जिजाऊ काही एका आगळ्या आनंदात मग्न झाली.

— तेवढ्यात विजसारखी खबर आली. सुलतान बुऱ्हाणशहाने तिच्या जन्मदात्या वडिलांची आणि तीघा भावांची कत्तल केली म्हणून ! तिच्या काळजात आकांत उसळला. दुसरी बातमी आली, मोगलांनी तिच्या जावेला पळवून नेली म्हणून ! तिच्या मस्तकात आग भडकली. ती आग उतरली तिच्या उदरात ! तेथे शिवराया वाढत होता ! जन्माआधीपासूनच सूडासाठी तेथे मुठी वळल्या जाऊ लागल्या.


शिवबा जन्माला आला, रांगू लागला, धावू लागला अन् पुण्याच्या लालमहालात देवघराशी बसून जिजाऊ त्याला शिकवू लागली, 'शुभं करोति ! ' भक्तीचे आणि क्रांतीचे ! !

हा सारा इतिहास सुनीताबाईंनी अत्यंत प्रभावीरीतीने साकार केला. मुद्रेवरील भाव क्षणाक्षणाला बदलून अचूक परिणाम गाठण्याचे त्यांचे सामर्थ्य जबरदस्त आहे.

शिवबा मोठा होत होता. शिकत होता. स्वत: जिजाबाई सदरेवर न्यायनिवाडे करायला बसत होती. दादाजी कोंडदेवासारखा हुशार कारभारी सेवेला-तत्पर होता. जिजाबाई आकार देत होती पुण्याच्या जहागिरीला आणि शिवबाच्या मनाला. एके दिवशी झांबरे पाटलाच्या विहिरीत पोहायला गेलेल्या शिवबाच्या सौंगड्यांतून तिच्या कानी शब्द आले.

" शिवबा, तुम्ही सांगावं आन् आम्ही अशा उड्या ठोकाव्या ! "

तान्हाजीची दणकन् उडी पडली ! पाणी उंच उडाले ! जिजाबाईची खात्रीच झाली, की शिवबाला अनुयायी हवे तसेच मिळाले आहेत. तिने पंतांना आज्ञा केली,



"काय ? एका स्त्रीवर बलात्कार ? गुन्हेगाराला जेरबंद करून हजर करा ! "

"पंत, शिवबाच्या नावाची राजमुद्रा तयार करा !"

मुद्रा आधीच तयार केली होती पंतांनी ! 'प्रतिपच्चंद्रलेखेव–' तेवढ्यात खबर आली, की रांझे गावच्या पाटलाने एका स्त्रीवर बलात्कार केला म्हणून ! जिजाबाई म्हणाली,


"शिवबा, हा निवाडा तुम्ही जातीने लक्ष घालून सोडविला पाहिजे ! "

आईने शिकविलेल्या धड्यांची आणि गायलेल्या अंगाईगीतांची जणू प्रत्यक्षात आता परीक्षाच होती. स्वत: शिवबा सदरेवर बसला. गुन्हेगाराला जेरबंद करून हुजूरदाखल करण्यात आले. शिवबाने तोलदारीने न्यायमनसुबी केली. गुन्हा शाबीत ठरला ! अन् शिवबाने हुकूम सोडला,

"हात तोडा हरामखोराचे ! "

शिवबावर जिजाबाईने केलेले संस्कार अभिनयातून व्यक्त करताना सुनीताबाईंनी आपल्या भावसामर्थ्याची ओळख पटविली. शिवबाला 'शुभं करोति' शिकविणारी जिजाबाई, केवळ हाताच्या बदलत्या 'पोज' ने आणि मुद्रेवरील करारी भावदर्शनाने त्यांनी क्षणात 'न्यायमूर्ती' जिजाबाई दाखविली.

स्वराज्य प्रतिच्चंद्र वाढू लागले. फत्तखान पराभूत झाला. शहाजीराजे कैदेतून सुटले. अफझलखान ठार झाला. बाजी घोरपडेही ठार झाला. महाराज आग्र्याला




"शिवबा, तू मराठ्यांचा स्वतंत्र राजा हो ! नरपती ! भूपती ! छत्रपती !..."

गेले. कैदेत पडले. सुटूनही आले. या साऱ्या भयंकर प्रसंगांना शिवराज तोंड देत होते. प्रत्येक प्रसंगातून त्यांचा जणू पुनर्जन्म होत होता, पण त्या प्रत्येक पुनर्जन्माच्या भयंकर प्रसूतिवेदना सहन कराव्या लागत होत्या जिजाबाईला. शिवाजीराजाची आई होणे सोपे नव्हते बरे ! जिजाबाईला सगळीकडे आईच्या मायेने लक्ष घालावे लागत होते. शिवबा रणांगण सांभाळीत होता. . त्याची ही आई राजांगण सांभाळीत होती. राजकारणापासून बाळंतपणांपर्यंत सारी कामे तिला करावी लागत होती.

जिजाबाई केवळ शिवबाची आई उरलीच नव्हती. ती झाली होती स्वराज्याची आई. आता हीच एक गोष्ट बघा. शिवबाचा बाळसौंगडी बाळाजी नाईक शिळमकर राजगडाच्या पायथ्याशीच राहात होता. त्याने आपल्या लेकीचे लगीन काढले. गोमाजी नाईक पाणसंबळाच्या लेकाला पोरगी देऊ केली. साखरपुडा झाला, पण बाळाजी नाईक लग्नाची तीथच ठरविना ! लोक कुजबुजू लागले. लग्नाची गोष्ट अन् अशी चालढकल ? ही काय कुळवंताची रीत झाली ?

जिजाबाईच्या कानी गडावर कुजबूज गेली. तिने बाळाजीला बोलावून घेतलं अन् पुसलं,

"—आं ? अरे लगीनतीथ का ठरविनास ? पंचांग हरवलंय्, की भटजी



**स्वराज्याची आई......**

**"पोरा, अरे लेकीच्या बाशिंगाला दोरा अपुरा पडतोय् ते मला नाही का सांगायचंस?"**

हरवलाय् ?"

बाळाजीला शब्द जड झाला. कसाबसा म्हणाला, "काय सांगू आई! लगीन काढलंय् पन कनगीत दाना न्हाई. गाठीला पैसा न्हाई! सावकार बघतोय्, मिळना. मिळ्ला की मांडव थाटतो!"

"मग मला नाही सांगता येत? मी इथं कशाला बसलेय् मग?"

"काय काय सांगावं अन् कितीजनांनी सांगावं? किती भार घालावा?"

हे जिजाबाईने ऐकले अन् तिने कळवळून बाळाजीला पोटाशी ओढले. गहिवरली. तिच्या चेहऱ्यावरच्या साऱ्या सुरकुत्या विसकटल्या. म्हणाली,

"पोरा, कसा रे तू! अरे, पोरीच्या बाशिंगाला दोरा अपुरा पडतोय् तर मला नाही का सांगायचंस? वेडया! —नारोपंत, बाळाजी नाइकाच्या घरी लग्नाला पुरेल इतका शिधा पोहोचता करा!"

सौ. सुनीताबाईंचे निवेदन आणि हा सारा अभिनय प्रत्यक्ष पाहावाच! त्या वावरतात राजगडावर, तीनशे वर्षांपूर्वीच्या वातावरणात अन् प्रेक्षकालाही घेऊन जातात.


शिववाला लहानपणी जिजाबाईने खेळवले, अंगाईगीते गायली अन् शिकवले. तिने विशाल स्वप्न उराशी धरले होते, हिंदवी स्वराज्याचे आणि तो शुभमंगल दिवस उगवला. स्वप्नी जे देखिले होते, ते ते तैसेचि होत असल्याचा भाग्यक्षण डोळ्यांसमोर साक्षात प्रकटला. रायगडावर राज्याभिषेकाची तयारी सुरू झाली.



'उदंड जाहले पाणी......आनंदवनभुवनी!'

गंगोदके, समुद्रोदके आणि सर्व साहित्य सिद्ध होऊन आले. सुवर्णाचे सिंहासन तयार झाले. राज्याभिषेक! केवढी गोड कल्पना! शिवबाला राज्याभिषेक म्हणजे जिजाबाईच्या आयुष्याच्या महान व्रताची सांगता.

जिजाबाई आता खूप थकली होती. आयुष्यभर चाल करून ती आता या उत्तुंग रायगडावर येऊन पोहोचली होती. जे हवे होते, ते मिळाले होते. शिवबाला लहानपणी तिने मातीचे गडकोट करून दिले, त्यावर तो खेळला. त्या मातीच्या ढिगाऱ्याचा आज रायगड झाला होता. तिने शिवबाला अंगाईगीते गायली. त्या गीतांचे आज वेदमंत्र झाले होते. त्याला तिने आपल्या मांडीवर खेळवले. भारतीय चक्रवर्ती सम्राटांच्या कथा सांगितल्या. त्या तिच्या मांडीचे आज सुवर्णसिंहासन झाले होते. आयुष्याची सारी हौस पुरी झाली होती.



प्रयोग चालू असताना...
श्रीमंत राणीसाहेब, मुख्यमंत्री ना. नाईक व सौ. वत्सलाबाई नाईक

*

राज्याभिषेकाचा सोहळा तिने पाहिला. याचसाठी केला होता अट्टाहास ! आता शेवटीचा दिवस कसाही अन् केव्हाही का येईना; तिला त्याची चिंता नव्हती. तो दिवस तिने पाहिला. तिचा शिवबा नरपती, भूपती, छत्रपती झाला होता ! आनंदी-आनंद आनंदवन भुवनात प्रकटला होता. समर्थांसारखे विरक्त योगीही आनंदाने धुंद झाले होते. ते आनंदाने गर्जत होते, 'अभक्तांचा क्षयो जाला......हिंदुस्थान बळावले !'

राज्याभिषेकाचा सोहळा संपला आणि रायगडावरून मेण्यात बसून जिजाबाई गडाखालील वाड्यात येण्यास निघाली. ती निघाली, तेव्हा रायगडाच्या तटांनी आणि बुरुजांनी विचारले.

"आईसाहेब, आता पुन्हा कधी येणे होणार ?"

आता कैचे येणे जाणे? सहजी खुंटले बोलणे ! हेचि तुमची आमुची भेटी, येथुनिया जन्मतुटी ! आम्ही निघालो ! राज्य सांभाळा ! राजा सांभाळा !

जिजाबाईने अखेरचे अंथरूण धरले आणि दि. १७ जून, १६७४ रोजी रात्री जिजाबाईसाहेब स्वराज्याला आणि शिवबाला सोडून गेल्या !

सात वर्षांची जिजी लगीन होऊन देवगिरीला आली, तेव्हा मेण्याचा पडदा किंचित बाजूला करीत म्हणाली होती,

"पंतकाका, ही देवगिरी पुन्हा आपली होणार नाही का हो ?"

आज ते स्वराज्याचे स्वप्न याचि देही, याची डोळा पाहून ही शिवबाची माउली निघून गेली. हे तेज तुळजाभवानीच्या दिव्य नेत्रांतून उसळलेल्या ठिणगीवाटे महाराष्ट्रात येऊन पडले होते; ते तेज पुन्हा तुळजाभवानीच्या रूपात विलीन झाले.

—आणि शिवाजीमहाराजांनी आर्त आरोळी दिली,

"आई ऽऽ!"



...प्रयोग संपल्यावर

सर्वश्री ब. मो. पुरंदरे, पु. ल. देशपांडे, बाबुराव पेंढारकर, सुनीताबाई देशपांडे, गजानन जहागीरदार, वसंतराव व सुमतिबाई जोगळेकर

★

अन् सिंहासनाधीश्वर राजाधिराज छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुन्हा शिवबा झाला !

'राजमाता जिजाबाई' हा अभिनव चरित्रकथानाचा प्रयोग संपला आणि प्रेक्षकवर्ग भारावलेल्या अंतःकरणाने प्रेक्षागृहातून बाहेर पडला. श्री. पु. ल. देशपांडे यांच्या दिग्दर्शनाची आणि सौ. सुनीताबाई देशपांडे यांच्या अभिनयाची जणू स्पर्धा रंगभूमीवर दोन तास चालू होती. बटाट्याच्या चाळीपेक्षा हा प्रयोग फारच अवघड आहे. चाळीत विनोद व मनोरंजक घटना अनेक आहेत, पण ह्या प्रयोगात तेजस्वी पण गंभीर अशाच प्रसंगांची मालिका आहे. ही अत्यंत अवघड कसरत उभयता श्री. व सौ. देशपांडे यांनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडली आहे. हे केवळ जिजाबाईचे आत्मनिवेदन नाही. हे चरित्रकथन आहे. त्यात आलेल्या अनेक स्त्रीपुरुष भूमिकांचे दर्शन घडविणे फारच अवघड आहे. गंभीर दर्शन घडवीत असताना प्रेक्षकाला कंटाळा येता कामा नये, हीही दक्षता घ्यावी लागत होती; पण ही असामान्य कामगिरी त्यांनी पार पाडली. प्रयोग संपल्यावर श्री. बाबूराव पेंढारकर, श्री. गजाननराव जहागीरदार, श्री. वसंतराव व सौ. सुमतिबाई जोगळेकर यांच्यासारख्या श्रेष्ठ कलाभिज्ञांनीही मनःपूर्वक सौ. सुनीताबाईंचे कौतुक केले. तसेच छत्रपती सुमित्राराजे राणीसाहेब, मा. मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि अनेक थोरांनी भारावलेल्या मनाने सुनीताबाईंना गौरविले.

● ● ●

एवतुशिको



# कवी हा आहे असा जीवनी . . .

१

## • शत्रूचे पहिले दर्शन

" सन १९४१ साल. आईने मला परत मॉस्कोला नेले. इथेच पहिल्यांदा मला आमच्या शत्रूचे दर्शन घडले. माझी स्मृती जर बरोबर असेल तर, त्या दिवशी जवळजवळ दोन हजार जर्मन युद्धकैद्यांची एक तुकडी मॉस्कोच्या रस्त्यावरून जाणार होती.

रस्त्याच्या कडेला असलेल्या मोकळ्या फरसबंदी जागांमधून माणसांच्या झुंडीच्या झुंडी ठिचून भरलेल्या होत्या. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पोलिसांनी व सैनिकांनी साखळी तयार करून रस्ता मोकळा ठेवला होता.

या सगळ्या गर्दीत रशियन स्त्रियांची संख्या जास्त होती. काम करून करून त्यांचे हात खरबरीत झाले होते. त्यांचे ओठ लिपस्टिकने रंगलेले नव्हते. त्यांच्या बारीक नि वाकलेल्या खांद्यांनी युद्धाचा अर्धाअधिक भार पेललेला होता. त्यांच्यापैकी प्रत्येकीचा भाऊ, बाप, नवरा, नाहीतर पुत्र जर्मनांच्याकडून मारला गेलेला होता.

एवतुशिको हे नाव 'माणूस' च्या वाचकांना तरी अपरिचित नाही. या तरुण रशियन कवीच्या 'बाबीयार' या कवितेसंबंधी एक लेख 'माणूस' मध्ये यापूर्वीच येऊन गेलेला आहे. ('माणूस'– १ सप्टेंबर १९६४)

या कवीने आपले आत्मचरित्र लिहिले आहे. ते प्रसिद्ध झाल्यावर रशियात व इतर पाश्चात्त्य देशांतूनही त्यासंबंधी बराच बोलबाला झाला.

वानगीदाखल श्री. रतनलाल भंडारी यांनी या आत्मचरित्राचा काही भाग 'माणूस' च्या वाचकांसाठी येथे अनुवादित केला आहे.

---

ज्या दिशेने तुकडी येणार होती, त्या दिशेला प्रत्येकजण द्वेषाच्या नजरेने वाकून पाहात होता.

शेवटी एकदाची आम्हांला ती तुकडी दिसू लागली.

सर्वांच्या पुढे त्यांचे अधिकारी चालत होते. त्यांच्या निबर हनुवटया हलत होत्या. त्यांनी आपले ओठ आवळले होते. त्यांच्या वर्तणुकीतून आपल्या यःकिंचित विजेत्याविषयीची तुच्छता प्रदर्शित होत होती.

'हलकट, मडवे, त्यांच्या शरीराचा एडीकोलनसारखा कसा घाणेरडा वास येतोय् पाहा.' जमावातून कोणीतरी बडबडले.

बायकांनी नकळत आपल्या खरबरीत हातांच्या मुठी आवळल्या होत्या. सैनिक आणि पोलीस त्यांना आवरण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत होते. आता त्यांच्या नजरेसमोरून सामान्य जर्मन सैनिकांचा ताफा सरकू लागला. हडकुळे, वाढलेल्या दाढीमुळे केविलवाणे दिसणारे, आपल्या शरीरावर रक्ताने माखलेल्या मलमपट्ट्या बांधलेले, आपले दुखावलेले पाय ओढीत, आपल्या साथीदारांच्या खांद्यांवर भार टाकून ते खुरडत चालले होते ! त्यांच्या माना खाली झुकलेल्या होत्या.

सारा रस्ता निःशब्द झाला होता. रस्त्यावर फक्त बुटांच्या ठेक्यांचा आणि आधारासाठी केलेल्या धडपडीचा आवाज भरून राहिला होता.

इतक्यात आपल्या फाटक्या बुटांत तोल सावरणारी एक म्हातारी पुढे सरकण्याचा

प्रयत्न करीत असताना मला दिसली. पोलिसाच्या खांद्याला स्पर्श करीत ती म्हणाली, ' मला पुढे जाऊ द्या. '

तिच्या नजरेत असे काहीतरी होते, की त्या पोलिसाने तिला थोडी मोकळी वाट करून दिली. ती तुकडी जवळ जाऊन पोहोचली. आपल्या कोटातून रंगीत हात-रुमालात गुंडाळलेले काहीतरी तिने बाहेर काढले. पावाचा काळा पापुद्रा होता तो. तिने तो भीतभीतच एका सैनिकाच्या खिशात कोंबला. थकल्यामुळे त्याची पावले डगमगत होती.

सर्वत्र ताणलेली शांतता पसरली होती आणि क्षणार्धात अघटित घडले. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या स्त्रिया त्या सैनिकांकडे धावत येऊ लागल्या. कोणी त्यांना पाव दिले, कोणी सिगारेट. त्या क्षणाला त्यांच्याजवळ जे जे होते, ते ते सर्व त्यांनी युद्धकैद्यांना दिले.

ते सैनिक आता आमचे शत्रू नव्हते.

ती फक्त सामान्य माणसं होती. '

# २

## • रस्त्यावरील हुकूमशहाचा अंत

१९४१ साल, मॉस्कोतल्या चतुर्थ मेशॉनस्काय रस्त्यावरल्या श्रांत विभागात मी एकटाच मोकळ्या फ्लॅटमध्ये राहात होतो.

माझ्या आईवडिलांनी घटस्फोट घेतला होता. वडील आपल्या नव्या पत्नीबरोबर आणि त्यांच्या दोन मुलांबरोबर दूरवर कझागिस्तानमध्ये वास्तव्य करीत होते. मधूनमधून त्यांची पत्रे मला येत.

आई आघाडीवर गेली होती. भूगर्भशास्त्रज्ञ म्हणून काम करावयाचे तिने सोडून दिले होते. ती गायिका झाली होती. सैनिकांच्या पुढे आपल्या गायनाचे कार्यक्रम ती करीत असे.

अशारीतीने माझे शिक्षण रस्त्यावर सोडून देण्यात आले होते. या रस्त्याने मला शपथा घ्यावयास शिकवले. धूम्रवलयाची लज्जत येथेच कळली. दोन बोटांमधून, दातांमधून दूरवर पिचकारी उडविण्यास मी येथेच शिकलो. ठोशास ठोसा हे इथले तत्त्वज्ञान; मुठी घट्ट आवळण्याची इथे लागलेली सवय. अजूनही माझ्यातून गेलेली नाही.

या गल्लीबोळांनी मला, कुणालाही आणि कशालाही न भिण्याचा मंत्र दिला. तो मंत्र मी अजूनही जतन करून ठेवला आहे.

जीवनाच्या धकाधकीत समर्थांच्यापासून वाटणाऱ्या भीतीवर विजय मिळविणे हा महत्त्वाचा मंत्र आहे, याची इथेच मला पहिली जाणीव झाली.

आमच्या या रस्त्याचा—चतुर्थ मॅन्शकाय रस्त्याचा—'लाल्या' हे टोपणनाव असलेला एक सोळा वर्षाचा 'दादा' होता. वयाच्या मानाने लाल्याचे खांदे खूपच रुंद आणि थोराड होते.

लाल्या एखाद्या मालकासारखा या रस्त्यावर लांब लांब ढांगा टाकीत मिरवीत असे. त्याची चालण्याची ढब एखाद्या नाविकासारखी फिरकी वाटायची......त्याचे मांजरीसारखे हिरवट डोळे सदा चकाकत असायचे. सगळ्या वस्तुमात्राकडे तो आपली उपहासाने भरलेली हिरवट नजर फेकीत चालायचा. त्याच्यासारखीच टोपीची कोच उलटी फिरवून बसविलेले त्याचे दोन—तीन साथीदार लाल्याच्या पायांत अडखळत नेहमी पुढे चाललेले असायचे.

लाल्या कोणत्याही पोराला कुठेंही आडवा जाऊन आपल्या भरदार आवाजात एकच शब्द उच्चारायचा; 'पैसा.' त्याचे साथीदार त्या पोराचे खिसे उलटेपालटे करून झडती घेत. त्या पोराने थोडाफार विरोध केल्यास त्याची गठडी वळायला ते मागेपुढे पाहात नसत.

प्रत्येकजण लाल्याला भीत होता. मीही त्या भिणारांतीलच एक होतो. तो आपल्या खिशात, बोटात घालावयाचे तीक्ष्ण शस्त्र बाळगून असतो, हे मला ठाऊक होते.

लाल्यापासून वाटणाऱ्या भयावर मला विजय मिळवावयाचा होता. म्हणून मी त्याच्यावर एक कविता लिहिली. ही माझी पहिलीच वर्तमानपत्री कविता होती. दुसऱ्या दिवशी सगळ्या रस्त्याने ही कविता मुखोद्गत करून टाकली आणि विजयाच्या जाणिवेने माझी मान ताठ झाली.

एके दिवशी शाळेला जात असता, लाल्याने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी अचानक मला रस्त्यात गाठले. त्याचे ते भेदक डोळे माझ्या हृदयाचा ठाव घेत होते. "आला पाहा कवडा," त्याने हेल काढत बोलण्यास सुरवात केली. दुष्टपणाने तो हसत होता. "तू काव्य लिहितोस काय? तुझ्या काव्याला सूर वगैरे असतो का?"

त्याने आपला हात खिशात खुपसला आणि क्षणार्धात बोटातील शस्त्र लखलखले. एखादी वीज कोसळावी तसा तो हात माझ्या मस्तकावर येऊन आदळला. ते रक्तबंबाळ झाले. मी रस्त्यावर कोसळलो आणि माझी शुद्ध गेली.

माझ्या काव्याचा आयुष्यात मला मिळालेला हा पहिला मोबदला होता.

अनेक दिवस मी अंथरूण सोडले नाही.

मी थोडासा हिंडूफिरू लागलो. माझ्या डोक्याला बांधलेल्या मलमपट्ट्या तशाच होत्या. एके दिवशी पुन्हा मला लाल्या दिसला. स्वतःच्या मनावर ताबा ठेवण्याचा प्रयत्न करूनही मी धूम ठोकली. घरी येऊन मी बिछान्यात आदळलो. लाजेने मी इतका उद्विग्न झालो होतो, की अनेक वेळा मी उशीची आदळआपट केली. तोंडातून बाहेर पडणारे दुःखोद्गार लपविण्यासाठी उशीला अनेक ठिकाणी चावे घेतले.

माझ्या भित्रेपणाची माझी मलाच शरम वाटली.

कोणतेही मोल देऊन या भीतीचा नायनाट करण्याचा मी निर्धार केला.

डबलबार आणि वेटलिफ्टवर व्यायाम घेऊ लागलो. प्रत्येक दिवशी व्यायाम संपल्यावर आपले बाहू निबर झाल्याचा भास मला होत असे. ते हळूहळू मोठे होत असल्याची मला जाणीव व्हावयाची. एके दिवशी कुठल्यातरी पुस्तकात आश्चर्यकारक जपानी पद्धतीची एक माहिती वाचली. जुजुत्सुच्या या पद्धतीने अशक्त माणसालाही ताकदवान माणसावर विजय मिळविता येत असे. मी एका आठवड्याच्या रेशनकार्डाच्या बदल्यात या जपानी कलेचे पुस्तक विकत घेतले.

जवळजवळ तीन आठवडे माझ्या इतर दोन सहकाऱ्यांबरोबर या पद्धतीचा सराव करण्यात घालवून, मग मी बाहेर पडलो.

आमच्या अंगणातील हिरवळीवर लाल्या आपल्या सहकाऱ्याबरोबर कसला तरी जुगारीचा खेळ खेळण्यात रममाण झाला होता. माझ्या मनातील त्याच्याविषयीची भीती खोलवर रुजलेली होती, पण मी तसाच पुढे झालो आणि लाथ मारून त्यांचे पत्ते सर्वत्र फिसकटून टाकले.

लाल्याने चमकून माझ्याकडे पाहिले. नुकताच मी केलेला पळपुटेपणा लक्षात असल्यामुळे, माझा हा रुद्रावतार पाहून त्याला आश्चर्य वाटल्याशिवाय राहिले नाही.

हळूहळू तो ताठ उभा राहिला आणि आपल्या भेसूर आवाजात म्हणाला, "तुला पुन्हा खुमखुमी आलेली दिसतीय."

पूर्वीप्रमाणेच आपल्या बोटातील शस्त्र घेण्यासाठी त्याने खिशात हात घातला, पण मी त्याला इतक्या जोराने मुसंडी मारली, की दुःखातिरेकाने किंचाळत तो जमिनीवर उताणा पडला आणि झटकन एखाद्या पिसाळलेल्या बैलासारखा फुस्कारीत माझ्या अंगावर चालून आला. मी त्याचे मनगट आवळून धरले. पुस्तकात वाचल्याप्रमाणे त्याच्या मनगटावरील माझी पकड हळूहळू आवळण्यास सुरवात केली. शेवटी त्याच्या शक्तिहीन बोटातून ते तीक्ष्ण शस्त्र आपोआप गळून पडले. स्वतःच्या मनगटातून निघणाऱ्या वेदनांमुळे विव्हळत तो खाली बसला. तो हुंदके देत होता आणि त्याच्या देवीच्या व्रणांनी भरलेल्या चेहऱ्यावरून ओघळणारे अश्रू दुसऱ्या हाताने पुसत होता.

त्या दिवसापासून आमच्या रस्त्यावरील हुकूमशहाचा अंत झाला.



त्या दिवसापासून मला कळले, की दांडगेश्वरापासून भीती बाळगणे व्यर्थ आहे. त्याचा बंदोबस्त कसा करावयाचा, हे मात्र ठाऊक असले पाहिजे. असल्या प्रत्येक रानदांडग्यासाठी निरनिराळ्या प्रकारचे खास व्यायाम प्रकार अस्तित्वात आहेत.

मी कवी आहे, म्हणून निव्वळ काव्यनिर्मिती करणे हाच माझा धर्म नाही तर आपल्या काव्यासाठी, प्रसंगी त्याच्या रक्षणार्थ असे ताठ उभे राहावे लागते, हेही या प्रसंगाने मला शिकविले.

३

## • सतारीचे बोल......दिड दा दिड दा

काव्याच्या प्रांतात नव्याने प्रवेश करणारे बहुतेक कवी प्रथम प्रचलित प्रथांचा आधार घेतात. त्या त्या काळी लोकप्रिय असलेल्या पद्धती आणि काव्यप्रकार हे सरळ आणि सोपे मार्ग असतात. रशियामध्ये घटनांचे काव्यात्मक निवेदन करणे, हा एक काव्यप्रकार मानला जातो. या सर्व काव्यांत ओढून ताणून स्टॅलिनची व्यक्तिपूजा करणे, हा काव्यप्रसिद्धीचा आवश्यक भाग होऊन बसलेला होता. प्रारंभी एवतुशिकोच्या काव्यात स्टॅलिनच्या नावाचा अभाव दृष्टीस पडला, की संपादक महाशय आपल्या अधिकारात त्याचे काव्य ' दुरुस्त ' करीत असत. थोडेसे काव्य-लेखन केल्यावर एवतुशिकोला या बाबतीत संपादकांची मदत घेण्याची आवश्यकता राहिली नाही. ही कला त्याला चांगलीच अवगत झाली. त्यात कुठल्याही प्रकारची कृत्रिमता आहे, याची जाणीव त्याला झाली नाही. एके ठिकाणी तो म्हणतो--

" लवकरच मला काव्यगुणांचे प्रचलित नियम चांगलेच ज्ञात झाले. काव्य-प्रसिद्धीसाठी स्टॅलिनच्या नावाने येळकोट करणे ही आवश्यक बाब होती. आणि यात मला अनैसर्गिकतेचा थोडादेखील संशय येत नव्हता......मीसुद्धा माझ्या बालपणा-पासून स्टॅलिनची पूजा करीत नव्हतो का ?"

त्या काळातील कवींच्या काव्याचे त्याने अतिशय मार्मिक वर्णन केले आहे. तो लिहितो--

" कवी कारखान्यांना आणि निर्मितिस्थळांना भेटी देत होते आणि त्यांना निर्माण करणाऱ्या माणसांपेक्षा तेथल्या यंत्रांवरच त्यांनी आपल्या काव्याची निर्मिती केली. जर या यंत्रांना वाचता येत असते, तर या कविता त्यांनी मनापासून वाचल्या असत्या. माणसे मात्र असले काव्य वाचीत नव्हती. "

१९५२ मध्ये एवतुशिकोचा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. वृत्तपत्रांनी या संग्रहाचे नेहमीच्या प्रथेप्रमाणे भरपूर कौतुक केले. कारण त्यात समाजसत्तावादी आशावाद, जनतेच्या सामर्थ्यावरील अढळ श्रद्धा, थोर स्टॅलिन वगैरे नेहमीचा माल-मसाला होताच; पण एवतुशिकोला याच काव्यसंग्रहाने प्रथम अंतर्मुख केले आणि

अशा काव्यामागे दडलेल्या प्रचंड ढोंगाची आणि खोटेपणाची जाणीव करून दिली. एवतुशिको लिहितो--

" काव्यसंग्रह प्रकाशित झाल्यावर सहज मी एकदा एका पुस्तकाच्या दुकानात शिरलो. आतील आशावादी मजकुराला साजेसे निळे वेष्टन चढविलेल्या माझ्या संग्रहाच्या कोऱ्या करकरीत प्रती तेथे हारीने लावून ठेवलेल्या होत्या. कोणाचाही हात त्यांना लागलेला दिसत नव्हता. "

एवढ्यात एक तरुण माणूस दुकानात आला व कवितांच्या पुस्तकांची चाळवाचाळव करू लागला. इतर लेखकांचे काव्यसंग्रह पाहून झाल्यावर तो शेवटी माझा संग्रह जेथे मांडून ठेवला होता; त्या जागेपाशी आला. त्याने जसे माझे पुस्तक हाती घेतले; तसा माझा जीव अगदी धडधडू लागला. थोडा वेळ त्याने पुस्तकाच्या पानांवरून नजर फिरवली व एक दीर्घ निःश्वास सोडून त्याने ते जेथल्या तेथे परत ठेवून दिले.

आणखी काही क्षण गेले आणि तो तरुण दुकानात काम करणाऱ्या माणसाला म्हणाला, " माझी एक मैत्रीण आहे. तशी ती फार चांगली मुलगी आहे, पण तिचा जगण्यावर, आयुष्यावर विश्वासच कसा तो शिल्लक उरलेला नाही. तिच्या हाती काही चांगले काव्य देता आले, तर पाहावे, यासाठी मी येथे आलो; पण येथे तर काय, नुसते प्रचारी, ढोल बडविणारे काव्यच फक्त दिसते. असले काव्य वाचून का कोणाला स्फूर्ती येणार आहे, कोणाला श्रद्धा लाभणार आहे ! '

तो तरुण निघून गेला. बाहेरच्या अस्पष्ट वातावरणात त्याची मूर्ती दिसेनाशी झाली. मी मात्र तेथेच उभा होतो. अगदी स्तब्ध. पार दुभंगून गेलो होतो, विच्छिन्न झालो होतो.

मी घरी आलो. खिन्नता दाटली होती. माझाच काव्यसंग्रह हातात घेऊन पुन्हा वाचीत बसलो. मला एकाएकी स्पष्ट जाणवले, की मी जे लिहिले, त्याचा कोणालाही कसलाही उपयोग नाही.

संध्याकाळ सरत आली होती. रस्त्यावर बर्फ पडू लागले होते. दिवसभराचे कष्ट उपसून माणसे, स्त्रीपुरुष, लहान मुले थकल्याभागल्या स्थितीत हातात पावाचा एखादा तुकडा नाहीतर इतर काही खाद्यपदार्थ घेऊन घरी परतत होती. युद्धाचा आणि त्यानंतरचा पुनर्रचनेचा कालखंड संपलेला होता आणि त्याचबरोबर ती प्रचंड फसवणूकही; पण या सर्वांचा ताण या थकल्याभागल्या चेहऱ्यांवर दिसतच होता. त्यांच्या पाठी वाकलेल्या होत्या, भोवताली काय घडते आहे हे समजत नसल्याची अज्ञानाची जाणीव डोळ्यांत दाटली होती; पण तरीही त्यांच्यांत कसलाही कडवटपणा किंवा निराशेचा सूर दिसत नव्हता. प्रेमळपणा त्यांना सोडून गेला नव्हता व तेही जगाकडून प्रेमळ व्यवहारांची अपेक्षाच बाळगून होते. त्यांचे कपडे फाटकेतुटकेच होते, पण तरीही त्यांच्या ठिकाणी एकप्रकारची सहजश्रीमंती दिसून येत होती, जी

त्यांना ताठ उभी ठेवीत होती. हेच लोक मला आपले वाटत होते. कामाने झिजलेल्या आणि शिणलेल्या त्यांच्या थोराड हातातील प्रत्येक शिरेचे स्पंदन मला जाणवत होते. उन्हापावसात रापून निघालेल्या त्यांच्या चेहऱ्यावरील प्रत्येक सुरकुती अन् सुरकुती मला त्यांच्याशी जखडून ठेवीत होती. माझ्या पोकळ शब्दांचा यांना काय उपयोग? शून्य. निरर्थक. त्यांनी असे खूप ऐकले होते आणि त्यांचा यापैकी कशावरच विश्वास उरला नव्हता. त्यांना हवे होते सरळ-साधे शब्द, प्रामाणिक विचार, प्रेमळ भावना.

विमनस्कपणे हिंडत हिंडत मास्कोवा नदीच्या किनाऱ्यावर आलो. सिगरेटसाठी मी खिशात हात घातला आणि त्याच दिवशी माझ्या काव्यसंग्रहाबद्दल मला दिलेले नोटांचे पुडके विंचवासारखे मला डसले. त्या नोटा मी बाहेर काढल्या आणि चोहोबाजूंना भिरकावून दिल्या. सगळीकडे नोटाच नोटा दिसत होत्या. हवेमध्ये गिरक्या घेत घेत त्या थंडगार अंधारात नाहीशा होत होत्या. अर्थातच ही कृती शाळेतल्या एखाद्या पोरासारखी बालिश होती; पण मला असत्याच्या पूजेबद्दल मिळालेल्या त्या पैशापासून माझी सुटका करून घ्यावयाची होती. माझे खिसे आता रिकामे झाले होते आणि यापुढेही बराच काळ ते रिकामे राहणार होते.

कारण सत्याच्या कठोर मार्गावरून एवतुशिंकोची विकट वाटचाल आता सुरू होत होती.

● ● ●


## सूचना

- दीपावली व सर्व खास अंकांसह माणूसची वार्षिक वर्गणी आठ रुपये व परदेशी बारा रुपये आहे.
- **वर्गणी मनीऑर्डरने** यावी. चेक पाठवावयाचा झाल्यास तो 'व्यवस्थापक माणूस' या नावे पुणे किंवा मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा असल्यास ७५ पैसे वटणावळ पाठवावी.
- **अंक न पोहचल्याचे** कळवावयाचे झाल्यास ५ व २० तारखेपर्यंत वाट पाहून मगच कळवावे. अंक आमचे कार्यालयात शिल्लक असल्यास जरूर पाठविले जातात.

**लेखकांसाठी :** स्वीकृत साहित्याचाच फक्त निर्णय कळविला जातो. नापसंत साहित्याचा निर्णय व ते परत हवे असल्यास पुरेसे पोस्टेज सोबत पाठविणे अत्यावश्यक आहे.

# तीन कथासंग्रह

—चन्द्रशेखर मराठे

प्रत्येक माणसाचा एक जमाना असतो असे म्हणतात. माणसाप्रमाणेच एकेका शब्दाचाही जमाना असतो असे मला वाटू लागले आहे. सध्या साहित्याच्या पेठेत 'पृथगात्मता' या शब्दाचा जमाना आहे. वास्तवता, घाट, आशय, अभिव्यक्ती, अनुभूती, मनोव्यापारांचे विश्लेषण, अलिप्तता वगैरे मंडळी वेळोवेळी साहित्यात आपला जमाना गाजवून गेली आहेत. आता पृथगात्मता या शब्दाची सद्दी दिसते. कोठल्याही पुस्तकाचे परीक्षण-समीक्षण-परामर्श वाचा, त्यांत पृथगात्मता हा शब्द हल्ली हजेरी लावून जातोच. मराठी इन टू मराठी अशी डिक्सनरी हाताशी नसल्याने या शब्दाचा अर्थ मला कळलेला नाही. परंतु एकंदरीत हा शब्द चांगला, स्तुतिवाचक असावा, असे वाटते. मग शंका अशी–प्रत्येक पुस्तकात भरपूर पृथगात्मता असताना वाचक हल्ली 'पृथक् पृथक्' वाजवतात ते का ?

अर्थात ही शंका वाचकांना येते, हे नमूद केले पाहिजे. लेखकाला अशी शंका कधीच येत नाही. कारण लेखक वाचकांसाठी थोडेच लिहितो ? तो कलेशी इमान राखून, अनुभवनिष्ठ राहून, त्याच्या अनुभूतीचा आविष्कार करतो. साहित्य हा लेखकाच्या अनुभवनिष्ठेचा अपरिहार्य आविष्कार आहे; ही सध्याची स्लोगन आहे. पृथगात्मता हा या आविष्काराचा प्रमुख निकष आहे. हा शब्द जितका वाटतो, तितका नवीन नाही. 'वेगळे' चे कालांतराने 'आगळे' झाले. हे 'आगळे'-देखील वापरून वापरून पार गुळगुळीत झाले. तेव्हा या 'आगळे' चाच नवा अवतार म्हणून पृथगात्मता' अवतरली. काहीतरी वेगळे लिहावयाचे व शक्य तितक्या अलिप्तपणे लिहिले, असे भासवावयाचे, हा प्रकार आता प्रतिष्ठा पावत आहे. कथेच्या प्रांतात तर वेगळेपणाची चढाओढच सुरू आहे. या चढाओढीचाच प्रत्यय दोन नवे कथासंग्रह वाचून आला. श्री. श्री. ज. जोशी यांचा 'समज' व श्री. मंगेश पदकी यांचा 'खारीची पिल्लं' हे दोन कथासंग्रह वाचून मराठी कथेने नव्या प्रवासात किती आघाडी मारली आहे, हे कळून आले. हिंदी सिनेमांच्या लांबलचक नावांचा सिनेमाशी जसा काही संबंध नसतो, तसेच काहीसे या दोन पुस्तकांचे आहे. जोशी यांचा 'समज' जीवनाविषयी बराचसा 'बेसमज' करणारा आहे, तर पदकी यांच्या पुस्तकातील कथा वाचून 'खारीची पिल्लं' हे शब्द उच्चारल्यावर जे काही वाटले, त्याच्या अगदी विरुद्ध वाटते. खरोखर खारीच्या पिल्लांसारख्या गोजिरवाण्या प्राण्यांवर पदकींनी निष्कारण अन्याय केला आहे.

## • खारीची पिल्लं

पदकींची ' खारीची पिल्लं ' ही एक भूतकथा आहे. भूतकथेतसुद्धा काही थ्रिल असतो. पदकींची गोष्ट उबग निर्माण करण्यापलीकडे काही साधत नाही.. तोच कदाचित लेखकाचा हेतू असेल. दुसरी ' कबुतरं ' ही प्रदीर्घकथा वेश्येच्या जीवनावर आहे. वेश्येचा ' विषय ' सोईस्कर. एरवी न लिहिता येण्याजोग्या कित्येक गोष्टी या प्रकारच्या कथेत खपतात. हे पदकींनी मोठ्या चवीने केले आहे. सबंध कथा वाचताना वेश्येची तृप्ती साकार करण्याची पदकींनी आटोकाट धडपड केली आहे, हे जाणवते. ती थोडी फार यशस्वीही झाली आहे; पण ती वाचत असताना एक प्रश्न सारखा वाचकाला छळतो – हे चऱ्हाट मी का वाचावे ? परीक्षण लिहिण्यासाठी वाचणारे लोक सोडून या कथेस किती वाचक मिळाले असतील ? या कथेत जी दुनिया ते शब्दांत पकडू इच्छितात; ती त्यांना शेवटपर्यंत गवसत नाही. तपशील भरण्याचा त्यांचा प्रयत्न ठिकठिकाणी जाणवतो व रसभंग होतो. दोन गोष्टींबद्दल मुद्दाम तक्रार करावयास पाहिजे.

एका ठिकाणी बेवारशी मुलांना उद्देशून ही मुले देवाला सार्थपणे ' त्वमेव माता पिता त्वमेव ' म्हणू शकतात; असा उल्लेख आहे. या सार्वकालिक व सार्वत्रिक प्रार्थनेचा पदकींनी असा संदर्भ का द्यावा ? पदकींच्या आधी हजारो वर्षे ही प्रार्थना भारतात घुमत होती व नंतरही राहील. दुसरे म्हणजे पदकी विडीच्या जळत्या टोकाला सूर्याची उपमा देण्यासारखे प्रकार करतात. अफाट संदर्भ हे पदकींनी टाळावयास पाहिजे. त्यांची तिसरी गोष्ट ' रिता ' ही पु. भा. भाव्यांच्या शैलीत लिहिलेली एक भाकड कथा आहे. प्रकाशकांना या गोष्टीत मनाने शरीरावर विजय मिळवल्याचा साक्षात्कार झाला आहे. पदकींचा हा कथासंग्रह अतिशय निराशाजनक आहे, असे म्हणावे लागते.

## • समज

श्री. ज. जोशी यांच्या ' समज ' मधील बहुतेक कथा स्त्रीपुरुष-संबंधांच्या बारकाव्यांवर आधारित आहेत. जोशींनी कथांचा एक साचाच ठरवून टाकला आहे. मुंबईचे जीवन हाही वेश्येच्या जीवनाप्रमाणेच सोईस्कर विषय. या विषयातही मध्यमवर्गाची कुचंबणा हा चवीचा विषय. श्री. ज. जोशी ही कुचंबणा पकडू शकतात व रंगवूही शकतात. अर्थात गंगाधर गाडगिळांचा आवाका जोशांजवळ नाही. त्यांना माणूस पुरता समजला नाही. यामुळे त्यांच्या या संग्रहातील काही कथांसाठी उलटलेल्या म्हाताऱ्याने मारलेल्या फाजील गप्पांची कळा येते. जोशी हे दुसऱ्या रांगेतील लोकप्रिय कथाकार आहेत, हे या संग्रहावरून पुन्हा पटते.

## • मुर्दाड

हे दोन्ही कथासंग्रह वाचून श्री. भीमराव कुलकर्णी यांचा 'मुर्दाड' हा कथासंग्रह वाचण्याचा योग आला. सर्वसाधारणपणे निरोगी मनाच्या माणसाने त्याच्या अवतीभवतीच्या जीवनातील गमतीजमतींचे, सुखदु:खांचे केलेले मनोरंजक चित्रण; असे या कथांचे स्वरूप आहे. यात वेगळे–आगळेपणाचा अट्टाहास नाही. शिळोप्याच्या गप्पा माराव्यात, त्याप्रमाणे या कथा वाटतात. सर्वसाधारणपणे बावळट वा सरळमार्गी माणसांचे जे काही तर्कशास्त्र असते, त्याच्या अनुरोधाने वागताना त्यांच्यावर जे भलेबुरे प्रसंग ओढवतात व प्रसंगी अशी सामान्य माणसे अतर्क्य असे काही करून जातात, अशा काही माणसांच्या या कथा आहेत. सर्वच कथा काही चांगल्या नाहीत. मुर्दाड ही कथा सिनेमातल्या मोंटाजसारखी आहे. या संग्रहातील चांगली कथा म्हणून 'मर्दा सिद्दाप्पा' या कथेचा निर्देश करावा लागेल.

श्री. कुलकर्णी यांची कथा अघळपघळ, घटनाप्रधान आणि सरधोपट आहे. पु. ल. देशपांड्यांच्या साहित्यातील करुणेचे व विनोदाचे काही प्रमाणावर दर्शन श्री. कुलकर्णी यांच्या साहित्यात घडते. या करुणेचा स्पर्श होतो, म्हणूनच त्यांचा मर्दा सिद्दाप्पा लक्षात राहतो.


ललित साहित्य ही केवळ तांत्रिक करामत नव्हे. अनुभव, निष्ठा आणि कलेशी इमान अशा आरोळ्या ठोकत काहीतरी लिहावयाचे, यात काही स्वारस्य नाही. कलेशी इमान राखण्याच्या दंभाने साहित्याने जीवनाशी इमान राखले नाही, तरी चालेल अशी आता समजूत होत चालली असल्याचे दिसते. अर्थात इमान वगैरे कडवे शब्द या लेखकमंडळींनीच प्रथम वापरले म्हणून वापरावयाचे. अन्यथा कोणीतरी काहीतरी चांगले, रंजक, निरोगी आणि 'ओले' लिहावयाचे व इतरेजनांनी त्याचा स्वाद घ्यावयाचा, यात कसले आले आहे इमान ? • • •


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सह्हा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २



# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

उत्तरार्ध :

लेखांक पांचवा



मे- १९४० चा पहिला आठवडा ! नॉर्वेतील लढाई हिटलरने आटोपत आणलेली होती. नार्विक बंदराच्या आशेने ब्रिटिश सैन्य व ब्रिटिश आरमार उत्तरेकडे झुंझवत ठेवून हिटलरने दोस्तांची पश्चिम आघाडीवरील सामसूम उद्ध्वस्त करण्याचे ठरवले

पश्चिम आघाडीवर दोस्तांची सैन्ये जर्मन सैन्याशी 'बैठे युद्ध' करीत थांबलेली होती. संख्याबलात दोन्ही बाजूंचा हिशोब जवळ जवळ सारखाच होता. जर्मन सैन्य १३६ डिव्हिजन्स होते, तर या आघाडीवर ब्रिटिश, फ्रेंच, डच व बेल्जम या सर्वांची मिळून सैन्य संख्याही १३५ डिव्हिजन्स होती. दोस्तांना संरक्षणाच्या दृष्टीने बऱ्याच सोईस्कर गोष्टी उपलब्ध होत्या. दक्षिणेकडे मॅजिनॉट तटबंदी अभेद्य समजली जात होती. मध्यभागी बेल्जमच्या किल्ल्यांच्या रांगा होत्या. उत्तरेकडे हॉलंडमध्ये नद्यांचे पाणी अडवलेले, प्रचंड बांध होते. बांध फोडताच सर्व देश जलमय होणार होता. फक्त एकच गोष्ट दोस्तांजवळ नव्हती.... परस्पर सहकार्य !

## दुबळ्यांची तटस्थता

आणि ते असणार तरी कसे ? सरहद्दीजवळ जर्मन सैन्याची जमवाजमव मोठ्या प्रमाणात झालेली असतानाही बेल्जम व हॉलंड या राष्ट्रांचा विश्वास होता, तो स्वतःच्या 'नॉन–अलायन्मेंट'वर ! आम्ही या गटात जाणार नाही. त्या गटात जाणार नाही. आम्ही तटस्थ आहोत. यांच्याशी आमची मैत्री आहे. ते आमचे भाई भाई आहेत. जणू जगात तटस्थता हे मोठे शस्त्र आहे, अशा घमेंडीत ही दोन अलबती–गलबती राष्ट्रे स्वानंदसाम्राज्यात रममाण होती. हाती नाही बळ, दारी नाही आड, त्याने फुलझाड लावू नये !


बेल्जम, हॉलंड व लक्झेंबर्गमधूनच जर्मन सैन्य घुसणार, ही गोष्ट इतकी सुस्पष्ट होती, की दोस्तांचे लक्ष फक्त "दादा, ते केव्हा येणार ?" या एकाच प्रश्नाकडे लागलेले होते. दोस्तांचा निर्णय तर झालेलाच होता, की जर्मनीने बेल्जम-हॉलंडची सरहद्द ओलांडताच –त्यांच्या निमंत्रणाची वाटही न पाहता दोस्तांनी या देशाच्या सरहद्दी ओलांडून जर्मन सैन्याला अंगावर घ्यायचेच ! त्याशिवाय अन्य मार्गच नव्हता. तटस्थ राष्ट्रे हीच अखेर सबलांची रणांगणे ठरतात. दोघांनाही तिथे युद्ध करावेच लागते !

जर्मन सैन्यापुढे युद्धाचा नकाशा सुस्पष्ट होता. मार्शल रूडन्स्टेंट यांच्या सैन्यातील जनरल मॅनस्टीन याने फ्रान्सच्या युद्धाची कल्पना हिटलरपुढे मांडलेली होती. ही कल्पना अशी होती—

## मॅनस्टीन याचा धाडसी व्यूह

ब्रिटिश व फ्रेंच फौजांची कल्पना ही आहे, की जर्मन सैन्याशी बेल्जम-हॉलंडमध्ये घुसून समोरासमोर मुकाबला घ्यायचा ! या दृष्टीने बेल्जम व हॉलंडमध्ये घुसणाऱ्या जर्मन सैन्याने फक्त पहिला रेटा द्यायचा व मग फारसा जोर करायचा नाही. ब्रिटिश–फ्रेंच फौजा हॉलंड–बेल्जममध्ये घुसून वर सरकल्या, की मॅजिनॉट तटबंदीच्या उत्तर टोकाजवळील आर्देन्सच्या जंगलभागातून चिलखती सैन्याने जोराची मुसंडी मारून सेडान्च्या उत्तरेस म्यूस नदी ओलांडावयाची व तिथून खाली न वळता सरळ रेषेत उघड्या मैदानातून घुसून इंग्लिश खाडीवरील अॅबरव्हिल बंदर गाठायचे ! यामुळे ब्रिटिश व फ्रेंच सैन्य कॅले–डंकर्क विभागात कोंडले जाईल व त्याचा फडशा पाडता येईल.

हिटलरने आपल्या लढायांतून सर्व धाडसी सूचनांचे नेहमीच स्वागत केलेले आढळते. जनरल मॅनस्टीन्चा हा युद्धव्यूह हिटलरने एकदम स्वीकारला ! १७ फेब्रुवारीला एका खान्याच्या प्रसंगी जनरल मॅनस्टीन याने हिटलरला ही सूचना केली व तेव्हापासून या एकाच योजनेवर हिटलरने सर्व विचार एकवटलेले होते. १७ फेब्रुवारी ते १० मे १९४० या कालात या एकाच युद्धव्यूहाच्या दृष्टीने जर्मन सैन्याची रचना आखण्यात आली होती. पोलंडमधील युद्धाचा अनुभव त्यांच्या




पाठीशी होता. नॉर्वेतील विजयाने जर्मन सैन्य एका विजयी उन्मादात होते.

१० मे ची पहाट होण्यापूर्वी, हिटलर जातीने कायटेल व जोडल या आपल्या सेनापतींसह युद्धभूमीपासून पंचवीस मैलांजवळील आपल्या छावणीत दाखल झाला. घड्याळाचा काटा पहाटे चारवरून सरकला आणि उत्तरेकडील समुद्रापासून तो मॅजिनॉट तटबंदीच्या टोकापर्यंत— १७५ मैलांच्या आघाडीवर नाझी चिलखती सैन्ये हॉलंड, बेल्जम व लक्झेंबर्गच्या सरहद्दी ओलांडून दौडू लागली. पहाट फुटण्यापूर्वी १७५ मैलांची आघाडी धडाडू लागली.

डचांचा विश्वास होता, तो पाण्याचे प्रचंड बंधारे उद्ध्वस्त करून देश जलमय करून सोडण्याच्या इराद्यावर ! परंतु डचांनी फारसे काही करण्यापूर्वीच जर्मन छत्रीधारी सैनिकांनी धरणाचा कबजा केला. पहिल्याच दिवशी सर्व धरणांच्या किल्ल्या जर्मनांच्या हातात गेल्या व देश जलमय करून जर्मन सैन्यांना गटांगळ्या देण्याची कल्पना डचांचा मनातच राहिली. आकाशातून जर्मन छत्रीधारी सैनिकांनी मुख्यत: ही कामगिरी उरकली. धरणाच्या भिंतीवरच ते अलगद उतरले व डचांचा देश पहिल्याच दिवशी गर्भगळीत झाला. पाच दिवस डचांनी कसाबसा टिकाव धरला, परंतु या पाचच दिवसांत— बेल्जम, फ्रेंच आणि ब्रिटिश फौजांची दाणादाण उडणार, ही गोष्टही सुस्पष्ट झाली.

काही धरणे डचांनी उद्ध्वस्त केली, परंतु त्या त्या ठिकाणी जर्मन पॅरॅशूट सैनिक डचांच्या सैन्यफळीच्या मागे हजारो संख्येत उतरले व त्यांनी डचांना मागे ठेवून आपली घोडदौड चालूच ठेवली. हेग या ठिकाणी डचांची राजधानी होती. राणी तिथेच होती. हेग शहराभोवतीचे तिन्ही विमानतळ जर्मनांच्या, १७ मेला सकाळीच हातात पडले. परंतु या ठिकाणी जर्मनांचा अंदाज थोडा फसला. डच सैन्याने

जर्मनीच्या सैन्याशी मुकाबला सुरू केला. १० मे हा सबंध दिवस हातघाईचे युद्ध झाले व राणी निसटली! मात्र यामुळे झाले काय, की डच सैन्याचा सर्व मोठा विभाग राजधानी लढवण्यात अडकून पडला.

खालच्या अंगाला असलेला रॉटरडॅम शहराजवळील निवे नदीवरील मोठा पूल व डॉरशेत् आणि मोर्डिझ या ठिकाणचे म्यूस नदीवरील मोठे पूल हाती पडल्याखेरीज शंभर मैलांवरून पुढे येत असलेल्या जनरल कुचरेलच्या सैन्याला हॉलंडच्या तटबंदीत घुसायला दुसरा रस्ताच नव्हता! ही जलतटबंदी अन्यथा अभेद्य होती. या तटबंदीच्या आड–हेग, ॲमस्टरडॅम, रॉटरडॅम व लेडन् ही सर्व प्रमुख ठिकाणे होती.

१० मेला हे तीनही पूल जर्मनांच्या हाती पडले. याच दिवशी खुद्द रॉटरडॅम येथील पुलावर पॅरॅशूटमधून उतरलेले जर्मन सैन्य फारच थोडे होते. डच सैन्याने दोन दिवस त्यांना तेथून हुसकण्याकरता शर्थ केली, परंतु जर्मनांनी दाद दिली नाही. जनरल कुचरेलची ते वाट पाहात होते! अपेक्षेप्रमाणे १२ मेला शंभर मैलांचे अंतर कापून जनरल कुचरेलच्या चिलखती फौजा रॉटरडॅममध्ये घुसल्याच!

मॉर्डीक येथील पुलांच्या संरक्षणासाठी डचांच्या दिमतीला फ्रेंच सैन्य वर सरकले होते. ११ मेला फ्रेंच सेनानी जनरल गिराड याचे सैन्य टिल–बर्ग शहरामधून मॉर्डीक येथे धावून आले होते. परंतु या सैन्याला विमानांची मदत नव्हती. त्यांच्याजवळ टँकविरोधी शस्त्रे नव्हती, की विमानविरोधी तोफा नव्हत्या. जर्मन पॅन्झर तुकडीने मॉर्डीक व डॉरशेट् येथील दोन्ही पुलांवरून जर्मन सैन्ये पुढे काढली व रॉटरडॅम येथे जर्मन हवाई तुकड्यांनी झुंझवत ठेवलेला रॉटरडॅम येथील पूलही त्यांच्या हाती पडला. डचांची पळापळ अटळ आली.

## रॉटरडॅमवर बाँबफेक

१३ तारखेलाच हॉलंडची अभेद्य तटबंदी कोसळणार अशी आशा वाटत होती, परंतु डचांनी पुन: पुलाच्या दुसऱ्या टोकाला फळी उभी केली. हॉलंडचा कैबजा करायला चारपाच दिवसांहून अधिक काळ लागणे, ही गोष्ट हिटलरला अभिप्रेत नव्हती. कारण तिथल्या पॅन्झर तुकड्यांना खाली दक्षिणेकडे धाडणे भाग होते. १३ मेला सायंकाळी हिटलर व गोअरिंग यांनी रॉटरडॅम शहरावर बॉम्बफेक करण्याची आज्ञा सोडली.

रॉटरडॅमवर १४ मेला प्रचंड बाँबवर्षाव सुरू झाला. वस्तुत: १४ मेला सकाळीच डचांनी रॉटरडॅम शरण जात आहे, असे जर्मनांना कळवले होते. असे असूनही १४ मेला दिवसभर जर्मन विमानदलाने रॉटरडॅमची राखरांगोळी केली. त्यांना फक्त रॉटरडॅम नको होते! हवी होती शरणागती! क्षणाचाही विलंब न लावता! या बाँबहल्ल्यात ८०० डच नागरिक ठार झाले. दहा हजारांवर जखमी झाले व शिवाय ७८००० बेघर झाले!

परंतु हे सर्व होत असताना डच सरकारचे मंत्री व राणी विल्हेमिना ही पहाटे ब्रिटिश विनाशिकेमधून लंडनला निसटली! राणी निसटली हे कळताच डच सर-



नेपोलियनची दुसरी आवृत्ती : आर्देन्सच्या दाट जंगलातून हिटलरच्या फौजा घुसतील अशी दोस्तांना कल्पनाही नव्हती.

★

सेनापती विंकलमन् (M. G. Winkelman) याने सकाळी ११ वाजता शरणागती पत्करली. पाच दिवसांत जर्मनांनी ठरल्याप्रमाणे हॉलंडची लढाई संपवली. रॉटरडॅम बेचिराख होते ना, तर कदाचित ही लढाई आणखी रेंगाळली असती ! याच भूमिकेवरून पुढे न्यूरेन्बर्ग येथे जर्मन सेनाधिकाऱ्यांनी रॉटरडॅमवरील भयानक बॉम्बवर्षावाचे समर्थन केले. हॉलंड देशावर गुलामगिरीची काळरात्र पसरली. १४ मे १९४० !

## दोस्तांच्या फळीत खिंडार

१० मे, १९४० ते १३ मे, १९४० या चार दिवसांत जनरल मॅनस्टीनच्या अंदाजाप्रमाणे ब्रिटिश व फ्रेंच सैन्ये बेल्जममधून वर सरकली होती. आॅर्देन्सच्या जंगलातून जर्मन सैन्याचा लोंढा पुढे घुसेल, अशी त्यांना यत्किंचितही कल्पना नव्हती.

जर्मनांनी अंदाज घेतला, की ब्रिटिश व फ्रेंच फौजा वर सरकल्या आहेत व १४ मे १९४० ला जर्मनीने आतापर्यंतच्या लढाईत कधीही एकवटली नसतील, एवढी टँकदले व चिलखती तुकड्या आर्देन्सच्या जंगलातून पुढे काढल्या ! येथे लढाईची अपेक्षा नसल्याने अगदी थोडे फ्रेंच सैन्य आडवे आले. त्यांचा लुटुपुटीचा प्रतिकार मोडून काढून प्रचंड जर्मन सैन्य, डाईव्ह बॉम्बर्सच्या छत्राखाली नद्या कालवे, रबरी बोटींनी ओलांडीत सेडानचा कबजा करून इंग्लिश खाडीच्या दिशेने झेप घेऊ लागले.

सेडानच्या लढाईत जनरल गुडेरीन् यांच्या सैन्याने जेथे म्यूस नदी ओलांडली, तेथील पूल उडवण्यासाठी ब्रिटिश विमानदलाने निकराचा प्रयत्न केला. परिणामी त्यांच्या ७५ बॉम्बर्सपैकी ४० बॉम्बर्स व ७१ ब्रिटिश लढाऊ विमाने जर्मनांनी खाली पाडली. ब्रिटिशांचा आकाशातील प्रतिकारच संपला. छत पडावे, त्याप्रमाणे ब्रिटिश व फ्रेंच फौजा काही सेडान येथील भगदाडाच्या दक्षिणेकडे, तर काही सेडानच्या वर उत्तरेकडे कॅले-डंकर्कच्या दिशेने पळत सुटल्या.

दोस्तांच्या सेनाधिकाऱ्यांत एकच घोष उठला – दोस्तांच्या फळीत सेडान् येथे खिंडार पडले आहे ! खिंडार सारखे मोठे होत होते आणि मोहोळातून माशा सुटाव्या, त्याप्रमाणे जर्मन चिलखती सैनिक त्या खिंडारातून ब्रिटिश खाडीच्या दिशेने झेपा घेत होते. १४ तारखेला सायंकाळी जर्मन सैन्याने पाडलेले हे खिंडार ३० मैल रुंद व १५ मैल खोल होते. दोस्तांच्या फौजांचे 'पाकिस्तान' झाले होते. लढाऊ उत्तम दोस्त फौजा कॅले-डंकर्ककडे माघार घेत होत्या व उरलेसुरले पराभूत फ्रेंच सैन्य – पॅरिसच्या दिशेने खाली पळत होते.

१० मे ला पंतप्रधानपदाची वस्त्रे घेतलेले विन्स्टन चर्चिल सोमवारी १३ मे, १९४० ला कॉमन्स सभागृहात सरकारवरील विश्वासाचा ठराव मंजूर करून घेण्यासाठी सांगत होते –

"I have nothing to offer but blood, toil, tears & sweat ! you ask what is your policy ? I will say–it is to wage war, by sea, land & air, with all our might & with all the strength that God can give us. That is our policy ! you ask what is yonr aim ?– victory ! Victory at all cost. Victory inspite of all terror. Victory however long & hard the road may be. For without victory there is no survival... "

[ रक्त, श्रम, अश्रू आणि घाम एवढेच फक्त यावेळी देण्यासारखे माझेजवळ आहे. तुम्ही विचाराल – तुमचे धोरण काय ? मी सांगेन – युद्ध करणे ! समुद्रावर, जमिनीवर, आकाशात सर्व सामर्थ्यानिशी व परमेश्वर देईल तेवढ्या शक्तीनिशी युद्ध करणे – हेच आमचे धोरण आहे. तुम्ही विचाराल – तुमचे ध्येय काय ? मी एकाच शब्दात उत्तर देतो.– विजय ! पडेल ती किंमत देऊन विजय – कितीही

भीषण परिणाम भोगावे लागले, तरीही विजय ! मग तो मार्ग कितीही कठीण व दूर पल्ल्याचा असला, तरी चालेल – विजय हेच आमचे ध्येय राहील – कारण विजयाखेरीज आता आपल्याला दुसरी गतीच नाही ! ]

## शब्दांची किमया

चर्चिल यांच्या या उद्‌गारांनी कॉमन्स सभागृहात चतन्य पसरले. या शब्दांची वाफ बिरण्यापूर्वीच २४ तासांत फ्रान्समधील, प्रचंड पराभवाच्या बातम्या लंडनवर येऊन कोसळल्या; परंतु चर्चिलच्या शब्दांनी स्फुरण पावलेले राष्ट्र अंतिम विजयावर श्रद्धा ठेवून लढत राहिले ! पडेल ती किंमत देऊन लढत राहिले ! पंचवार्षिक योजना कोसळतील – धरणे फुटतील – वास्तू मोडतील – चर्चिलला बोलायला काय होते ? लढाई म्हणजे केवढी भयंकर असते ! अहो वाचीवीर, आपला निर्धार आवरा, असा उपदेश करणारा एकही भडभुंजासुत इंग्लंडमध्ये त्यावेळी निघाला नाही ! चर्चिल यांच्या या साध्यासुध्या निर्धाराला राष्ट्राने एकमुखाने साथ दिली. अखेर वाचाच महत्त्वाची असते. ज्या देशातल्या नेत्यांची वाचाच दुबळी, ते नेतृत्व देशाला काय वाचवणार ? कसला संदेश करणार ?· कसली लढाई करणार ? अशा नतृत्वाला लोकांनी सांगितले पाहिजे – " मध्यमे – शेपुट – लोपी माय बापांनो – आता सत्तेवरून खाली उतरा ! उतरला नाहीत, तर गचांडी देऊ ! ! "

१४ मेला सकाळी ७ वाजता पंतप्रधान चर्चिल यांना फ्रेंच पंतप्रधानांचा संदेश आला–

" सेडान येथे जर्मनीने पाडलेले भगदाड क्षणाक्षणाला मोठे होत आहे. जनरल गॅमलीन व जनरल जॉर्जेस यांना जर्मनांना टक्कर देणे अशक्य होत आहे. आणखी लढाऊ विमाने व बॉम्बर्स पाठवा ! ! "

लढाऊ विमाने पाठवा – बॉम्बर्स पाठवा – चर्चिल यांचेपुढे प्रश्नचिन्ह होते. फ्रान्समध्ये गेलेल्या ४७४ विमानांपैकी २०६ नष्ट झालीच होती. उरलेली तिथेच झुंझत राहिली, तर नष्ट होणार होती. फ्रेंचांच्या रणभूमीवर ब्रिटनचे सर्व वायुदल कामी आले, तर ब्रिटनचा बचाव कसा व्हायचा ? एअर मार्शल डाऊलिंग याने १४ मे ला चर्चिल यांना इशारा दिला – " २५ स्क्वाड्रन्सएवढी फायटर विमाने असल्याखेरीज ब्रिटनचा बचाव अशक्यच होईल. " ब्रिटनमधले विमानांचे कारखानेच उद्‌ध्वस्त झाले, तर मग जर्मनीविरुद्ध विमानांची लढाईच संपली ! ! चर्चिल यांनी निर्णय घेतला – यापुढे अधिक विमाने फ्रेंचांच्या भूमीवर निकामी करणे परवडणारे नाही.

## आपली दाणादाण झाली आहे

१५ मे उजाडला. सकाळी साडेसात वाजता पंतप्रधान चर्चिल यांचा फोन घणघणला. चर्चिल यांना उठवण्यात आले. फोनवर फ्रेंच पंतप्रधान रेनो स्वत: बोलत होते. इंग्रजीतून बोलत होते. चर्चिल सांगतात–

" मी फोन उचलला. शब्द आले – ' आपला पराभव झाला आहे. ' मी लगेच काहीच बोललो नाही. पुनः रेनो बोलू लागले – ' We are beaten, we have lost the battle. "

[ आपली दाणादाण उडाली आहे. आपण लढाई हरलो आहोत. ] मी सांगितले – ' छे: छे: इतक्या झटपट हे सर्व कसे शक्य आहे ? ' परंतु रेनो सांगू लागले – ' सेडानजवळ आमच्या फळीत खिंडार पडले आहे व त्यातून जर्मन सैन्य चिलखती गाड्या व टँकरसह प्रचंड संख्येने... ' मी रेनो यांचे भाषण मध्येच तोडून सांगितले – ' आतापर्यंतच्या अनुभवाप्रमाणे थोड्याच दिवसांत जर्मनीचा जोर ओसरेल.... मागील लढाईत २१ मार्च १९१८ ला...' माझे बोलणे संपण्यापूर्वीच रेनो यांनी पुन: हताशपणे सांगितले – " No, No – We are defeated, we have lost the battle... ! " [ नाही हो नाही ... आपला पराभव झाला आहे. युद्ध आपण गमावले आहे. ]

चर्चिल यांनी तावडतोब ब्रिटिश सेनानी जनरल जॉर्जेस यांना फोन लावला. जनरल जॉर्जेस यांनी हे मान्य केले, की सेडान येथून सैन्ये मागे घेतली गेली आहेत. परंतु हे खिंडार बुजावता येईल, असे त्यांना अजून वाटत होते.

चर्चिल यांना नक्की परिस्थिती समजेना. ब्रिटिश सेनानी सेडानचे खिंडार बुजविण्याची उमेद धरतो, तर फ्रेंच पंतप्रधान – " आपली दाणादाण उडाली. लढाई हरलो, " असे पुन:पुन्हा सांगतो ! प्रत्यक्ष अंदाज घेण्यासाठी चर्चिल १६ मे, १९४० ला दुपारी ३ वाजता ' फ्लॅमिंगो ' या ब्रिटिश पॅसेंजर विमानाने पॅरिसला जाण्यासाठी निघाले. त्यांच्याबरोबर जनरल डिल व इस्मे होते.

ब्रिटिश पंतप्रधान फ्रान्स राजधानीत पोचण्यापूर्वी बेल्जमची लढाईही जर्मनांनी आटोक्यात आणलेली होती. बेल्जममधील अल्बर्ट कालव्यावरील पूल त्यांनी छत्रीधारी सैनिकांच्या मदतीने पहिल्याच सपाट्यात कबजात घेतलेले होते. म्यूस नदी व अल्बर्ट कॅनॉल यांच्या संगमावरचा एबेन – अेमेल ( Fort Eben Emael ) हा किल्ला अभेद्य समजला जात असे व तसाच तो आतापर्यंतच्या लढायांत गाजलेला होता. साऱ्या युरोपात अभेद्य असलेल्या या किल्ल्याची रचनाही मोठी चाणाक्षपणे केलेली होती.

१२०० बेल्जम सैनिकीशक्तीचा हा किल्ला, भूमीखाली काँक्रीटच्या वर्तुळाकार गॅलऱ्यांनी बांधलेला होता. कितीही बॉम्बवर्षाव केला तरी हा गड दाद देणार नाही अशी अपेक्षा होती...काय आश्चर्य पाहा – ! अवघ्या ८० जर्मन सैनिकांनी ३० तासांत हा किल्ला सर केला ! ! फक्त सहा जर्मन सैनिक मारले गेले व एकोणीस जखमी झाले. हे कसे घडले ? हे ८० सैनिक छत्रीधारी होते. हे सव किल्ल्याच्या तटावरच उतरले व तोफांच्या टरेटस्‌मध्ये त्यांनी बॉम्ब उडवून तोफा बंद पाडल्या. आग फेकणाऱ्या (Flame throwers ) व गॅस निर्माण करणाऱ्या

अस्त्रांनी, त्यांनी किल्ल्याच्या तळघरात धूरच धूर निर्माण केला. स्टूका विमानांनी बॉम्बफेक करीत या सैनिकांना साथ दिली. छत्रीधारी सैनिकांनी किल्ला आतून झुंजत ठेवला व अल्बर्ट कॅनॉलवरील पुलावरून येणाऱ्या जर्मन पॅन्झर तुकड्यांचे जथे येऊन त्यांनी किल्ल्याला वेढा देताच १२०० बेल्जम सैन्याने शरणागती पतकरून किल्ल्यावर शरणागतीचे पांढरे निशाण फडकवले.

मागे हटलेल्या ब्रिटिश, बेल्जम व फ्रेंच सैन्याच्या तुकड्या अँटवर्प ते नामूर या रेषेवर पुनः भक्कमपणे उभ्या ठाकल्या. ही फळी जीव धरू लागलेली हे पाहताच खालून अधिक अधिक फरेंच व ब्रिटिश सैन्य त्यांच्या दिमतीला धावले. जी फळी भक्कम आहे, असे वाटत होते तीच अखेर दोस्तांच्या सैन्याची फासाची फळी ठरली! कारण जनरल मॅनस्टीन याच्या योजनेप्रमाणे–वरून फक्त पहिला रेटा देऊन दोस्तांच्या फौजा सापळ्यात ओढायच्या एवढीच कामगिरी बेल्जममध्ये घुसलेल्या जर्मन सैन्याकडे होती व अपेक्षेप्रमाणे दोस्तांच्या फौजा नेमक्या या जाळ्यात अडकल्या. ११ मे ते १४ मे जर्मन हल्ला आपण अडवला, या भ्रमात राहिलेले ते तीन-साडेतीन लक्ष दोस्त सैन्य– १४ मे ला सेडानमधून-जनरल कुचलेरने धगदाड पाडताच–दोस्तांची फळी फुटली हे ध्यानात येऊन समुद्राच्या दिशेने पाय काढू लागले!

जर्मन जनरल हालडरने १३ मे ला आपल्या दैनंदिनीत खालील नोंद केलेली आढळते–

"नामूरच्या उत्तरेस सुमारे २४ ब्रिटिश–फ्रेंच डिव्हिजन्स व पंधरा बेल्जमच्या डिव्हिजन्स एवढे सैन्य गोळा झालेले आहे. यांच्याशी मुकाबला करायला फक्त १४–१५ डिव्हिजन्स जर्मन सैन्यच आहे......परंतु येथे अधिक सैन्याची जरूरी नाही. नामूरच्या दक्षिणेस शत्रूचे सैन्यच जवळजवळ आता नाही. म्यूस नदीवरील चढाईचा अंदाज लागला, की पुढची हालचाल स्पष्ट होईल–"

नामूरच्या दक्षिणेची ही चढाई म्हणजेच सेडानमधून घुसलेले जर्मन चिलखती सैन्य!

१४ मे १९४० ला सेडानचे खिंडार रुंद होऊ लागले आणि बेल्जमकडे वर सरकलेल्या सैन्याच्या पिछाडीस–दोस्तांचे तर सैन्यच नव्हते!

## विजयासाठी माघार

१५ मे ला सकाळपर्यंत हिटलरच्या सैनिकी व्यूहाचा अंदाज दोस्तांना आला. अँन्टवर्प ते नामूरपर्यंत लढत असलेल्या दोस्तांच्या सेनानींनी मागे वळून पाहिले मात्र आणि त्यांचे डोळे पांढरे झाले. पिछाडीवर जर्मन सैन्याचे लोंढेच्या लोंढे अॅबरव्हील बंदराच्या दिशेने सुटलेले!! जनरल मॅनस्टीनच्या या व्यूहाने दोस्तांना चारीमुंडे चीत केले होते. आता सर्वत्र एकच घोषणा ऐकू येऊ लागली– माघार! विजयासाठी माघार. परंतु माघार! समुद्रापर्यंत माघार! डंकर्क-कॅले जेथून जमेल तेथून इंग्लंडचा किनारा गाठणे हेच ध्येय!!

ब्रिटिश सेनानी मात्र या माघारीत पराभवाच्या ज्या भीषण छाया दिसत होत्या, त्यांनी नामोहरम झालेले नव्हते. या उलट फरेंच पंतप्रधानांनी आक्रोश सुरू केला–

" आपली दाणादाण उडाली आहे. आपला पराभव झाला आहे. "

१६ मे ला सकाळी चर्चिल पॅरिसमध्ये दाखल झाले. क्विडी ओरसे (Quaid Orsay) या इमारतीत, पंतप्रधान रेनो व जनरल गॅमलीन त्यांची वाट पाहात होते. जर्मनींची आघाडी पुढे पुढे सरकत होती. सेडानहून आलेले इंग्लिश–जर्मन सैन्य खाडीच्या दिशेने जाणार की खाली पॅरिसकडे वळणार, हा फक्त त्यांच्या खुषीचा प्रश्न होता. प्रतिकार इकडे नव्हता, तिकडेही नव्हता. दोस्तांच्या सैन्याला पिछाडीच नव्हती ! चर्चिल यांना या परिस्थितीची त्यावेळी कल्पना नव्हती म्हणून त्यांनी उतरताच जनरल गॅमलीन यांना विचारले–

" Where is the strategic reserve ? "

[ आयत्या वेळी दिमतीला पाठवण्याचे राखीव सैन्य कुठे आहे ? ]

नकारार्थी मान हलवीत जनरल गॅमलीनने फ्रेंचमध्ये उत्तर दिले–

" Aucune. "

[ राखीव सैन्यच नाही ! ]

चर्चिल लिहितात– " I was dumfounded. It was unheard of that a great army when attacked held no troops in reserve. I admit that this was one of the greatest surprise I have had in my life."

[ माझ्या तोंडून शब्द फुटेना. एवढे मोठे सैन्य, हल्ला झालेला असताना राखीव म्हणून काहीही सैन्य मागे ठेवत नाही; अशी गोष्ट कधी कुणी ऐकली होती का ? मला हे कबूल केले पाहिजे, की आयुष्यात मला बसलेला हा एक प्रचंड धक्का होता. ]

## पॅरिस रिकामे होऊ लागले

चर्चिल यांचे लक्ष खिडकीबाहेर गेले. बाहेर ठिकठिकाणी धूर निघत होता. सरकारी कागदपत्रांच्या छोटया छोटया होळ्या सुरू झाल्या होत्या. हातगाडयांवरून पॅरिसमधील शिल्पे हलवण्यात येत होती. चर्चिल यांच्या हे लक्षात आले, की पॅरिस खाली करण्याचे हुकूम सुटलेले आहेत. फक्त त्यांना हे माहीत नव्हते, की पॅरिस खाली होणार होतेच, परंतु न लढता ! प्रतिकाराचा प्रयत्नही न करता ते जर्मनीच्या स्वाधीन होणार होते ! फ्रेंचांना काळजी होती ती पॅरिसमधल्या सौंदर्यस्थळांची ! तेथल्या वास्तूंची– शिल्पांची– इमारतींची ! ! लाचार अवस्थेतही त्यांना हे सर्व हवे होते.

निराश अवस्थेत चर्चिल लंडनला परतले. फ्रेंचांच्या आग्रहाखातर त्यांनी ब्रिटनमध्ये उरलेल्या पस्तीस स्क्वाड्रन्स विमानदलांपैकी दहा स्क्वाड्रन्स विमाने दोस्त सैन्यांच्या मदतीला तावडतोब पाठविण्याचे मान्य केले. परंतु फ्रेंच फार काळ लढ-

णार नाहीत, लढाऊ मन त्यांचेपाशी नाही, जिद्द नाही, त्राण नाही याचा अंदाज चर्चिल यांना आला.

२० मे १९०० लाच चर्चिल यांनी डोव्हर येथील ब्रिटिश अॅडमिरल रॅम्से यांना आज्ञा सोडली–

" कॅले–डंकर्क–बोलोन या बंदरांतून दोस्त सैन्य काढून घेण्याची गरज निर्माण झाली तर प्रत्येक बंदरातून दहा हजारांवर सैन्य काढून घ्यावे लागेल. या दृष्टीने सर्व ब्रिटिश नौका, बोटी, क्रूझर्स, विनाशिका, होडया, मोटार बोटस् इंग्लिश खाडीत एकत्र करून तयारीत ठेवा."

परंतु यापूर्वी १७–१८ मे च्या सुमारास एक आश्चर्य घडले. इंग्लिश खाडीच्या दिशेने ⅔ अंतर कापून पुढे घुसलेल्या जर्मन पॅन्झर तुकडयांचा सेनानी जनरल गुडेरिन याला जर्मन हायकमांडची आज्ञा मिळाली, " फार पुढे जाऊ नका– ! "

हे नवल कसे घडले ? याला कारण असे घडले, की हिटलरला एकदम शंका आली, की सोमे येथे फ्रेंच फौजांवर अडकलेल्या दोस्त सैन्याशी संपर्क साधून जर्मन सैन्यच कात्रीत सापडण्याचा संभव आहे ......

हा तर्क बरोबर होता. १९ मे १९४० ला सकाळी फ्रेंच सेनापती गॅमलीन याने हाच पवित्रा घेतला, की वर अडकलेल्या दोस्त सैन्याने समुद्रापर्यंत रेषेवर स्थिर व्हावे व सोमेपर्यंत फ्रेंच सैन्याशी साखळी पुरी जोडून घ्यावी.

**गॅमलिनचा बळी**

१९ मे १९४० ला सकाळी जनरल गॅमलिनने ही आज्ञा सोडली आणि त्याच दिवशी सायंकाळी धास्तावलेल्या फ्रेंच पंतप्रधानांनी आतापर्यंतच्या पराभवाचे खापर गॅमलिनच्या शिरावर फोडून जनरल गॅमलिनला पदच्युत केले व सर्व सेनाधिकार जनरल वेगाँ यांचेकडे दिले......

जनरल वेगाँ यांना पहिल्या महायुद्धाचा अनुभव होता. ब्रिटिश सैन्याशी विचार–विनिमय केल्याखेरीज जनरल गॅमलिनच्या आज्ञा पाळू नका, असा आदेश त्यांनी दिला व ही महत्त्वाची लष्करी हालचाल तहकूब झाली ! दि. २२ मे ला गॅमलिनच्या निर्णयावरच वेगाँ आले, परंतु आता उशीर झाला होता. फ्रेंचांची विशेष हालचाल नाही, अशी खात्री पटताच जर्मन हायकमांडने जनरल गुरीनला इशारा केला होता. हे मधले तीन दिवस फ्रेंचांनी सेनापती बदलण्यात घालवले नसते, तर लढाईचा मोहराच बदलला असता. परंतु दोस्तांच्या दुर्दैवाने वेगाँ आपल्या घोडयावर स्थिर होण्यापूर्वीच गुडेरीनच्या पॅन्झर तुकडयांनी मुसंडी मारून अॅबटव्हील गाठले. २० मे १९४० या दिवशी सायंकाळी जर्मन सैन्याचा समुद्र सेडान ते अॅबटव्हील या रेषेवर पसरला आणि २४ मे ला गुडेरीनने धडाक्याने बोलोनचा कबजा करून कॅले बंदराला वेढाही घातला. एका त्रिकोणात दोस्त फौजा कोंडल्या गेल्या.

फौजा मागे घ्यायला आता एकच मार्ग उरला होता– डंकर्क ! [ अपूर्ण ] ●

# यंग नन्

## एक वास्तववादी इटालियन चित्रपट

इटालियन चित्रपट ' यंग नन् ' याला नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दुसरे पारितोषिक मिळाले. या चित्रपटाचे दिग्दर्शक ब्रूनो पावोलीनेली यांचे नाव यामुळे थोडेफार विख्यात झाले आहे.

श्री. अर्पिनो यांच्या ' यंग नन् ' या कादंबरीवरूनच हा चित्रपट श्री. पाओलिनेली यांनी तयार केला व त्यांचे वैशिष्टच हे, की यासाठी चित्रपटकथा अशी निराळी त्यांनी केलीच नाही. सर्व संवाद व प्रसंग कादंबरीत ज्या अनुषंगाने येतात, त्याच अनुषंगाने ते चित्रपटात जसेच्या तसे घेतले गेले आहेत. पाश्चात्त्य चित्रपटांच्या दिग्दर्शकांमध्ये असा एक प्रघात सुरू आहे, की " वाचनाचा आनंदच घेत आहोत अशा स्वरूपात चित्रपट सादर केले जावेत. " To discover reading Condition on the screen या दृष्टीचा हा प्रयत्न आहे.

श्री. पाओलिनेली यांचा पहिला चित्रपट ' The voice of silence (निःस्तब्धतेचा आवाज) हा होय. यानंतर त्यांनी The girl of sunday (रविवारची मैत्रीण), The love of war (युद्धप्रेम) व young nun (तरुण जोगीण) असे चित्रपट आतापर्यंत दिग्दर्शित केले आहेत. या चित्रपटव्यवसायात लेखक, छायाचित्रकार म्हणून त्यांनी प्रवेश केला व या सर्व बाबींचे यथायोग्य ज्ञान यामुळेच त्यांच्यापाशी आहे.

भारतापेक्षा इटालीतील चित्रपटरसिक फार निराळे आहेत, असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी भारतात आल्यावर सांगितले,

" The people in Italy are more interested in seeing good stories on the screen rather than the stars. I think it should be so everywhere. "

[ इटालीमध्ये लोकांना लोकप्रिय नटनटयांच्या चेहऱ्यांपेक्षा चांगल्या कथा पडद्यावर हव्या असतात. मला वाटते सर्वत्र असेच व्हावयाला पाहिजे. ]

आपल्याकडील हिंदी चित्रपटाच्या भयानक कथा पाहून परदेशीय जाणकार मंडळी आपल्या देशाची मनात काय किंमत करीत असतील, हे या उद्गारांवरून कळून येण्यास हरकत नाही.



ॲफ्रिकियान व इलियट



पाओलीनेली

**कथा**

कथानायकाचे वय आहे चाळीस वर्षांचे. नायिका आहे वीस वर्षांची कोवळी नन ! ननचं प्रेमप्रकरण ही गोष्ट ऐकायलाच जरा विचित्र वाटते, पण अशा अनेक गोष्टी जीवनात घडतच असतात. नाही का ?

अन्तोनिओनी मथाइस हा चाळिशीच्या आसपासचा. एका फर्ममध्ये ट्रान्स्लेटर असलेला मध्यमवयाचा माणूस. त्याचं जीवन कसं साधं आणि सरळ असतं. ॲना ही त्याच्यावर प्रेम करणारी एक स्त्री. शिवाय त्याच्या ऑफिसमधील एक टायपिस्ट पोरगीपण त्याच्यावर फिदा. सरळ धोपट मार्गाने जाणारा हा आन्तोनिओनि एक दिवस ट्रामच्या स्टॉपवर एका तरुण ननला पाहतो आणि त्याच्या आयुष्यात बदल घडतो.

चित्रपटाची सुरुवातच दिग्दर्शकाने मोठ्या नाट्यमयरीत्या केली आहे. खोलीत अंधार आहे. रात्रीचे आठ–साडेआठ वाजले आहेत. नायक आरामखुर्चीत बसला आहे अन् तो आपली कहाणी सांगतो आहे. वाइड लेन्सचा उपयोग करून वरच्या कोनानं पहिला प्रसंग घेण्यात आला आहे. याच शॉटमध्ये नायक उठतो आणि खिडकीपाशी जातो. ट्रामच्या स्टॉपवर ती नन येऊन उभी राहते आणि खऱ्या चित्रपटाला सुरवात होते.

सिरेना नावाची ती नन अगदीच भोळी. जगाचा तिला काहीच अनुभव नाही. अन्तोनिओनीवर ती मनापासून प्रेम करते. तिला त्याच्याशी लग्न करायचं असतं.

[पृष्ठ ७२ वर चालू]

## सत्यजित यांच्या " चारुलता " चित्रपटास सुवर्णपदक



**चारुलतामध्ये माधवी मुकर्जी आणि सौमित्र चतर्जी**

" ' संगम ' सारख्या अफाट जाहिरातीच्या चित्रपटाकडे कुत्सित नजरेने पाहायचे व कुठल्यातरी कोपऱ्यातल्या चित्रगृहात येऊन गलेल्या सत्यजित रॉयच्या ' चारुलता ' सारख्या त्यांच्या आधीच्या चित्राहून बराचसा ' गचाळ व साचेबंद ' असलेल्या चित्रपटाला उचलून धरायचे ... "

६–११–१९६४. सुधीर नांदगावकर,
दिवाळी अंक, दैनिक मराठा.

श्री. सत्यजित रे यांच्या ' चारुलता ' या चित्रपटास राष्ट्राध्यक्षांचे १९६५ चे सुवर्णपदक मिळाले आहे.

' चारुलता ' या चित्रपटाची प्रदीर्घ मूळ कथा " नष्टनीड " ही क. रविंद्रनाथ टागोर यांची. या कथेच्या कै. वरेरकर यांनी केलेल्या अनुवादाचे संक्षिप्त रूप ' माणूस ' १९६४ च्या दिवाळी अंकात येऊन गेले आहे. ' नष्टनीड ते चारुलता ' हा श्री. सत्यजित यांचा चित्रपटप्रवासही सौंदर्य-स्थळांसह त्याच अंकात दिला आहे.

कोपऱ्यातल्या चित्रगृहात लागलेल्या या गचाळ व साचेबंद चित्रपटास सुवणपदक दिल्याबद्दल परीक्षकमंडळाचे आम्ही अभिनंदन करतो.

महेश

[पान ७१ वरून चालू]
त्याचा तिला आधार हवा असतो. आपला उजवा हात ती त्याच्या धडधडणाऱ्या छातीवर ठेवते. त्याची बोटं आपल्या डोक्यावरही केस असल्याचं दाखवण्यासाठी कानाजवळ खुपसते. आपल्याला रात्री पडलेलं स्वप्न त्याला अधीरपणानं सांगते. असे सर्व प्रसंग उत्कृष्ट रीतीने चित्रित केलेले आहेत. तिच्या चेहऱ्यावरचे भाव कसलेल्या कलावंताचे वाटतात. सगळा चित्रपट संवादांनी भरलेला आहे. कॅमेऱ्याची दिशा सतत बदलली जात नाही, की सेट्सही बदलत नाहीत. असं असूनही चित्रपट मनाची पकड घेतो.

अन्तोनिओनी सिरेनाबरोबर लग्न करावयाचा विचार पक्का करतो. ॲनाला सोड-चिठ्ठी देतो. सिरेनाकडे येतो, पण एकदम त्याचं धैर्य गळल्यासारखं होतं. सिरेना घाबरते व पळून जाते. अन्तोनिओनी तिचा पत्ता काढण्यासाठी तिच्या गावी जातो. तिच्या आईला भेटतो. स्टेशनवर येतो. खूप वेळ तिच्या गावाचे नाव असलेल्या बोर्डकडे पाहात राहतो.

दोन तासांहून थोडासा कमी असणारा हा चित्रपट केव्हा नि कसा संपतो याची प्रेक्षकांना जाणीव होत नाही. काहीतरी प्रत्यक्षात घडून गेल्यासारखं वाटतं. काही प्रसंग थोडे लांबले आहेत. उदा. हॉटेलमधील प्रसंग; पण त्यामुळे दिग्दर्शकाची विषयावरची पकड मात्र ढिली होत नाही. साऱ्या चित्रपटात महत्त्वाची अशी दोन पात्रे. अन्तोनिओनीचं काम करणारा जोनाथन इलयट आणि सिरेनाचं काम करणारी लॉरा एफ्रिकयिान. एफ्रिकियानचा हा पहिलाच महत्त्वाचा चित्रपट, पण तरुण ननच्या भूमिकेत लॉरा जणू ती भूमिका प्रत्यक्ष जगली आहे.

—पुरुषोत्तम बावकर

एकुलत्या एक मुलाच्या दुर्वर्तनामुळे
विफलमनस्क झालेल्या पित्याचे दैनंदिनीच्या
स्वरूपातील चित्रण

तपोवनातील दुर्वा

लेखक : प्रफुल्लदत्त

दुरंगी मुखपृष्ठ, किं. १॥ रु. ट. ख. वेगळा

बलवंत पुस्तक भांडार, मुंबई, ४.

# भिंतीच्या तुंबड्या

## • साम्यवादी पिंगपाँग

पिंगपाँग या खेळाची एक आंतरराष्ट्रीय स्पर्धा नुकतीच युगोस्लाव्हियात झाली. तीत साम्यवादी चीनचे खेळाडू विजयी झाले. का ? एक तर कुठल्याही खेळाला अंगचे कौशल्य लागते अन् मग खूप प्रॅक्टिस केली, की माणूस तरबेज होतो असे मी साध उत्तर दिले असते. पण तसे नाही महाराजा ! "पेकिंग डेली" या वर्तमान-पत्राने या विजयाची सखोल कार्यकारणमीमांसा करून असा शोध लावला आहे, की या खेळाडूंनी माओ–त्से–तुंगचे तत्त्वज्ञान आत्मसात केल्यानेच त्यांची खेळात सरशी झाली ! संपादकवर्गांनी विजयी खेळाडूंना असा इशाराही दिला आहे, की असाच नेहमी खेळात विजय मिळवायचा असेल, तर राजकारणाला प्राधान्य द्या आणि भौतिकतेचा महामुनी माओ याचे तत्त्वज्ञान कसे आचरणात आणता येईल, याचा विचार करीत असा.

म्हणजे आमचे बेटे सपशेल चुकले म्हणायचे ! पिंगपाँग खेळायला प्रॅक्टिस नको, विरोधविकासवाद हवा. पिंगपाँगचा कचकड्याचा चेंडू टण्टण् उड्या मारतो तो खेळाडूच्या बॅटीच्या तालावर नव्हे, तर वर्ग–कलह आणि मजूरवर्गाचे सर्वाधिकारित्व या तत्त्वांच्या तालावर, हे पिंगपाँग अन् विरोधविकासवाद या दोन्ही गोष्टी न समजणाऱ्या गावढळाला कसे कळणार ? साम्यवादी राजकारण खेळताना आणि पिंगपाँग खेळताना क्षणाक्षणाला बदलावे लागणारे पवित्रे एकच असतात, हा साक्षात्कार सहजासहजी कसा होणार ?

आता साम्यवादी पिंगपाँगमुळे तो झाला आहे, तेव्हा हे ओघानेच आले, की डॉन ब्रॅडमनपासून सी. के. नायडूपर्यंत सर्व क्रिकेटपटूंनी चर्चिलचा साम्राज्यवाद पालथा घातलेला असणार. अमेरिकेतला बेसबॉल हा अर्थातच भांडवलवादावर आधारलेला आहे, हे सुज्ञास सांगणे न लगे आणि आपल्याकडे हुतुतूच्या सामन्यात खेळणाऱ्या मुलाने 'हु–तू–तू' न म्हणता रामनाम म्हटले तर त्याचा विजय अटळ आहे.


प्रश्न एवढाच आहे, की पिंगपाँगचे साम्यवादाशीच (किंवा साम्यवादाचे पिंग-पाँगशीच) एवढे मेतकूट का ? त्यांतूनही आज माओ–मार्क्सवादाशी मिळते घेणारा पिंगपाँगचा बॉल उद्या रशियन साम्यवादाला गेम देणार नाही कशावरून ? ते काही असले तरी कुठला खेळ जमायला कुठले तत्त्वज्ञान कळायला हवे याचे एक पद्धतशीर

शास्त्र असले पाहिजे एवढा सुगावा तरी नक्की लागला. स्वामी विवेकानंदांनी मात्र एकदा म्हटले, " आधी फुटबॉल खेळा, म्हणजे वैदिक तत्त्वज्ञान समजण्याइतका दमदारपणा तुमच्यात येईल." कमाल आहे! फुटबॉल आणि वेद यांची अजब सांगड विवेकानंदांनी कोठून घातली? फुटबॉल खेळून अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ मालब्रेथ याचा "अॅफ्लुअंट सोसायटी" हा ग्रंथ समजेल, वेद कसे समजणार?



**● बैलाचा अपमान !**

कायदा गाढव असतोच. आता तो अती शहाणा झाल्याचेही दिसते. पॅरिसमध्ये म्हणे काटेकोर स्वच्छता पाळण्यासाठी असा कायदा करण्यात आला आहे, की हॉटेलात काची पडलेल्या कपात किंवा तडकलेल्या काचेच्या पेल्यात पेय देणे हा गुन्हा आहे. आता हे स्वच्छतेच्या पाठीमागे अक्षरशः हात धुऊन लागण्यासारखे नाही का? पुण्याच्या क्षुधा–शांति–गृहाला किंवा मुंबईच्या रसवंतीला हा नियम लावला, तर कानतुटके कप आणि विधवा बशा यांच्या तमाम जमातीत काय हाहा:कार माजेल! पण हे तर काहीच नाही. बैलाशी साठमारी खेळणाऱ्या एका इसमाला पॅरिसमध्ये

हरिभाऊ विश्वनाथ कं.

संगीत विद्यालय

दादर, मुंबई, २८.

खेळ संपल्यावर सांगण्यात आले : "रिंगणाच्या बाहेर येण्याच्या आधी पाय धुवा..." त्याने 'स्वच्छ' नकार दिला. म्हणाला, हा माझाच नाही तर बैलाचाही अपमान आहे ! आता पॅरिसवाल्यांनी बैलाला काही पाय धुवायला सांगितले नव्हते, तेव्हा बैलाचा अपमान कसा काय झाला, हे नक्की कळणे कठीणच. कदाचित असेही असेल, की बैलाच्या समोर स्वच्छतेची गोष्ट करणे हेच बैलाला 'लांछन' आहे.

## ● सरकारी विरजण

दिल्लीला लोकसभेत सरकारी दूध–पुरवठा योजनेमार्फत दही विकले जाते, त्यात म्हणे गेल्या आठवड्यात टिपकागद सापडला. हरहर ! सरकारी दूधवाल्याला दह्यात मिसळण्यासाठी टिपकागदाखेरीज दुसरे काही मिळू नये ना ? कल्पना करा, चीन आणि पाकिस्तानने पैदा केलेल्या आणीबाणीच्या या प्रसंगी टिपकागदाचा पुरवठा अपुरा पडला, तर काय अनवस्था प्रसंग निर्माण होईल ! या दोन्ही देशांना पाठविण्याच्या निषेधखलित्याचा 'स्टँडर्ड फॉर्म' असणार हे कबूल अन् त्याच्या हजारो प्रती छापून ठेवल्या असतील हेही कबूल, पण त्यांच्यावर नुसत्या एकामागून एक सह्या ठोकायच्या म्हटल्या तरी टिपकागदाचे गठ्ठेच्या गठ्ठे लागणारच. आणि अशा महत्त्वाच्या कामाला लागणारा टिपकागद सरकारचेच दूधवाले चक्क दह्यात मिसळतात. आता काय म्हणावे ?

शिवाय आणीबाणी नसतानाही टिपकागद हा फक्त 'सुपर–स्मूथ' आइस्क्रीम करण्यासाठीच वापरावा असा सर्वमान्य संकेत आहे. तोच टिपकागद सरकारी दह्यात जाऊ लागला तर मुलांना चांगले आइस्क्रीम कसे मिळणार ? पण मुले तर राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत. तेव्हा या केंद्रीय भैय्याला कळकळीचे सांगणे असे, की बाबारे, टिपकागद दह्यात मिसळण्याचा हा अराष्ट्रीय अविवेक सोडून दे आणि नेहरूचाचांची शपथ घे, की यापुढे काही झाले तरी भारताच्या भावी नागरिकांच्या तोंडचा टिपकागदाचा घास हिरावून घेणार नाही.

—सुधाकर राजे



# जगाच्या पाठीवर

**● तपासात गलथानपणा**

सरदार प्रतापसिंग कैरों यांच्या खुनाच्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी सुचासिंग याला पोलिसांनी नेपाळमध्ये अटक केली व त्याला हिंदी पोलिसांच्या ताब्यात द्यावे अशी मागणी करणारा खटला सध्या नेपाळचे कोर्टात चालू आहे. पोलीसतपासातील नेहमीचा गलथानपणा व दिरंगाई यामुळेच हा प्रसंग ओढवला. या गलथानपणावर प्रकाश टाकणारी एक नवीन घटना नुकतीच निदर्शनास आली आहे.

" मला काही सवलती दिल्या आणि कैरों खून प्रकरणाच्या तपासात माझे सहकार्य घेतले तर सुचासिंगाचा शोध लावण्यात मी मदत करू शकेन," अशा आशयाचे एक पत्र पंतप्रधान शास्त्रींना मार्चच्या सुरवातीस आले. उत्तर प्रदेशातील एका सबइन्स्पेक्टरने ते लिहिले होते. सुचासिंगसंबंधी माझ्याजवळ काही माहिती आहे. मला संधी दिलीत तर मीच सुचासिंगाच्या लपण्याच्या जागी पोलीसपार्टी घेऊन जाईन, असे त्याने या पत्रात कळविले होते. या पत्राची एक प्रत 'योग्य चाकोरीतून' त्याने पोलीस अधिकाऱ्यांकडे पाठविली होती, पण त्याचा गुन्हा एवढाच, की पत्राची प्रत त्याने पंतप्रधानांकडे आधी पाठविली. 'योग्य चाकोरी सोडून एकदम पंतप्रधानांकडे धाव का घेतली,' याचा जाब आता त्याला विचारण्यात येत असून त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई होण्याचा संभव आहे.

वास्तविक सुचासिंगच्या शोधाचे कामी या सबइन्स्पेक्टरचा उपयोग पोलीस-अधिकाऱ्यांनी तातडीने करून घेतला असता, तर नेपाळहद्दीत तो पळून जाण्यापूर्वीच पोलिसांच्या हाती तो लागला असता आणि आता या प्रकरणात जी गुंतागुत निर्माण झाली आहे, ती झाली नसती.

पोलीसअधिकाऱ्यांना व पंतप्रधानांना पत्र पाठविण्यापूर्वी या सबइन्स्पेक्टरने स्वतः पोलीस सुपरिटेंडेंटची भेट घेतली. दहा मार्चला हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या तराई भागातील एक जुना मित्र त्याच्याकडे आला. पंजाबमध्ये मोठा गुन्हा करून एक टोळी या भागात आसऱ्यासाठी आली आहे, असे त्याने सांगितले. त्याला घेऊन तो सबइन्स्पेक्टर तावडतोब पोलीस सुपरिटेंडेंटकडे गेला, पण त्याची निराशा झाली. " मला तुमची माहिती म्हणजे केवळ कल्पनेचे तर्कट वाटते," असे

उत्तर त्या बड्या साहेबाने त्यास दिले. यानंतर सुचासिगासंबंधी आणखी काही माहिती मिळाल्यावर त्या सबइन्स्पेक्टरने पोलीस अधिकाऱ्यांना रीतसर पत्र पाठविले, पण त्याची दखल घेतली न जाता ते फाइलीतच पडून राहिले. दरम्यानच्या काळात सुचासिंग नेपाळमध्ये पळाला.

सबइन्स्पेक्टरच्या पत्रावर काय उपाययोजना केली, अशी विचारणा करणारे पत्र पंतप्रधानांच्या कचेरीतून आल्यावर मग त्या पत्राची आठवण होऊन अधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली, पण त्याच्या माहितीचा योग्य वेळी उपयोग करायचे बाजूलाच राहिले. सुचासिंगच्या अटकेनंतर एक महिन्याने त्याला पत्र आले. त्यात "पंतप्रधानांकडे एकदम धाव घेतल्याबद्दल तुमच्याविरुद्ध शिस्तभंगाचा इलाज का करू नये ?" अशी धमकी त्याला दिली होती. गांधी–खुनापासून कैरॉं–खूनापर्यंत गेल्या सतरा वर्षांत पोलीसतपासातील गलथानपणा, दिरंगाई दीर्घसूत्रीपणा यात काहीहि सुधारणा झालेली नाही, हेच या घटनेने पुनः एकदा स्पष्ट झाले.

## ● योजना आल्या आणि गेल्या

आपल्या पंचवार्षिक योजनांची प्रगती दर्शविणारे आकडे व कागदी अहवाल सरकार मधूनमधून प्रसिद्ध करीत असते, पण गेल्या तीन पंचवार्षिक योजनांनी सर्वसामान्य जनतेच्या जीवनमानात आणि जीवनपद्धतीत खरोखर काही सुधारणा झाली आहे का, याची वस्तुनिष्ठ पाहणी होणे आवश्यक आहे. मदुरा कॉलेजच्या प्लॅनिंग फोरमने तिरुमंगलम पंचायत युनियनच्या कक्षेतील उचापट्टी खेड्याची या दृष्टीने पाहणी केली. तीन योजना पुऱ्या होत आल्या, तरी तेथील पिकांचे उत्पादन सरासरीपेक्षा नेहमी कमीच असते, असे आढळून आले. शेतकरी जुन्या पद्धतीचेच नांगर अजून वापरतात. मेंढ्यांची जोपासना, खतांचा वापर, याबाबतीत सुधारणेचा मागमूसही दिसला नाही.

हे झाले खेड्यांतील जीवनाचे चित्र. शहरातील मध्यमवर्गीयांवर नियोजनांचा काय परिणाम झाला, या दृष्टीने मदुरा शहरातल्या सुब्रह्मण्यपुरम भागातील मध्यमवर्गीय कुटुंबाच्या अंदाजपत्रकांची पाहणी या फोरमने केली. त्यात कुटुंबाचा ५० ते ६० टक्के खर्च अन्नावर होतो, असे आढळून आले. दीडशे ते तीनशे रुपये पगार असलेली कुटुंबे या पाहणीत अंतर्भूत होती. फक्त दोन टक्के लोकांना स्वतःची घरे होती. बाकीच्यांच्या पगाराच्या पंधरा टक्के घरभाडे द्यावे लागत होते. कपड्यांवर १० टक्के, जळणावर ५ टक्के, विजेसाठी ३ टक्के यांप्रमाणे खर्चाचे प्रमाण होते. सिनेमा हेच मुख्य करमणुकीचे साधन असून, त्यावर पगाराच्या तीन टक्के खर्च होत असल्याचे दिसून आले.

थोड्याफार फरकाने असेच चित्र भारतातील इतर शहरे व खेड्यांतूनही आढळून येईल.

● **केरळीय महिला.**

भारतीय महिलामध्ये आज केरळीय महिला आघाडीवर आहेत. हायकोर्टाचे न्यायमूर्तिपद भूषविण्याचा मान भारतात प्रथम एका केरळीय महिलेनेच मिळविला. कलेक्टर आणि एखाद्या खात्याचे सेक्रेटरीसारख्या जबाबदार जागांवरही त्यांच्या नेमणुका झालेल्या आहेत. नोकरी-धंद्यासाठी महाराष्ट्राबाहेर जाण्यास बहुसंख्य महाराष्ट्रीय पुरुष अजून तयार नसतात, पण केरळमधील स्त्रिया नोकरीसाठी हिंदच्या कोणत्याही भागात जाण्यास तयार असतात. आपल्याकडील बहुसंख्य स्त्रिया सध्याच्या बिकटआर्थिक परिस्थितीमुळे भागच पडते, म्हणून नोकरी करतात. केरळमधील महिलांची प्रवृत्ती अशी नाही. त्या आवड म्हणून नोकरी करतात. लग्नात नोकरीवाल्या स्त्रियांना मागणी असते.

केरळमध्ये पूर्वी मातृसत्ताक पद्धती होती. त्याचाच परिणाम म्हणून केरळीय महिला आज आघाडीवर असेल, पण पूर्वीच्या मातृसत्ताक पद्धतीत जातीयवाद आणि प्रतिगामी कल्पनांना खतपाणी मिळाले होते. आधुनिक केरळीय महिला मात्र विचाराने उरोगामी आहेत.

● **दीड रुपया रोज, लाख मोलाची मानवता !**

" रस्त्यावर दोघेजण आसन्नमरण असताना मी त्यांना तसेच टाकून पुढे जाणार तरी कशी ? " मद्रास येथे बांधकामावर मोलमजुरी करणाऱ्या २३ वर्षे वयाच्या एका स्त्रीचे हे उद्‌गार आहेत. तिचे नाव आहे लक्ष्मी, मूळ मदुराईची, पण मद्रासला मजुरी करण्यासाठी गेलेली. ऑफिसला निघालेला स्कूटरवाला राघवाचारी आणि त्याच्या धडकेला बळी पडलेला पार्थसारथी, हे दोघेही अपघात होऊन पडलेले, लक्ष्मीने कामावर जाताना पाहिले. राघवाचारीच्या तोंडातून, कानातून, रक्त वाहात होते, तर पार्थसारथीचा पाय मोडून तो वेदनांमुळे ओरडत होता. त्यांच्याभोवतो खूप गर्दी जमली होती. त्यांत पुष्कळ सुशिक्षितही होते. कित्येक लोक डोकावून पुढे जात होते, पण बिचाऱ्यांच्या मदतीला जाण्यास कुणीच तयार नव्हते; शेवटी लक्ष्मीनेच पुढाकार घेतला.



लक्ष्मी

जाणाऱ्या टॅक्सी थांबविण्याचा लक्ष्मीने प्रयत्न केला, पण ह्या मजूर स्त्रीची

विनंती कोण मानणार? चार-पाच टॅक्सीवाल्यांनी टॅक्सी थांबविली, पण तेही परिस्थिती पाहून निघून गेले. एका टॅक्सीवाल्याचे मात्र मन ती वळवू शकली, टॅक्सीच्या भाड्यासाठी आपली नाकातली नथ देऊ करून! "तुझ्यासारखी गरीब स्त्री एवढे करते, तर मलाही तुझे ऐकलेच पाहिजे" असे म्हणून टॅक्सीवाल्याने टॅक्सीचे दार उघडले. रामसिंग नावाच्या एका मजुराच्या सहाय्याने लक्ष्मीने दुखापत झालेल्या दोघांना उचलून टॅक्सीत घातले. हे करीत असताना तिच्या पिवळ्या रंगाची साडी रक्ताच्या डागांनी भरून गेली. इस्पितळात पोचल्यावर टॅक्सीवाला भाडे न घेता निघून गेला. जरूर पडली तर असावा म्हणून त्याने जाताना आपला पत्ता लिहून दिला.

लक्ष्मीला इस्पितळाच्या आत प्रवेश मिळू शकला नाही. बाहेरूनच ती पाहात होती, ऐकत होती. कुणीतरी तिला सांगितले, की दोघांच्यापैकी एक मरण पावला आहे; दुसरा ठीक आहे. मृताचे नातेवाईक येईपर्यंत ती बसून राहिली. पुढे ती स्मशानातही गेली. गवंड्याच्या हाताखाली विटा–सिमेंट वाहणाऱ्या दीड रुपये रोजाच्या लक्ष्मीच्या मानवतेची अशी आहे कहाणी!

एग्मोरच्या डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीसने एक समारंभ घडवून लक्ष्मीचा सत्कार केला. तिच्या असामान्य मानवतेची किंमत २५ (पंचवीस) रुपये करण्यात आली!




आता तुझ्या स्वयंपाकाविषयी काही विचारायलाच नको!

| | |
|---|---|
| लालमहाल | प्रतापगड |
| पन्हाळगड | राजगड |
| पुरंदर | आग्रा |
| लेखक<br>ब. मो. पुरंदरे<br>रा ज हं स | मूल्य<br>प्रत्येकी रुपये दोन<br>प्र का श न, पु णे. |

MANOOS (Fortnightly) : 1 June 1965 : 25 Paise : Regd. No. B 9304


प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

# स्वस्तिक

# चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.


राजहंस प्रकाशन संस्थच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर